ISSN : 2454-7905
MAH/NAN/10936/2015
SJIF 2025 - Impact Factor : 8.542

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Vol. I ISSUE - CXV Year - 10, Jan.- 2025



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

- Chief Editor -
Dr. Dnyanoba Trimbakrao Dhage

## Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed)
Vol. I ISSUE - CXV Year - 10, Jan.- 2025

SIDDHI PUBLICATION
सिद्धी प्रकाशन
श्रीनगर, नांदेड.
येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.
पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.
संपर्क : सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067



OUR SERVICES
- ISBN Book
- Call for paper
- International Research Journal
- Ph.D. & M.Phil Thesis Book
- E-Book
- Conference and Seminar Proceeding
- Educational Videos and Notes
- Educational Activities

G Pay PhonePe BHIM 9623979067

SIDDHI
Siddhi Prakashan
Worldwide International Inter Disciplinary Research Journal
Website : www.wiidrj.com
Menoffice Address: Director : Mr. Tejas Rampurkar, Hyderabad.
Tuljai Niwas Ramkrishna Nagar, Near Ganpati Mandir
Vasmat Road Parbhani, Maharashtra (India)
Email :shrishprakashan2009@gmail.com / siddhiprakashan674@gmail.com
Mob : +91-9623979067
ISSN 2454-7905
9 772454 790004 >




# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

A Peer Reviewed - Referred

Bela Nagar, Near Maroti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)


# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

# Certificate of Publication


ISSN : 2454-7905

Indexed SJIF

Impact Factor 8.542

ISSN 2454-7905

9 772454 790004 >


This is to certify that the review board of our research journal accepted the research paper / Article titled ____________________________________________________ of

Dr./Mr./Miss/Mrs. ____________________________________________

it is peer reviewed and published in the Issue **Vol. I ISSUE - CXV Year - 10, Jan. 2025** Special Issue

Thank You!

- Chief Editor -

**Dr. Dnyanoba Trimbakrao Dhage**

SIDDHI

Siddhi Prakashan

Nanded

**ISSN: 2454 – 7905**

*SJIF Impact Factor:* **8.542**

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Refereed Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - CXV Year – 10 Jan. 2025**

## Special Issue

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

**:: Editor::**

**Dr. Dnyanoba Trimbakrao Dhage**

Maratha Vidya Prasarak Samaj Nashik.

Karmaveer kakasaheb Wagh Arts, Science and Commerce College

Pimpalgaon Baswant Tal. Niphad Dist. Nashik.

**Address for Correspondence**

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete Website: www.wiidrj.com**

Ramkrishna Nagar near Ganpati Mandir Vasmat Road Parbhani (India –Maharashtra)

**Email:** siddhiprakashan674@gmail.com / Shrishprakashan2009@gmil.com

**Mob. No:** +91-9623979067 **Director : Mr. Tejas Rampurkar, Hyderabad.**

(For International contact only +91-8857894082)

# Worldwide International Inter Disciplinary Research

## (A Peer Reviewed Referred)

**Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance the relevance and thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

| | |
|---|---|
| • Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports | • Engineering |
| • Commerce | • Medical /Ayurveda |
| • Science | • Law |
| • Education | • Journalism |
| • Agriculture | • Mass Communication- **Library sci.** |
| • Pharmaceutical | • Social Work |
| • Management | • Any Other |

**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

***Printed by***
Anupam Printers, Hyderabad

**Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.**

**The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.**

# Editorial Board


| | |
|---|---|
| **Dr. P. Neelkantrao**<br>Dept. of Economics, Pratibha Niketan Mahavidyalaya, Nanded. (MH., India.) | **Dr. Suhas Pathak**<br>Dept. of School of Media studies<br>S.R.T.M.U. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Pramod Ravindra Deshpande**<br>Wake Forest School of Medicine,<br>Dept. of Cancer Biology,Winston Salem, NC, USA. | **Dr. Sachin G. Khedikar**<br>Principal & Professor,Dept. of Rachana-Sharir, Shri. O. H. Nazar Ayurved College, SURAT (India.) |
| **Dr Ashutosh Gupta**<br>Dept. of Sanskrit, HNB Garhwal University, Srinagar Garhwal Uttrakhand 246174 (India.) | **Dr. Mayuresh M. Rampurkar**<br>Sardar Vallabhbhai Patel Hospital,(Neurosurgery),Ahmedabad. (G.India.) |
| **Dr. Manish Deshpande**<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Kulkarni J. N.**<br>Library sci.<br>S.R.T.M.U.Nanded. (MH., India.) |


# Co-Editorial Board


| | |
|---|---|
| **Dr. N. N. Bandela**<br>Dept. of Envi. Science<br>Dr.B.A.M.U. Aurangabad. (MH., India.) | **Dr. Suman K. S.**<br>Dept. of Oriental languages,<br>Loyola College,(Autonomous) Affiliated to University of Madras,Nungambakkam, Chennai-600034 (India.) |
| **Dr. S. P. Hangirgekar**<br>Dept. of Chemistry<br>Shivaji University, Kolhapur. (MH., India.) | **Dr. Baswaprabhu Jirli**<br>Dept. of Extension<br>Education, Institute of Agricultural Sci.<br>BHU, Varanasi. (India.) |
| **Smt. Martha B.**<br>Department of English, Dr. B.R. Ambedkar F.G. College, Ladgeri, Bidar, Karnataka (India.) | **Dr. Chandan Bora**<br>Dept. Of Commerce<br>(MH., India.) |
| **Dr. Mahesh Joshi**<br>Dept. Of Education<br>S.R.T.M.U. Nanded.(MH., India.) | **Dr. Mangesh W. Nalkande**<br>Dept. of Kayachikitsa<br>Govt. Ayurved College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Viraj Vilas Jadhav**<br>Professor and HOD, Dept. of Rachanasharir, Shri dhanwantry ayurvedic College and hospital sector 46 B CHANDIGARH. (India.) | **Dr. M.B. Kulkarni**<br>Govt. Medical College, Nanded. (MH., India) |

## Peer-Review Committee

| | |
|---|---|
| **Dr. U. D. Joshi**<br>Principal<br>Y. College, Ambajogai. (MH., India.) | **Dr. Vasant Biradar**<br>Principal<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Joshi Prashantkumar Panditdev**<br>Department of Zoology (Fishery Science) Adarsh College, Hingoli-431513 (MH., India.) | **Prof. Dr. Mahendrakumar Y. Kulkarni**<br>Head,Dept. of zoology<br>N.S.B. Colloege, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Bibhishan Kare**<br>Rrsearch Guide, Professor and HOD<br>Dept. of Sociology, NSB College, Nanded. | **Dr. Sanjay S. Pekamwar**<br>School of Pharmacy,<br>SRTM University, Nanded (MH., India.) |
| **Dr. Prashant Andage**<br>Dept. of Envi. Sci<br>Ratnagiri sub Center, Mumbai University(MH., India.) | **Dr. Shashikant B. Dargu**<br>Dept. Of Sanskrit<br>N. S. B. College, Nanded(MH., India.) |
| **Dr. Shivraj G. Vannale**<br>School of Chemical Sciences<br>S.R.T.M.U. Nanded(MH., India.) | **Dr. Subhash T. Pandit**<br>Department of Economics,<br>S. V. Night College, Dombivli (E) (MH., India.) |
| **Dr. Sadavarte Rajesh K.**<br>Dept. of Computer,<br>N.S.B. College, Nanded. (MH., India.) | **Dr. Vinay D. Bhogle**<br>Dept. of English Degloor College, Deglor(MH., India.) |
| **Dr. Kalpana Kadam (Bedre)**<br>Dept.of Political Sci., N.S.B. College,Nanded.(MH., India.) | **Dr. Sharada Bande**<br>Head, Dept. of History, S. S. Suryabhanji Pawar College, Purna (Jn.) (MH., India.) |
| **Dr. Deshpande R. P.**<br>Dept. Zoology<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani. (MH., India.) | **Dr. Gananjay Y. Kahalekar**<br>Mahatma Jyotiba Phule Mahavidyalay,<br>Mukhed Dist. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Prashant G. Gawali**<br>Associate Professor, Dept. of Physics<br>Bahirji Smarak Mahavidyalya, Basmathnagar,<br>Dist. Hingoli (MH., India.) | **Dr. Vikas Kundu**<br>Geeta College of Education Butana(kundu),<br>Sonepat – Haryana |
| **Prof. K. Varalaxmi**<br>Deputy Director Sanskrit Academy,<br>Osmania University, Hyderabad. | **Dr. Kamalakar Sharad Ingale**<br>Head of Political Science Department<br>SSMM Arts, Commerce and Science College,<br>Pachora, Dist. Jalgaon. |
| **Dr. Anand R. Ashturkar**<br>Dept. of Envi. Sci. N.S.B.College, Nanded (MH., India.) | **Dr. Sandip Kale**<br>Dept. English, NSB College, Nanded. |

## Advisor Committee

| | |
|---|---|
| **Dr. Milind V. Rampurkar**<br>Govt. Ayurved College, Mumbai. (MH., India.) | **Dr. Sudhir Kokare**<br>Nanded. (MH., India.) |
| **Dr. Sanjay G. Shirodkar**<br>Principal<br>Swa. Sawarkar College, Beed. (MH., India.) | **Prof. Dr. Chitanand M. P.**<br>Dept. Of Microbiology<br>N. S. B. College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Darmapurikar Bhalchandra V.**<br>Dept. of Political sci., NSB college, Nanded. (MH., India.) | **Dr. Ashish Divde**<br>Head Dept.of Envi.Sci,H.J.P.Mahavidyalaya,H.Nagar.(MH., India.) |
| **Shri. Bidrkar**<br>Shivaji College, Parbhani (MH., India.) | **Asst. Prof. Devidas G. Yelne**<br>Dept. of Hindi, NSB College, Nanded. |
| **Adv.Yadupat Ardhapurkar**<br>Law.,Nanded. (MH., India.) | **Dr. Karale Nagesh Baburao**<br>Saraswati Mahavidyalaya, Kaij Dist. Beed. (MH., India.) |
| **Dr. Nagesh R. Khadkekar**<br>SRTMU, Nanded. (MH., India.) | **Dr. Jeevan Pimpalwadkar** (Marathi)<br>Research Guide, SRTMU Nanded. (MH., India) |
| **Dr. A.I. Shaikh**<br>Associate Professor & Head, School of Social Sciences,<br>SRTMU, Nanded. (MH., India) | **Dr. Rajendr Jadhav**<br>Nanded. (MH., India.) |
| **Shri Bharat Jangam**<br>Director Jangam Academy, Nepal.. | **Dr. Jayanth Chapla**<br>Dept of Zoology Osmania University, Hyderabad. (India) |
| **Shri. Santkumar Mahajan**<br>Nanded. (MH., India.) | |

# Guidelines for Submission of Manuscript

**COVERING LETTER FOR SUBMISSION:**

**DATE: ____________**

**To,**
**THE EDITOR,**
WIPRJ,
Parbhani.

Subject: Submission of the article with the title ……………………………………………

……………………………..……………………………………………………………...…….

**DEAR Editor,**

Please find my submission of article for possible publication in your journal.

I hereby affirm that the contents of this manuscript are original. Furthermore it has neither been published elsewhere fully or partly, nor itis under review for publication anywhere.

I affirm that all author(s) have seen and agreed to the submitted version of the manuscript and their inclusion of name(s) as co-author(s).

Also, if our/my manuscript is accepted, I/We agree to comply with the formalities as given in the journal and you are free to publish our contribution in your journal.

**Name and Sign of Author/Authors**
Designation:
Affiliation with full address & Pin Code:
Residential address with Pin Code:
Mobile Number (s):
Landline Number (s):
E-mail Address:
Alternate E-mail Address:

**2. INTRODUCTION:** Manuscript must be in British English prepared on a standard A4 size paper setting. It must be prepared on a single space and single column with 1” margin set for top, bottom, left and right. It should be typed in 12point Times New Roman Font (English Article) and 16 point in DVB-TT Surekh in Pagemaker (Marathi / Hindi Article).

**3. MANUSCRIPT TITLE and HEADINGS:** The title of the paper should be bold capital. All the headings should be bold.All sub-headings should have also bold.

**4. AUTHOR(S) NAME(S) and AFFILIATIONS:** The author(s) full name, designation, affiliation(s), address, and email address should be there.

**5. ABSTRACT:** Abstract should be in fully italicized text, not exceeding 250 words. The abstract must be informative.

**6. KEYWORDS:** Abstract must be followed by list of keywords, subject to the maximum of five.

**7. FIGURES and TABLES:** These should be simple, centered, separately numbered and self-explanatory, and titles must be above the tables/figures. Sources of data should be mentioned below the table/figure.

**8. REFERENCES:** The list of all references should be alphabetically arranged. It must be single spaced, and at the end of the manuscript. The author(s) should mention only the actually utilized references in the preparation of manuscript and they are supposed to follow **Harvard Style of Referencing**.

# Review Process

Each research paper submitted to the journal is subject to the following reviewing process:

1. Each research paper/article will be initially evaluated by the editor to check the quality of the research article for the journal.
2. The articles passed through screening at this level will be forwarded to two referees for blind peer review.
3. At this stage, two referees will carefully review the research article, each of whom will make a recommendation to publish the article in its present form/modify/reject.
4. The review process may take one/two months.
5. In case of acceptance of the article, journal reserves the right of making amendments in the final draft of the research paper to suit the journal's standard and requirement.

# *Worldwide International* Inter Disciplinary Research Journal

## (A Peer Reviewed Referred)

## (ISSN – 2454 7905)


### COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM

**Date:**

**TO,**
**THE PUBLISHING EDITOR,**
**Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed Referred),
Parbhani.

**SUBJECT: COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM**
**(The article cannot be published until this copyright authorization agreement is received by the Editor)**

## DECLARATION

I/We ……………………………………………………………………………………………………... the

author/authors of the paper titled………………………………………………………………………………..

…………………………………………………………………………………………………………………authorize

you to publish the above mentioned article **Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed)

**I/We hereby declare that:**

1. This article authored by me/us is an original and genuine research work. It does not infringe on the right of others and does not contain any libelous or unlawful statements. It has not neither been submitted for publication nor published elsewhere in any print/electronic form.
2. I/We have taken permission from the copyright holder to reproduce the matter not owned by me and acknowledged the source.
3. I/We permit editors to publish the said paper in the journal or in any other means with editorial modification, if any.
4. I/We assign all the copyright of this article to the journal, and have not assigned any kind of rights for its publication to any other publisher(s).
5. I/We agree to indemnify the Editors, **Worldwide International Inter Disciplinary Research** (A Peer Reviewed Referred) against all claims and expenses arising from any breach of warranty on my/our behalf in this agreement.
6. In case of a paper by multi-authored article, I/corresponding authors have obtained permission to enter into agreement and assign copyright from all the co-authors, in writing and all the co-authors have thoroughly read and agreed with above warranties and authorization.
7. All disputes subject to jurisdiction of Nanded court only.

**Name** : ………………………………………………………………………………..

**Official Address** :……………………………………………………………………………..

……………………………………………………… **Pin** …………………..

**e-mail id** :……………………………………………………………………………..

**Mobile and Phone No.** : ………………………………………………………………………………..

**Signature of the Author(s)** : ………………………………………………………………………………..

# *Worldwide International* Inter Disciplinary Research Journal

## (A Peer Reviewed Referred)

## (ISSN 2454 7905)


**Dr. Rajesh G. Umbarkar**

Ramkrishna Nagar near Ganpati Mandir Vasmat Road Parbhani (India –Maharashtra)

**Phone :** +91 9623979067 **Email :** siddhiprakashan674@gmail.com / Shrishprakashan2009@gmil.com

**www.wiidrj.com**

**Dear Editor,**

I wish to be an Annual Member and agree to abide by your rules and regulations.

1. Name in Full :______________________________________________________________

2. Nationality: ________________________

3. Address for Correspondence: ___________________________________________________

___________________________________________________________________________________

Phone (STD code): _______________________ Mobile No : ___________________________

4. Name of the College/Employer : ________________________________________________

___________________________________________________________________________________

5. Present Position/Designation: __________________________________________________

6. Email Address: ______________________________________________________________

**Date:** **(Signature of the applicant)**

**Place: Stamp Seal:**

**ANNUAL SUBSCRIPTION RATES:**

| | Domestic | International |
|---|---|---|
| **Individual** | **Rs. 1500** | **$ 150** |
| **Institutional** | **Rs. 1500** | **$ 150** |

**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

Subscriptions must be sent by Demand Draft drawn on any Nationalized Bank at Nanded, in favour of **Mrs.Pallavi Laxmanrao Shete** Subscription can also be made by depositing cash or electronic transfer in our bank account.

Name of the Bank : **State Bank of India**,**Branch – Taroda Naka Dist**. NANDED. (MH., India.)
IFSC Code : **SBIN0016667**
Branch Code : 16667
Account Number : **20286425949**

# INDEX


| Sir. no. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | अहिल्यादेवी होळकर एक समाज परिवर्तनाचा धगधगता निखारा !! | प्रा. डॉ. सुदाम जी. राठोड | 01 |
| 02. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास | डॉ. छाया भास्कर भोज | 05 |
| 03. | पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन व कार्य | प्रा. हानमंत बाबुराव हांडे | 09 |
| 04. | पुण्यश्लोक: अहिल्यादेवी होळकर यांच्या समाजकार्याचा अभ्यास | नारायण बाबुराव भारती | 16 |
| 05. | "पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर एक जीवन प्रवास" | सौ. प्रिया नितीन उपासनी | 19 |
| 06. | अहिल्यादेवी होळकर : एक राजकीय दृष्टिक्षेप | डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 22 |
| 07. | अखिल भारतीयत्व जपणाऱ्या प्रशासक - राजनीतीज्ञ : अहिल्यादेवी होळकर | श्रीनिवास भोंग | 26 |
| 08. | पुण्यश्लोक: अहिल्यादेवी होळकर यांच्या धार्मिक कार्यांचा अभ्यास | रतन अंबादास कराड | 30 |
| 09. | "अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभारातील पैलू" | डॉ. निलेश गोकुळ शेरे | 33 |
| 10. | मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक अत्यंत प्रभावशाली आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व: अहिल्याबाई होळकर | डॉ. सविता सदाशिवराव आवचार | 38 |
| 11. | "कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकरांच्या जनकल्याणकारी कार्यांचा अभ्यास" | प्रा. डॉ. अनिल काशिनाथ साळुंके | 42 |
| 12. | भारतीय स्त्री चिंतनाच्या आदर्श : अहिल्याबाई होळकर | नादरगे चंद्रदीप बालाजी | 51 |
| 13. | लोककल्याणकारी व लोकाभिमुख राज्यकर्त्या: आहिल्याबाई होळकर | Prof. Dr. Maheshwari Virsing Gavit | 55 |

# अहिल्यादेवी होळकर एक समाज परिवर्तनाचा धगधगता निखारा !!

**प्रा. डॉ. सुदाम जी. राठोड**

(साहाय्यक प्राध्यापक)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय, मोराणे, धुळे

**प्रस्तावना,**

**नारी के सहयोग बिना हर बदलाव अधूरा है!!**

वास्तविक पाहता महिलांच्या सक्रिय सहभागाशिवाय कुठलेही बदल अपूर्ण आहेत. अहिल्यादेवी होळकर एक असे व्यक्तिमत्व होते. ज्यांच्या नेतृत्वामुळे इंग्रजांना सळो की पळो करण्यामध्ये भारतीय सैन्याला मदतच मिळाली. ३१ मे १७२५. रोजी जन्मलेल्या माणकोजी व सुशिलाबाई शिंदे यांच्या कन्या अहिल्याबाई होळकर यांनी आपले आयुष्य अतिशय खडतरपने जीवन जगल्या. पदोपदी त्यांना संकटाला सामोरे जावे लागले एकूण ७० वर्षे आयुष्य मिळालेल्या अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या आयुष्यामध्ये अनेक वीद समाज परिवर्तनाचे कार्य केले. तहानलेल्यां ना पाण्याची सोय, भुकेलेल्यांना अन्नछत्रा ची सोय, दान धर्म, इत्यादी क्षेत्रांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे काम नोंद घेणारा आहे. त्या संकटापुढे कधीही झुकल्या नाही. पण त्या सत्या पुढे नेहमी लीन होत असत. अनेक समाजातील दुभंगलेली, मोडकळीस आलेली मंदिरे त्यांनी दुरुस्त केली.

खरे पाहता पेशव्यांशी निष्ठावंत राहिलेल्या अहिल्याबाई होळकर ह्या सर्वसामान्य जनतेसाठी अत्यंत मनमिळावू आणि कळवळा असलेल्या दिसून येतात. मृत्यू किती भयानक असते याची त्यांनी अनेकदा अनुभव घेतले. खरे तर त्या रयतेची आई म्हणून ओळखल्या जातात.

**संशोधन पद्धती**

सदरील शोधनिबंधासाठी संशोधकांनी दुय्यम साहित्याचा अधिकाधिक वापर केलेला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ ,पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, वेबसाईट, विकिपीडिया, इत्यादी

**शोधनिबंधाचे उद्देश**

१.अहिल्याबाई होळकर यांचे साहित्य अभ्यासणे.

२.अहिल्याबाई होळकर यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कार्य अभ्यासणे.

**त्याग मूर्ती अहिल्यादेवी होळकर:**

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये अहिल्यादेवी होळकर यांना विसरता येणार नाही. समाजासाठी, देशासाठी अहिल्यादेवी होळकर यांचे त्याग न विसरता येणारे आहे. म्हणूनच ब्रिटिश साम्राज्याला पळता भुई थोडी यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या मोजक्या सैन्याच्या आधारावर स्वातंत्र्य मिळवले. त्यांच्या त्यागाला कोणताही समाज सलाम च करेल यात शंका नाही.

**संकटाची मालिका:**

त्याग मूर्ती अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनात सतत संकटे येत गेली .जसे की पती खंडेरावांचा मृत्यू, सासरे मल्हारराव होळकरांचा मृत्यू, मुलगा मालकोजीराव चा मृत्यू, कन्या मुक्ताईचा मृत्यू, जावई यशवंतरावाचा मृत्यू, इत्यादी संकटे त्यांनी समर्थपणे त्यास तोंड दिले आणि सर्व संकटावर त्यांनी मात केली.

वास्तविक पाहता त्यांनी वैराग्य अवस्था जोपासली होती. त्यांच्या चेहऱ्यावर सतत पावित्र्य, स्नेहसील प्रसन्न भाव होता हे विशेष.

**अहिल्याबाईंचे योगदान एक आदर्श:**

१. त्याग मूर्ती अहिल्याबाई होळकर यांनी केलेली लोकोपयोगी कामे ठळक प्रमाणे दिसून येतात यामध्ये- स्त्रियांच्या हिताचे कायदे त्यांनी त्यांच्या संस्थानात पास केले. उदा. सती प्रथा बंदी, हुंडाबंदी, दत्तक घेण्याचा अधिकार, विधवा विवाह प्रोत्साहन, इत्यादी

२. वयोवृद्ध, अपंग, अंधांना आर्थिक मदत व अन्नछत्र या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली.

३. वाट सरूचया संरक्षणासाठी पोलीस चौकी बांधल्या, निवारे बांधली.

४. भटके, आदिवासी यांचे व्यापक प्रमाणात पुनर्वसन केले.

५. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम, पादरी इत्यादी सर्व धर्मीयांच्या प्रार्थना स्थळा साठी देणग्या दिल्या.

६. इतर धर्म व मतांची त्यांनी कधीच हेटाळणी केली नाही.

७. साहित्यिक, शाहीर, शिल्पकार यांना व्यापक प्रमाणात अर्थसाह्य दिले.

८. भूमिहीन बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला.

९. वाटसरू च्या संरक्षणासाठी पोलीस चौकी बांधल्या निवारे बांधले

१०. भजन, कीर्तन, प्रवचन शायरी नाट्य व लोकसंगीत इत्यादी पारंपारिक लोक कलांना अहिल्याबाईंनी प्रोत्साहन दिले.

११. महत्त्वाच्या सरकारी कागदपत्रांची जतन करण्याची व्यवस्था निर्माण केली.

१२. दरबारी व खाजगी नोकरा प्रति सतत कृतज्ञता ठेवली. १३.अहिल्याबाईंनी देशभरातील अनेक धार्मिक क्षेत्रांचा विकास करण्यासाठी मोठा खर्च केला. उदाहरणार्थ तुळजापूर, जेजुरी, घृष्णेश्वर, ज्योतिर्लिंग, अमरनाथ, केदारनाथ, बद्रीनाथ गंगोत्री, काशी विश्वनाथ, इत्यादी.

१३. मंदिर, मशीद, पीर या सर्वांचा जिर्णोद्धार करण्यासाठी पैसा दिला.

१४. न्यायव्यवस्था व प्रशासन व्यवस्था ही सामाजिक न्याय व मानवता या तत्त्वावर चालावी म्हणून अविरत प्रयत्न केले.

१५. नर्मदा काठी असलेल्या महेश्वर या शहरात धर्मशाळा, स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा, रस्ते इत्यादी ची उभारणी केली.

१६. महेश्वरवर येथे सुंदर शिवमंदिर बांधले.

१७. रस्ते, गाव रस्ते, सैन्यासाठी रस्ते, दूरच्या प्रवासासाठी रस्ते व तेही रस्ते देशातील विविध प्रांतीय रस्त्यांना जोडणारे यांच्या निर्मितीसाठी प्रयत्न केले.

13 ऑगस्ट 1795 रोजी महेश्वरी येथे अहिल्याबाईंचा मृत्यू झाला

**लोकमाता अहिल्याबाई होळकर :**

वास्तविक पाहता ज्यांच्या मनात आणि समाज हित, मुखात देवाचे, शिवाचे नाव आणि हातात समाज उपयोगी कामे. लोकांच्या हितात च आपले हित शोधणाऱ्या खऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर होय.स्वतःच्या दुःखात न हरणारी तर स्व दुःख पुरी दडपून हसणारी आणि समाजाचे दुःख हरविणारी.

त्यांच्याही मुखावर हास्याची फुले फुलविणारी प्रेम स्वरूप आई वात्सल्य सिंधू आई म्हणजेच अहिल्याबाई होळकर होय.

समाज मनाची मशागत करणारी शेतकरी. मनगट आणि तल्लक मेंदूच्या जोरावर राज्य करणारी शूर रणरागिणी, संस्कृतीची रखवालदार खरी अहिल्याबाई होळकर. तहानलेल्यांना अशा जिवांना तृष्णा तृप्त करण्यासाठी थंडगार पाण्याच्या पानपोई द्वारे अनेकविद कार्य केले. भुकेलेल्यांना तृप्त करण्यासाठी त्यांनी अन्नछत्र उभारले. निर्धनासाठी निवाऱ्यासाठी त्यांचे उत्तर म्हणजेच धर्मशाळा आणि धर्माला उत्तर म्हणजेच धर्माची अधिष्ठाने असलेली मंदिरे. तीच मंदिरे जीर्ण झाली त्यालाही उत्तर होते जीर्णोद्धार यासाठी अहिल्याबाई होळकर सतत प्रयत्नरत राहिल्या. मंदिराचा जीर्णोद्धार आणि समाजाचा उद्धार करण्याचे वृत्त त्यांनी आयुष्यभर जोपासले होते.

खऱ्या अर्थाने अहिल्याबाई होळकर ही सकळं जणांची आई म्हणूनच आयुष्यभर त्या सर्व परिचित राहिल्या. खऱ्या अर्थाने अहिल्याबाईंच्या जन्म आणि मृत्यू यांच्या मधला काळ म्हणजेच त्यांचा खरा जीवनपट होय. जीवनातील अत्यंत महत्त्वपूर्ण असे टप्पे म्हणजे बालपण, तरुण पण, विवाह, वैवाहिक जीवन, प्रौढावस्थे तील सामाजिक कार्य होय.कर्तृत्व, दातृत्व इत्यादी होय. स्वतःच्या मुलासाठी चांगले मातृत्व आणि पितृत्व संस्कारक्षम मनातून घडणारे समाजशील आणि व्यवहार कुशल सृजनात्मक कार्य हेच जीवनाचे मधुर फळ असते हे त्यांनी वेळीच जानले होते.

अहिल्याबाईंच्या जीवन चरित्रामध्ये माणसांच्या व्यक्तिमत्व संवर्धनासाठी आवश्यक ती जीवनसत्वे सापडतात. खऱ्या अर्थाने त्यातल्या प्रेरणा, शहाणपणा, माणसांना घडविण्याचे काम करतात. आधी घडून गेलेला इतिहास पुढे घडणाऱ्या महान व्यक्तींसाठी प्रेरणादायी असतो हे त्यांनी वेळीच जाणले होते. किंबहुना आधी घडलेला इतिहासच आदर्श व्यक्तिमत्त्वाचे नवनिर्माण करीत असतो हेही तेवढेच महत्त्वाचे असते. अहिल्याबाईंच्या इतिहासाबद्दल खूप बोलले जाते पण भारदस्तपणे लिहिले जात नाही. त्यामुळे समाज मनावर त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा म्हणावा तसा ठसा क्वचित प्रसंगी उमटलेला दिसून येतो. अनेक संस्थानिकांनी शत्रू विरुद्ध युद्ध पुकारले. त्यांची प्रेरणा होती राज्य विस्तार दौलतीत भर परम धर्म द्वेष पण अशा संकटाच्या काळात ही खऱ्या सत्वशील माता पुण्यशील आई, धर्मशील पत्नी, कर्तृत्व संपन्न अहिल्याबाई यांनी तहानलेल्या, भुकेलेल्या, रंजलेल्या गांजलेल्या जीवांचा मंगल दुवा मिळविण्यासाठी विहिरी खोदल्या. गोरगरीब यांच्या रक्षणासाठी फौज उभी केली. अन्यायाच्या खंडना साठी न्याय बुद्धीने न्यायदान केले.

सतीच्या प्राणघातक कलंक तर त्यांनी स्वतःच्या कृतीतून च पुसून टाकला आणि आपला जीवन यज्ञ जनहितार्थ तशाच धगधगत तेवत ठेवला. अनिष्ट रूढीला, सतीच्या चालीला मूठ माती देण्याची इच्छा सासरे सुभेदार मल्हार रावांची तर आकांक्षा लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाईंची होती.

**सारांश**

समाज परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अहिल्याबाई होळकर यांनी अनेक संकटांना समर्थपणे तोंड दिले आणि समाजातील रंजल्या गांजल्यांसाठी व प्रजेसाठी महत्त्व कार्य केले हे अनेक उदाहरणावरून दिसून येते प्रजा सुखी तर राजा सुखी ही अशीम श्रद्धा अहिल्याबाई होळकर यांच्याकडे दिसून येते. खऱ्या अर्थाने लोकाश्र्यावरच राज्य टिकू शकतील ही मनोमन भावना अहिल्याबाई होळकर यांच्या अनेक कृतीतून दिसून

येते. म्हणूनच त्यांनी भटक्या विमुक्तांसाठी असेल, गरिबांसाठी असेल, निर्धनांसाठी असेल, शेतकऱ्यांसाठी अशा अनेक वंचित घटकांसाठी अहिल्याबाई होळकर यांनी लोकोपयोगी कामे केली. त्याचबरोबर जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या अनेक मंदिराचा जिर्णोद्धारही त्यांनी केला. खऱ्या अर्थाने अहिल्याबाई होळकर या महिला जगतासाठी नव्हे तर संपूर्ण मानव समूहासाठी प्रेरणास्त्रोत होत्या हे कोणीही नाकारू शकणार नाही.म्हणूनच समग्र परिवर्तनाचा धगधगता निखारा म्हणून अहिल्याबाई होळकर यांच्याकडे पाहिले जावे अशी लेखकाची इच्छा आहे.

**संदर्भ**


1. शिवाजी सगर /कांचन सगर, थोर क्रांतिकारक महिला, अरुणा प्रकाशन, लातूर
2. शारदा देशमुख, शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन
3. पेशवे दप्तर पुणे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्मृती विशेषण १९९६
4. शुभांगी गव्हाणे, स्त्री परिवर्तनाची आव्हाने २००३
5. गीता साने, भारतीय स्त्री जीवन. मौज प्रकाशन ग्रह, मुंबई १९९७

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास

**डॉ. छाया भास्कर भोज**

इतिहास विभाग, म. वि. प्र. समाजाचे,

क. का. वाघ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव ब. 422209

**प्रस्तावना-**

विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर जात असताना स्त्रियांसाठी स्त्रीमुक्ती संघटना, स्त्रीहक्कांची जाणीव, स्त्रियांसाठी दक्षता समिती, स्त्रियांसाठी आरक्षणाची योजना, सैन्यात प्रवेश स्त्रियांच्या परिषदा यासारख्या अनेक योजना शासनाकडून आज कार्यान्वित होतात. या सर्व गोष्टींचा अहिल्यादेवी होळकरांनी आपल्या कारकिर्दीत २५० वर्षांपूर्वीच पुरस्कार केला. भारतीय इतिहासात अलीकडच्या काळात मुख्यतः मराठ्यांच्या इतिहासात ज्या प्रख्यात स्त्रिया होऊन गेल्या .त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा क्रम फार वर लागतो .

रयतेच्या आयुष्यात सुख समाधान यावे म्हणून आपले आयुष्य खर्ची त्यांनी घातले. रयतेसाठी त्या लढल्या म्हणून रयतेने त्यांना केवळ राणी न मानता आपली आई किंवा माता मानले. अशा या अहिल्याबाई होळकरांचा जन्म महाराष्ट्राच्या नगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील चौंडी गावी ३१ मे १७२५ रोजी सोमवारी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे चोंडी गावचे वतनदार पाटील होते. एक सामान्य पाटील कुटुंबात जन्मलेली एक मुलगी श्री मल्हार रावांच्या नजरेस पडते .आणि ती त्यांची सून होती. मोठा अधिकार, अपार संपत्ती आणि व्यवहाराचे संपूर्ण स्वातंत्र्य या मुलीला मिळते आणि ती जनमानसांच्या आधाराला पुढे पात्र होते .त्यांचा विवाह १७३३ मध्ये मल्हारराव होळकरांच्या मुलासोबत झाला .

बालपणी माहेरी नंतर सासरी धार्मिक वातावरण मिळाले. आणि कोवळ्या मनावर त्यांची संस्कार झाले .धार्मिक माणूस पापभिरू असतो. त्या मनात मी जे काही आज सत्ता व सामर्थ्याच्या बळावर करते त्याचा मला परमेश्वरा पाशी जाब द्यावा लागेल .धर्माने राज्य कर्त्यांवर प्रजा पालन व रक्षणाची जबाबदारी सोपवली १९ मार्च १७५४ ला कुंभेरी च्या वेढ्यात त्यांचे पती खंडेराव मारले गेले आणि त्यांना वैधव्य आले. त्यावेळी त्यांच्या नऊ बायका सती गेल्या. पती निधनानंतर सती जाण्याची त्यांनी तयारी केली. एकुलता एक मुलगा गेल्याने पाय गेलेल्या मल्हाररावांवर सुनेच्या जाण्याने पाठीचा कणा जाण्याची पाळी आली. पुत्र विरहाचे दुःख बाजूला सारून ते उघडे बोडखे धावतच सुनेजवळ आले आणि दाटलेल्या कंठाने भरलेल्या डोळ्याने सुनेला म्हणाले, बाळ माझ्या जीवनाचा उन्हाळा करून जातेस ,तू राहिली तर अहिल्या गेली खंडू आहे असे समजेल. मोगल, रोहिले, निजाम, राजपूत यांना आपल्या समशेरीचे पाणी दाखविणाऱ्या रणशूर सासऱ्याची अवस्था पाहून त्यांनी सहगमनाचा विचार सोडून दिला.आपली दौलत तिच्या हाती सुरक्षित राहील हे मल्हार रावांच्या अनुभवी नजरेने जाणले. म्हणून सती जाण्यापासून त्यांनी तिला परावृत्त केले. अहिल्याबाईंना मात्र त्यांचे सासरे मल्हार रावांनी सती जाऊ दिले नाही .मल्हाररावांनी होळकर शाहीला अशी एक राणी दिली जिच्या ठिकाणी हिमालयाची दृढता, सागराचे गांभीर्य, गंगेचे पावित्र्य, सूर्याची दाहकताआणि चंद्राची शीतल शितलता यांचा अनुपम संगम झालेला होता. सासऱ्याने सोपवलेली जबाबदारी पार

पाडण्यासाठी मानसिक शांती त्यांना हवी होती. त्यासाठी त्यांनी 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' आणि 'करो काम भजो राम' हे धोरण आजन्म कायम ठेवले.खंडेरावांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाईंच्या आयुष्याचा पहिला अध्याय संपला. अहिल्याबाईंना जाणवलं,

दुःख  बांधवडी आहे हा संसार ।

सुखाचा विचार नाही कोठे ॥

**अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक कार्य -**

डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणतात, अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत प्रजा सुखी होती. सर्वत्र नीट व्यवस्था होती.राज्यकारभार नीटनेटका चालला होता. आदर्श कारभार म्हणजे अहिल्यादेवींच' अशी म्हण पडली होती. ती एक कर्तुत्ववान स्री होती. नीट घडी बसविणारी होती. त्यांचा कारभार न्याय व नीती वर आधारित जाती वर्णभेदाला थारा देणारा नव्हता. त्यांचा सर्वधर्मसमभाव हा समतोल होता. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे यात अशी नोंद सापडते की, महेश्वर येथे शेतात काम करणाऱ्या बैलांना पाणी पाजण्यासाठी नोकर धावून जात. बैलांना पाणी पाजल्यामुळे विश्रांती मिळायची. तसेच उन्हामुळे लागलेली तहान शमून ते अधिक जोमाने कामाला लागायचे. यामुळे कृषी उत्पादनात अधिक भर पडत असे. हिवाळ्याच्या दिवसात अश्रितांना आणि अपंग लोकांना वस्त्रे व घोगड्या वाटण्याचा कार्यक्रम होत असे. हा कार्यक्रम महेश्वर उज्जैनी ,ओंकारेश्वर या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी होत असे. महेश्वर आणि तीर्थक्षेत्री अन्य प्रांतीय शास्त्री ,पंडित ,वैद्य, ज्योतिषी आणून वसाहतींची योजना केली जाई. ती ज्ञान व संरक्षण आणि ज्ञानसंवर्धनाचीच अभूतपूर्व अशी योजना म्हणावी लागेल.

काशी येथे त्यांनी ब्रह्मपुरी वसविली. ही पुरी म्हणजे एक प्रकारचे विश्वविद्यालय होते. या विश्व विद्यालयातून रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारखे जगद्विख्यात न्यायाधीश निर्माण झाले. ज्या काळात शिक्षणाच्या बाबतीत समाज अंधारात जाऊन पडत होता .त्याच काळात अहिल्याबाईंनी विद्वानांकडून ग्रंथ निर्मिती केली. कारण ग्रंथ हे निद्रिस्थांना जागृत करण्याचे महान कार्य करतात. त्यांनी महेश्वर येथे वेदाभ्यास, संस्कृतच्या पाठशाला काढल्या. पुराणांचे वाचन, कीर्तन, प्रवचन, भागवत सप्ताह अनेक देवदेवतांचे उत्सव यासारख्या माध्यमातून समाज जागृती करून समाज प्रबोधन घडवून आणले .ही एक प्रकारे वैचारिक क्रांतीच म्हणावी लागेल.

तसेच त्यांनी प्रत्येक शेतकऱ्यांना वीस झाडे लावायला लावले. त्या झाडांमध्ये लिंबू, औदुंबर, वड, पिंपळ, चिंच या झाडांचा समावेश होता. त्यामुळे जमिनीत पाण्याचा साठा व्हावा ही भूमिका शेतकऱ्यांनी लावलेल्या झाडांमागे होती. या लावलेल्या 20 झाडांपैकी 11 झाडे सरकारची तर नऊ झाडे शेतकऱ्यांची राहत होती .दोघांनी आवश्यक ते लाकडे वापरावे हा त्यामागे हेतू होता. झाडे तोडणे म्हणजे ईश्वर अपराध करण्यासारखेच आहे. ही भावना रयतेच्या मनात त्यांनी त्याकाळात बिंबवली होती. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरण सारख्या संस्था आज ज्या निर्माण होत आहे त्याची जाणीव अहिल्यादेवी होळकरांना 250 वर्षांपूर्वीच झाली होती केवढी मोठी त्यांची ही दूरदृष्टी त्यामागे होती हे इथे दिसून येते.

**अभयारण्य-** राज्यात ठिकठिकाणी आमराया लावण्याचे प्रोत्साहन त्यांनी दिले .देवाच्या नैवेद्याला फळे, फुले हवी म्हणून बागा तयार करून घेतल्या. पशुंसाठी कुरणे तर पक्षांसाठी उभी पिके विकत घेतली. जिथे पशुपक्ष्यांचा मुक्त विहार चालत असे तेथेमुंग्यांना साखर तर मासोळ्यांना कणकेच्या गोळ्या दिल्या जात.

वृक्ष, भूचर व जलचर या सर्वांची त्या काळजी घेत असे. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' या तुकारामांच्या अभंगात वर्णन केल्याप्रमाणे अहिल्यादेवींचे आचरण दिसून होते. त्यांच्या सर्व दानधर्मावर भावभुतीचा अंकुर होता .त्यांची भूतदया विलक्षण होती. दररोज गोरगरिबांना अन्न, सणावाराच्या दिवशी कनिष्ठ लोकांनाही मेजवानीचे जेवण अहिल्यादेवी कडून दिले जात असे. वाटसरूंना पाणपोई रस्तो रस्त्यात उन्हाळ्यात त्यांनी निर्मिती केली होती. हिमालयापासून रामेश्वर पर्यंतच्या भिन्न भाषा, जाती, वंशपरंपरा, रूढी असलेल्या समाजाला सांस्कृतिक साखळीत जोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे प्रजेच्या मनात धर्मजागृती होऊन, राष्ट्रप्रेम निर्माण झाले. हजारो बेकार कामगारांना रोजगार उपलब्ध झाला .

जनावरांसाठी डोन्या बांधून घेतल्या. पशुपक्षांसाठी रुग्णपोचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लोकांवर उपचार व्हावेत म्हणून हकीम वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या ठेवल्या .मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्या पर्यंत त्यांचा दानधर्म हा सढळ होता गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करीत कपडे वाटत थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटत .वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चोंडी, नाशिक, इंदोर त्रंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले. आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडले .सप्तपुरे, चार धामे या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यांत्रिकांची त्यांनी सोय केली. तसेच जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेगाव व गौतमीबाई यांच्या छत्री आणि महेश्वरला मुक्ताबाईच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले .कुंभेरी जवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्रीही बांधली.

**कला जिवंत राहिली-** भारतातील हिमालय ते कन्याकुमारी गुजरात ते बंगाल पर्यंतच्या क्षेत्रात अहिल्यादेवींनी कोणत्याही तरी स्वरूपात बांधकाम केल्याने तत्कालीन काळातील कला जिवंत राहण्यास मदत झाली आहे. अहिल्याबाईंचा दरारा इतका मोठा होता की, त्यांच्या राज्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची आसपासच्या कोणत्याही राजाची हिंमत झाली नाही त्यांनी धार्मिकतेला लोकहिताचा आधार दिला. अहिल्याबाईंच्या हाती राजशक्ती आणि संपत्ती दोन्हीही असल्यामुळे त्यांना आपल्या लोकहिताची कामे करण्यात कधीच अडथळे आले नाही. धर्मशाळा, रस्ते, मंदिरांचे पुनर्जीवन, नद्यांवरील घाट, पाणपोया अन्यछत्रे ही कामे त्यांनी आपल्या राज्यातच केली असे नाही तर भारतातील इतर राज्यांमध्ये ही कामे त्यांनी केली. लोककल्याणकारी कामातून त्यांनी राष्ट्रीय, सांस्कृतिक एकता साध्य केली .आपले राज्य शिवार पण करून शिव शंकराच्या नावाने त्यांनी राज्यकारभार केला. राजमुद्रेतही आपले नाव येऊ न देता 'श्री शंकर' आदेशावरून अशी राजमुद्रा वापरली .अहिल्याबाईंची जी तत्वे प्रसिद्ध आहेत त्यामध्ये त्या म्हणतात, स्नानाने शरीरसिद्धी, ज्ञानाने मन शुद्धी आणि दानाने धनशुद्धी होते .आपल्या संस्कृतीत त्याग आणि दानधर्म यांना मोठे महत्त्व आहे. 'माणसातच देव आहे हे मानून मानव आणि प्राणिमात्रांची सेवा करणे' हे भक्तीचेच एकरूप आहे असे त्या म्हणत .त्यांचे लोककल्याणकारी कार्य जात पात धर्म व राज्याच्या सीमा या पुरतेच मर्यादित राहिले नाही त्यांच्या कामाचा आवाका अवघ्या मानव जातीला कवेत घेणारा असा होता म्हणून तर इतिहासकारांनी 'कर्मयोगिनी' अशी उपमा त्यांना दिली.

**शैक्षणिक दृष्टिकोन-** अहिल्यादेवी शिक्षणाच्या बाबतीत अतिशय जागृत होत्या .त्या स्वतः साक्षर होत्या. त्यांचे मोडी लिपीतील हस्ताक्षर अतिशय सुंदर होते. आजही ते उपलब्ध आहे त्यांच्याजवळ खूप मोठा ग्रंथ संग्रह होता. त्यांचे श्रवण त्या करीत. आपल्या आश्रयाला आलेल्या विद्वानांकडून अनेक हस्तलिखित ग्रंथ

तयार त्यांनी करून दान केल्याचे दिसते. ग्रंथदान करणे हे धर्म कृत्य मानले जाईल. धार्मिक ग्रंथाच्या बाबतीत रामायण महाभारत त्यांनी सांगितले आहे. अहिल्याबाईंनी पंडित, खुशालीराम भट्ट यांच्याकडून अहिल्या 'कामधेनु' नावाचा ग्रंथ लिहून घेतला .हा ग्रंथ म्हणजे कला विज्ञानाचा कोश होता. ज्ञानप्रसाराचे महान कार्य या ग्रंथाने केले. पूर्वापार चालत आलेल्या पद्धती त्यांनी जिवंत ठेवल्या. महाराष्ट्राची भूमी ही पुण्यभूमी आहे असे नेहमी म्हटलं जातं ते काही खोटे नाही. कारण शेकडो वर्षांच्या परकीयांच्या अंमलाखाली ही भारत भूमी चिरडून जात असताना ही भूमिका हिंदूंच्या मनात आपल्या वैदिक धर्माबद्दल प्रेम, आदर आणि निष्ठा जागृत ठेवण्याचं काम संतांनी केले .म्हणूनच संतांनी उत्कृष्ट मशागत केलेल्या अशा भूमीत छत्रपती शिवाजी महाराज देवी, अहिल्याबाई होळकर यासारख्या युगपुरुषांत गणना होणाऱ्या व्यक्ती जन्माला आलेल्या दिसतात.

**मनुष्यबळ** - माणसाची पारक असल्याने त्यांनी योग्य कामासाठी योग्य माणसांची निवड केली होती. एकदा नेमलेला माणूस बदलण्याची पाळी त्यांच्यावर कधीच आली नाही. नियंत्रण ठेवून नेमून दिलेली कामे चोख करून घेण्याची हातोटी त्यांच्याजवळ होती. काम चूकारांची कधीही त्यांनी गय केली नाही. इमाने, इतबारे काम करणाऱ्यांचा गौरव करून पारितोषिक त्या देत असतात माणसाला माणसापासून दूर नेणाऱ्या परंपरा त्यांना कधीच मान्य नव्हत्या. स्त्रियांचा सन्मान ही माळवा प्रांतातील आपल्या राज्याची ओळख असावी अशी त्यांची इच्छा होती. रयतेच्या आयुष्यात सुख समाधान यावे म्हणून आपले आयुष्य त्यांनी पूर्णपणे खर्ची घातले. त्या नेहमी रयतेसाठीच लढल्या आणि म्हणूनच रयतेने त्यांना आई ही पदवी दिली

**समारोप** - अहिल्यादेवींनी प्रजेच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या. म्हणून त्या लोकमाता ठरल्या प्रजेचा विकास व सुख त्यांनी नेहमी पाहिले. म्हणून त्या आज 'आदर्श शासक' ठरल्या .सत्य, न्यायनिष्ठा, सात्विकपणा, पावित्र्य, विवेक, दानशूरता आणि स्त्री शक्तीचा अविष्कार यांचे प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होत्या. प्रजाहितदक्ष असे त्यांचे रामराज्य होते म्हणून तर म्हटले जाते …

इतिहासाच्या पानोपानी… …
जिची गाईली गाथा !
होळकरांची तेजस्वी ती… …
**पुण्यश्लोक माता** !

**संदर्भसूची** -


1. कणेकर मुक्ता, लोकराज्ञ अहिल्याबाई होळकर, पुणे 2013.
2. विजया जहागीरदार, तेजस्विनी अहिल्या देवी होळकर चरित्र ,म.रा. सां स मंडळ ,मुंबई.
3. डॉ.राम इंगळे - अहिल्याबाई होळकर गौरव गाथा लोक मातेची.
4. वा कृ भावे - पेशवेकालीन महाराष्ट्र, 1935.
5. डॉ.देविदास पोटे व अनंत नारायण भागवत - होळकरांची कैफियत.
6. अशोक शिंदे सरकार - मराठा साम्राज्याच्या आधारस्तंभ अहिल्याबाई होळकर.
7. चंपा नेरकर मिलिंद ,कुलकर्णी सुहास ,-यांनी घडवलं सहस्त्रक ,पुणे, 2003.
8. सु.र.देशपांडे - मराठेशाहीतील मनस्विनी ,पुणे, 2005.
9. म.ना .लोही, -देवीअहिल्याबाई होळकर वास्तव दर्शन - नागपुर ,1999.
10. वीरेंद्र तैवार, हिरालाल बाछोतिया,- अहिल्याबाई ,1991.

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal** (A Peer Reviewed Referred) **ISSN – 2454 - 7905**

# पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन व कार्य

**प्रा. हानमंत बाबुराव हांडे**
संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्र, पीपल्स का ॅलेज, नांदेड.

**प्रास्ताविक**

भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील ज्या काही मोजक्या, थोर, पराक्रमी व कर्तबगार महिलांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले त्यामध्ये अक्कामहादेवी, संत जनाई, राणी चेनम्मा, राणी दुर्गावती, राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, रझिया सुलताना, मुक्ता साळवे, झलकारी बाई, विरांगणा इंदूताई पाटणकर, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, फातिमाबी शेख, तान्हुबाई बिर्जे, बहिणाबाई चौधरी, रमाबाई आंबेडकर, साधनाताई आमटे, मदर तेरेसा, सिंधुताई सपकाळ, अनुताई वाघ, का ॅ.गोदावरी परूळेकर इ. च्या बरोबरीनेच अठराव्या शतकातील एक अत्यंत कर्तव्यपरायण लोकमाता म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव प्रामुख्याने
घ्यावे लागते.

**होळकर घराण्याचा संक्षिप्त इतिहास**

होळकरशाही अथवा होळकरांचे राज्य एक उत्कृष्ट न्यायप्रिय, समतेचे व मानवतावादाचे विद्यापीठ म्हणून इतिहासात या राज्याची नोंद आहे. होळकर घराणे हे मुळचे पुणे जिल्हयातील राजगुरू – तालुक्यातील वाफगावचे होते. पण होळकरांचे पूर्वज पुढे साताऱ्यातील फलटण तालुक्याच्या 'नीरा' या नदीच्या काठावर वसलेल्या 'होळ' या गावी वास्तव्यास आले. म्हणून गावाच्या नावावरून ते 'होळकर' असे झाले. काहींच्या मते 'होळ' हे गाव बारामती रोडवरील वडगावनजीक आठ-दहा कि.मी. अंतरावर आहे. तर काहीजण जेजुरीजवळ 'होळ' हे गाव असल्याचे सांगतात.

होळकरांचे पहिले पुरूष 'खंडोजी' हे असून ते गावातील एक चौगुले व प्रतिष्ठित व्यक्ती होते. त्यांना दि. १६ मार्च १६९३ रोजी एक वीर सुपुत्र जन्मास आला. त्यांचेच नाव सुभेदार मल्हारराव होळकर होय. याच मल्हाररावांनी मराठेशाहीच्या अत्यंत धामधुमीच्या काळात शौर्य गाजवले,ते तलवारबहाद्दर होते. म्हणून त्यांच्या गुण व शौर्याची दखल घेऊन छत्रपतींनी त्यांना स्वराज्यातील माळवा प्रांताचे प्रथम सुभेदार पद दिले होते.तसेच 'इंदूर' व 'महेश्वर' सारखी नामांकित संस्थाने आणि इतर काही जहागीर देऊन त्यांचा यथोचित गौरव केला.

अशाच या झुंजार होळकरांच्या घराण्यात एक कुशल नेतृत्व करणाऱ्या रणरागिनी अहिल्यादेवी होळकरांचा उदय झाला. शतकानुशतकापासून बुरसटलेल्या अनिष्ट प्रथा-परंपरा, विषमता, जातिभेद व अंधश्रध्देसारख्या भीषण काळोखाला छेद देऊन एक आदर्श वैभवशाली राज्य निर्माण करणाऱ्या आणि जनकल्याण हेच माझं अंतिम ध्येय्य आहे असे निक्षून सांगणाऱ्या अहिल्यादेवी होळकर म्हणजेच अखंड तेवत राहणारी समतेची ज्योत, सामाजिक परिवर्तनाचा नंदादीप आणि करूणेच्या महासागरातील अनमोल मोती आहे.

**अहिल्यादेवीचा जन्म व बालपण**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी 'बीड' जिल्हयातील, 'जामखेड' तालुक्यात 'सीना' नदीच्या काठावरील 'चोंडी' या छोट्याशा गावात झाला. त्यांच्या आईचे नाव सुशिलादेवी होते त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. तर वडिलांचे नाव माणकोजी पा. शिंदे हे होते त्यांचे वडील गावातील एक सधन व प्रतिष्ठित व्यक्ती होते. अहिल्यादेवींना महादजी व शहाजी हे दोन भाऊ होते. काहींच्या मते महादजी, येसाजी, बाणाजी, विठोजी, आणि सुभानजी हे पाच भाऊ असल्याचे समजते मात्र त्यांच्या वरील दोनच भावांचा उल्लेख बहुतेकांच्या लेखनात येतो म्हणून त्यांना महादजी व शहाजी हे दोनच भाऊ असल्याचे सिद्ध होते. गावातील एका संस्कारशील कुटुंबात जन्मलेल्या अहिल्येच्या बालपणाविषयी अनेक कवी, शाहीर, वक्ते, नामवंत लेखक आणि बखरकार, इतिहासकार व चरित्रकारांनी नमुद केले आहे की,अहिल्या ही मुलगी अतिशय चुणचुणीत व चाणाक्ष, तसेच रूप व रंगाने सोज्वळ,आचरणशील, आणि तल्लख बुध्दीमत्ता लाभलेली सर्वगुणसंपन्न अशी आहे.असे वर्णन केले. १७३३ च्या सुमारास एकदा सुभेदार मल्हारराव होळकर काही कामानिमित्त दौऱ्यावर जात असतांना भर दुपारी अहिल्येला त्यांनी रानवाटेने जात असतांना पाहिले. त्यांच्यात संवादही झाला. तिच्या बोलण्याचा व स्वभावाचा चाणाक्षपणा ओळखून तत्क्षणीच ही गुणी मुलगी मल्हाररावांना आपली सून म्हणून करण्याची मनोमन इच्छा झाली. काही दिवसांतच आपला पुत्र खंडेरावांसाठी त्यांनी अहिल्येच्या वडिलांकडे मागणी घातली. त्याच सुमारास १७३३ ला पुण्यांत अहिल्यादेवीचा वयाच्या ९ व्या वर्षी खंडेरावांशी तत्कालीन रीतिरिवाजानुसार अगदी थाटामाटात विवाह संपन्न झाला. पुढे १७४५ ला त्यांना 'मालेराव' हा पुत्र तर डिसें. १७४८ रोजी 'मुक्ताबाई' ही कन्या अशी दोन अपत्ये झाली. अहिल्यादेवीच्या सासूचे नाव गौतमीबाई हे होते त्या अतिशय पारंपरिक होत्या.

**समाजकार्याच्या दीपस्तंभ अहिल्यादेवी होळकर**

आपल्या २८ वर्षाच्या अत्यल्प कार्यकाळात अहिल्यादेवी होळकरांनी निःपक्ष व निःस्वार्थपणे राज्यकारभार केला. त्या मनाने कोमल अंतःकरणांच्या व मातृहृदयी होत्या. दानशूर म्हणूनही त्यांची ख्याती सर्वदूर आहे. त्या धार्मिक कार्य (पूजा-अर्चा, अभिषेक,जप इ.) करीत असत मात्र धर्मांध नव्हत्या. उपवास, नवस, वृत्तवैकल्ये, नशीब, स्वर्ग- नरक या थोतांड गोष्टींवर त्यांची मुळीच श्रध्दा नहती. कठोर परिश्रम व प्रयत्नवादावर त्यांचा गाढा विश्वास होता. "ज्यांच्या मनगटात बळ,बुध्दी आणि चातुर्य असते तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनु शकतो." हे त्यांनी आपल्या कृती आणि उक्तीतून सिध्द करून दाखवले.

**सतीप्रथेचे उच्चाटन केले.**

अहिल्यादेवी होळकर या जेवढ्या मवाळ तितक्याच बंडखोर वृत्तीच्या देखील होत्या. प्रस्थापित धर्मसत्तेने निर्माण केलेल्या जाचक रूढी व बंधनांविरुध्द त्यांनी रणशिंग फुंकले. जेंव्हा १७५४ ला कुंभेरीच्या लढाईत त्यांचे पती खंडेराव हे सुरजमल जाटांशी लढतांना मृत्यूमुखी पडले. तेव्हा तत्कालीन भारतात सतीची अमानवीय चाल मनुस्मृतीच्या आधारे चालू होती. एकेक क्षण हा असा अचानक येतो की त्यामुळे व्यक्तीच्या जीवनाला कशी अंतर्बाह्य कलाटणी मिळते. अहिल्यादेवींच्या बाबतीतही असेच झाले होते. खंडेरावांच्या निधनानंतर त्यांच्या दुसऱ्या दोन बायका पार्वतीबाई व सुरताबाई ह्या सती जाण्यास आनंदाने सिध्द झाल्या. रमजानी व नखुबाई दिल्लीवाली या दोन कलावंतीण स्त्रीया सुध्दा तयारच होत्या. धर्माच्या आदेशान्वये ह्या सर्वजणी खंडेरावांच्या मृत्यूनंतर निमूटपणे, सजून-सवरून, शुभ्र वस्त्रे व अलंकारांसह सती गेल्या होत्या.

मात्र अहिल्यादेवींनी ह्या अमानुष सतीप्रथेला लाथ मारून, सती जाण्यास हिंमतीने नाकारले. सतीच्या या धार्मिक परंपरेवर तीव्रपणे हल्ला करून अहिल्यादेवींनी सनातनी लोकांना आव्हानच दिले. यात त्यांचे सासरे मल्हारराव होळकरांचीही त्यांना भक्कम अशी साथ व मार्गदर्शनही मिळाले होते. कारण मल्हारराव होळकरांनीच अहिल्यादेवींना स्पष्टपणे म्हटले आहे की,

"तू माझा उजवा हात आहेस, आता या राज्याची धुरा तुझ्याच खांद्यावर आहे." असे म्हणत मल्हाररावांनी अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. तेव्हा अहिल्यादेवीही प्रवाहाविरुद्ध जाण्याचे धाडस दाखवत म्हणाल्या की, "मी तुमच्या मर्यादेचे अजिबात उल्लंघन करणार नाही! "मी सती जाणार नाही, त्यापेक्षा जीवंत राहून आयुष्यभर प्रजेचे रक्षण करीन."

**अहिल्यादेवीचे प्रशासन व न्यायव्यवस्था**

अहिल्यादेवीचे प्रशासन हे पारदर्शक व निष्कलंक असे होते. स्वतःपासूनच त्यांनी परिवर्तन कार्यास सुरू केले. एकदा राज्यात सर्वत्र यासारख्या चो-या, लूटमार, दरोडेखोरी, अशा घटनांनी थैमान घातले होते सारी जनता अक्षरशः भयभीत झाली होती. तेव्हा अहिल्याबाईनी एक युक्ती केली होती. की "जो कोणी वीर आपल्या राज्यातील चोर, डाकू व दरोडेखोरांचा बंदोबस्त करेल, त्या तरुणाशीच मुक्ताचा म्हणजे माझ्या मुलीचा मी विवाह लावून देईन." अशी जाहीरपणे त्यांनी घोषणा केली. तेंव्हा आदिवासी समाजातील 'यशवंत फणसे' या युवकाने धाडसाने हे पाऊल उचलले आणि त्यांनी काही दिवसांतच सर्व चोरांचा व दरोडेखोरांचा यशस्वी सफाया करून राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करून दाखवले. ठरल्याप्रमाणे अहिल्यांमातेने आपल्या एकुलत्या एका मुलीचा मुक्ताबाईचा आंतरजातीय विवाह यशवंतराव फणसे या वीर युवकाशी लावून समाजात क्रांतीकारी बीज रोवले.

**अहिल्यादेवीचा खंबीर जीवनप्रवास**

अहिल्यादेवी ह्या आपल्या उत्तरायुष्यात येणाऱ्या अनेक वादळांशी मुकाबला करणाऱ्या, खंबीरपणे त्यावर मात करून इतरांना प्रेरणा देणाऱ्या लोकमाता आहेत. आपल्या जवळपास सत्तर वर्षाच्या वाटचालीत १७६६ ते १७९५ पर्यंत २८-२९ वर्षाच्या राज्यकारभारात त्यांच्यावर अनेक संकटं आली, दुःखे आली. त्यांचे पती खंडेराव, सासरे मल्हारराव, मुलगी मुक्ता, जावई यशवंतराव, नातू नथ्योबा, अहिल्याबाईच्या सासू गौतमीबाई, त्यांच्या सवती, त्यांचे दोन सख्खे भाऊ अशा कुटुंबातील एकुण तेवीस जणांच्या निधनाने त्यांच्या डोळ्यासमोर अक्षरशः दुःखाचा डोंगरच कोसळला होता. पण तरीही त्या न खचता, न डगमगता धैर्याने उभ्या टाकल्या. आपले अवघे आयुष्यच त्यांनी जनकल्याणार्थ खर्ची घातले

**समान न्यायाची भूमिका**

अहिल्यादेवींच्या राज्यात सर्वांना समान न्याय होता. सर्वांत शिस्त होती. अपराध्यांना कडक शिक्षा होती मग जुलूम करणा-यांना (मग ते स्वकीय असोत वा परकीय), सर्वांसाठी एकच कायदा होता. त्यांचे प्रशासन हे लोकाभिमुख होते. नऊ वकिल व इतर प्रमुख अधिकारी त्यांनी आपल्या प्रशासन चालवताना विविध खात्यांवर नेमले होते.

**शेती व शेतकऱ्यांसाठी योजना**

शेतक-यांना मोफत बी- बियाणे, खते, कर्जमाफी व करमुक्ती तसेच शेतीसाठी विविध योजना, पर्यावरणाचे रक्षण, जनतेच्या उत्तम, निरोगी अरोग्यासाठी 'औषधपुरवठा केला.

**पेशवा राघोबादादाचे पतन**

राज्यात सर्वत्र शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आपापसात एकतेची भावना,सामाजिक सलोखा राखणे, हेच त्यांच्या प्रशासनाचे ब्रीद होते. यासाठी प्रसंगी घोड्यावर बसून लढाईतही त्या अग्रेसर असत. एकदा एकाकी पडलेल्या अहिल्यादेवींना जेंव्हा अबला समजून पेशव्या राघोबादादाने सत्ता व संपत्तीच्या लालसेने दहा हजारांची फौज घेऊन त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी आला होता तेव्हा त्याला त्यांनी मी ही काही कमी नाही मी काही अबला नाही असे खडसावले व लढाईस सिद्ध झाल्या तेंहा राघोबादादा शेवटी पराभवाच्या भितीपोटी शरण येऊन माफी मागितली. यावरूनच अहिल्यादेवी होळकर ह्या अबला नसून रणरागिनी होत्या हे दिसून येते.प्रजेचे व राज्याचे प्राणपणाने रक्षण करणे हाच माझा धर्म आहे असे सांगणाच्या अहिल्यादेवी होळकर गोरगरिबांच्या कैवारी आणि गद्यारांसाठी कर्दनकाळ होत्या. स्वराज्यातील संपत्तीचा दुरुपयोग व फितूर आपल्या करणा-या व अर्थिक हेराफेरी, लूट कुरणाऱ्यांना त्यांनी माफ केले नाही. प्रजेवर अन्याय करणाऱ्या गब्बरांना त्यांनी जबर दंड दिला. पर्यावरणाची नासाडी चोऱ्यामा-या, लुटमार व वाईट कृत्ये करणा-यांनाही त्यांनी वाऱ्यावर सोडले नाही. आदिवासी, भिल्ल, गौंड व कोरकु या जातीतल्या गुन्हेगारी करणाऱ्यांना त्यांनी वतने देऊन सन्मानाने माणसात आणले. या त्यांच्या न्यायी राजवटीला लोक मनापासून दाद देत होते.

**ब्राम्हण पेशव्यांचे कपट कारस्थाने चालू देणार नाही**

अहिल्याबाईच्या विरुध्द, सतत कारस्थाने रचणा-या राघोबादादा, मोरोबा फडणीस, नाना फडणीस, गंगोबातात्या, बजाबा पुरंदूरे व तसेच विठ्ठल शामराज अशांना त्यांनी वठणीवर आणले. “राघोबादादा तुमची हरामखोरी अजिबात चालू देणार नाही.” असे खडसावून सांगितले.” “हे राज्य माझ्या पूर्वजांनी तलवारीच्या बळावर रक्ताचे पाणी करून जिंकले आहे, भाटभडवेगिरी करून नव्हे.” असे सांगून त्या पुढे म्हणतात की, “माझ्या पुर्वजांनी मिळवलेल्या स्वराज्यासाठी माझे रक्त सांडले तरी चालेल, परंतु देशद्रोही ब्राम्हण पेशव्यांचे कपट कारस्थानं चालू देणार नाही.” असे त्यांनी ठणकाऊन सांगितले.

**शिक्षणप्रसार, उद्योग, साहित्य व कलावंतांना राजाश्रय**

राजकारण, प्रजापालन, न्यायदान, धर्मकार्य,सांस्कृतिक कार्य, युद्ध, साहित्यक्षेत्र अशा सर्वच क्षेत्रात मौलिक स्वरूपांचे त्यांचे योगदान होते. शिक्षण प्रसारासाठी त्यांनी विद्यालये काढून गरजूंसाठी मोफत व्यवस्था केली. महेश्वर संस्थानात कापड गिरणीही सुरु करून रोजगार उपलब्ध करुन दिला.तसेच मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील एक पंडीत कवी मोरोपंत, प्रसिद्ध शाहीर ‘अनंत फंदी’ तसेच संस्कृत साहित्याचे विद्वान ‘खुशालीराम’ या सर्वांनाच त्यांनी आपल्या दरबारात सन्मानाने आश्रय देऊन त्यांना नियमित वेतन सुरु केले व त्यांच्या कलेची आणि साहित्याची दखल घेतली. अहिल्यादेवीचे महेश्वर दरबार हे संगीत व साहित्य कलेचे माहेरच होते. इथे अनेक संगीतकार व साहित्यक्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना त्यांनी राजाश्रय दिला. यावरूनच त्यांना कला व साहित्याची किती जाण होती हे समजते.

अहिल्याबाईंचे कार्य हे संकुचित नव्हते तर ते ‘असेतूहिमाचल’ असे होते. हिमालयाच्या केदारनाथा पासून ते दक्षिणेच्या रामेश्वरापर्यंत, पूर्वेच्या जगन्नाथ पुरीपासून ते पश्चिमेच्या द्वारकेपर्यंत त्यांचे, कार्यक्षेत्र विस्तृत होते त्यांनी आपल्या भोवती प्रचंड माणसे जोडली ती टिकवली. जाट, रजपूत, शीख, इंग्रज, पेशवे वगैरे त्यांचा सल्ला घेत असत.इतकी त्यांची दुरदृष्टी व्यापक होती.

**अहिल्यादेवींचे धार्मिक व समाजोपयोगी कार्य**.

आयुष्याच्या अखेरपर्यंत अहिल्यादेवींनी भरीव असे कार्य केले आहे. सबंध भारतभर त्यांनी अनेक मंदिरे,धर्मशाळा, आश्रमव्यवस्था, नद्या, घाट, कुंड्या, रस्ते, विहिरी, अन्नछत्रे, दवाखाने इ.चे जीर्णोध्दार केले व काही नवीन उभारले. त्यांचे सर्वसमावेशक कार्य देशी व परदेशी इतिहासकार, चरित्रकारांनी व राज्यकत्यांनीसुध्दा वाखाणले आहे. त्यांच्या कार्याचा आवाका पाहिला तर अतिशय थक्क करणारा आहे. अयोध्या, सुलतानपुर, नाशिक, भूसावळ, द्वारका, गया (म.प्र.) जेजुरी, पंढरपूर उदयपूर, चौंडी 'इ. ठिकाणी त्यांनी नवीन मंदिरे बांधली. गुजरातमधील सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, काशी महाकाळेश्वर, औंढा नागनाथ येथील जुन्या मंदिरांची डागडुजी करून त्या मंदिरांचा अहिल्यादेवींनी जीर्णोध्दार केला. तसेच त्यांनी तिथे व अनेक ठिकाणी घाटही बांधले. त्यामध्ये वाराणसी, पुणतांबे, काशी, मंडलेश्वर, प्रयाग व चौडी इ. घाटांचा समावेश होतो. पुढे वृंदावन येथे एक त्यांनी ५७ पाय-या असलेली प्रशस्त विहिर बांधली. सातारा व नाशिक येथेही दोन विहिरी बांधल्या.तर निफाड ,बद्रीनारायण, केदारनाथ, व नाशिक जिल्हयात रावेर येथील कुंडी त्यांनी बांधल्याची नोंद मिळते.

अनेक वास्तू व वाडेही त्यांनी बांधले. गोरगरीब व यात्रेकरूंची सोय हावी म्हणून सप्तश्रृंगी, मथुरा, उज्जैन, अमरकंटक, भरतपुर, हरिद्वार, रामेश्वर इ.ठिकाणी धर्मशाळांची बांधकामे त्यांनी केले. दूरवरून आलेल्या यात्रेकरू व प्रवाशांची तहानभूक भागावी यासाठी त्यांनी पाणपोई व मोफत अन्नछत्रे कायमस्वरूपी चालू केल्या, त्यामध्ये पैठण, सुलपेश्वर, द्वारका, चिखलदरा, महाबळेश्वर व इतर ठिकाणांचा उल्लेख येतो.

प्रवाशाच्या सोईसाठी त्यांनी मालेगाव, त्र्यंबकेश्वर वगैरे ठिकाणी पुल ही त्यांनी बांधले. ते आजही मजबूत आहेत. त्यांनी जेजुरी, त्र्यंबकेश्वर येथे मोठे तळे बांधून तेथील शेतीचे हजारो एकर क्षेत्र सिंचनाखाली आणले.

**अहिल्यादेवींची दानशूर वृत्ती**

अहिल्यादेवींची दान करण्याची वृत्ती तर छत्रपतींच्या उदार विचाराची साक्ष देते. मंदिरे वा दर्गा असो त्यांनी त्यात भेद केला नाही. जांबगावच्या रामदास स्वामीच्या मठालाही त्यांनी इनाम दिले. तसेच पंढरपूर तुळजापुर, कोल्हापूर, द्वारका, जगन्नाथपुरी येथील मंदिराचे व नेपाळमधील पशुपतीनाथाच्या मंदिर व पूजा-यांच्या उत्तम सोईसाठी भरभरुन अनुदान दिले. चित्रकूट, भीमाशंकर आदि ठिकाणच्या पुजा-यांच्या उपजिवीकेचा प्रश्न त्यांनी इनाम व अनुदान देऊन सोडवले.

आपले सासरे मल्हारराव होळकर, सासू गौतमीबाई, पती खंडेराव, मुलगी मुक्ता, जावई यशवंतराव, मुलगा मालेराव, नातू नथ्थोबा यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ आलमपूर, ओंकार, जेजुरी, कुंभेरी येथे त्यांनी छत्र्या बांधून सन्मान केला. वरील प्रमाणे त्यांच्या कार्याची व्याप्ती पाहता त्यांचे कार्यकर्तृत्व किती उच्चकोटीचे व दीपस्तंभाप्रमाणे होते हे कळते.

**अहिल्यादेवींबद्दल विविध मान्यवर लेखक व विचारवंतांचे गौरवोद्गार**.

मराठा सेवा संघाचे संस्थापक, मान्यवर विचारवंत पुरुषोत्तम खेडेकरांनी आपल्या 'आहिल्यादेवी होळकर' या पुस्तकात म्हटले आहे की, "अहिल्यादेवी ह्या भारतीय इतिहासास मिळालेली प्रचंड मोठी देणगी आहे व पुढे भारतातील राजांनी अहिल्यादेवींचे अनुकरण करून जर रयत व राज्य राखले असते तर भारतावर कधीही पारतंत्र्य आले नसते असे स्पष्ट मत नोंदवून दुर्दैवाने त्यांचे पुढचे वंशज अहिल्यादेवींनी घालवून

दिलेली शिस्त पाळू शकले नाहीत याची खंतही खेडेकर व्यक्त करतात. तर डॉ. महेश खरात आपल्या 'राजमाता अहिल्याबाई होळकर' या ग्रंथात आधुनिक भारताच्या इतिहासात अहिल्याबाईंचे एक आगळे-वेगळे स्थान आहे. असे सांगून त्यांनी दाखविलेल्या कर्तृत्वाला जोड नाही अन् तोडही नाही. असे ते म्हणतात. मल्हारराव होळकरांच्या मृत्युसमयी खजिन्यात सुमारे सोळा कोटी रू. होते. एवढ्या या अमाप संपत्तीची मालकीण असतांनाही या संपत्तीचा दुरुपयोग करावा असा विचार सुद्धा अहिल्यादेवींच्या मनात आला नाही याउलट खाजगी संपत्तीही त्यांनी जनतेच्या कल्याणासाठीच वापरून समाजात एक आदर्श निर्माण केला असल्याचे सांगून डॉ. खरात हे अहिल्यादेवीच्या व्यक्तीमत्वाची महानता सिद्ध करतात.

"अहिल्यादेवींनी आपल्या प्रजेला पुत्रवत मानून त्यांचे मनोभावे संगोपन, संवर्धन व संरक्षण केले. राजकारण करताना त्यांनी वैयक्तिक दुःखाची कधीच पर्वा केली नाही, कुठल्याही कर्तव्यात कसूर अथवा तडजोडही केली नाही. सून, पत्नी, माता, प्रजावत्सल राणी ही सर्व नाती अहिल्यादेवींनी उत्तम तऱ्हेने पार पाडल्या" असे त्यांच्याबद्दलचे गौरवोद्गार 'मुक्ता केणेकर' या सिध्दहस्त लेखिकेने आपल्या 'लोकराज्ञी अहिल्याबाई होळकर 'या पुस्तकात काढले आहेत. एकंदरीतच त्यांच्या अजोड व्यक्तीमत्व व महान अशा कार्याबद्दल एक प्रसिद्ध लेखिका व चरित्रकार 'विनया खडपेकर आपल्या 'ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर' या ग्रंथातून कवितेच्या मोजक्या व सुंदर शब्दांत पण व्यापक अर्थाने अहिल्यादेवींच्या अलौकिक जीवनाचे सार सांगतांना म्हटले आहे...

"ती सत्ताधारी होती पण ती सिंहासनावर नव्हती,
ती राजकारणी होती, पण ती सत्तेच्या चढाओढीत नव्हती.
ती पेशव्यांशी निष्ठावंत होती, पण ती त्यांच्यापुढे नतमस्तक नव्हती.
ती व्रतस्थ होती, पण ती संन्यासिनी नहती,
जेंव्हा लढाई हे जीवन होते, आणि लूट हा जेत्यांचा धर्म होता, हुकमत हा सत्तेचा स्वभाव होता.
तेव्हा- तिच्या कल्याणी प्रतिभेचे किरण नदीवरच्या घाटांवरून उमटले.
तिच्या जीवनदायीनी प्रेरणेने तळी, अन्नछत्रे, धर्मशाळांचे रूप घेतले.
तिच्या अनाक्रमक धर्मशिलतेचे मंगल प्रतिध्वनी भरतखंडाच्या मंदिरा-मंदिरातून घुमले.
मात्र ती सर्वगुणसंपन्न देवता नहती. तिला राजकारणाच्या सगळ्या मर्यादा होत्या.
अठराव्या शतकातल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या पटावर ती शुक्राच्या चांदणीसारखी लुकलुकली!"

**समारोप**

अहिल्यादेवींचे जीवन व कार्य एक धगधगता इतिहास आहे.आधुनिक काळातील अनेक विपरीत समस्या व संकटात सापडून ग्रासलेल्या समाजाला योग्य दिशा फक्त अहिल्यादेवी होळकरांच्या जीवनचरित्रातूनच मिळेल असा आत्मविश्वास बाळगून या महान, लोककल्याणकारी,अलौकिक, मुत्सद्दी व बाणेदार वृत्तीच्या लोकमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करतो.

**संदर्भग्रंथ/सूची**

1. जहागीरदार विजया, 'महाराष्ट्राचे शिल्पकार तेजस्विनी अहिल्याबाई होळकर' – म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
2. खडपेकर विनया, ' ज्ञात- अज्ञात अहिल्याबाई होळकर' – राजहंस प्रकाशन, पुणे.

3. पाटील अजित, ‘जकल्याणी अहिल्याबाई होळकर’ – संस्कृती प्रकाशन पुणे.
4. खेडेकर पुरूषोत्तम, ‘लोकमाता अहिल्यादेवी होळकर’ – सनय प्रकाशन, पुणे.
5. केणेकर मुक्ता, ‘लोकराज्ञी अहिल्याबाई होळकर’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
6. निकम प्रा.गौतम, ‘तेजस्विनी’ – विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगांव.
7. लेले सुमती, ‘अहिल्याराणी होळकर’ – लोकवाङ्मय गृह, मुंबई.
8. लोही डॉ.म.ना. ‘अहिल्याबाई होळकर चरित्र आणि कार्य’ – नाथे पब्लिकेशन.
9. पाटील मृण्मयी, ‘अहिल्याबाई होळकर’ – शब्दालय प्रकाशन,पुणे.
10. खरात डॉ.महेश, ‘राजमाता अहिल्याबाई होळकर’ – कैलाश पब्लिकेशन,औरंगाबाद.
11. माने उज्ज्वलकुमार, ‘रणरागिणी अहिल्यादेवी’ – यशोदीप पब्लिकेशन, पुणे.

# पुण्यश्लोक: अहिल्यादेवी होळकर यांच्या समाजकार्याचा अभ्यास

**नारायण बाबुराव भारती**

अहिल्यादेवी होळकर, ज्यांना "पुण्यश्लोक" म्हणून ओळखले जाते, भारतीय इतिहासात एक अनोखी जागा मिळवून आहेत. त्यांच्या जीवन कार्यावर महाराष्ट्रात अनेक साहित्यिक व विचार वंतांनी लेखन केले आहे. कारण त्यांची कार्य प्रणाली ही मोहक आणि विकासास गती देणारी होती. १७२५ साली महाराष्ट्रातील छोट्याशा चोंडी गावात जन्मलेल्या अहिल्यादेवी पुढे मालवा राज्याच्या राणी झाल्या. १७६७ ते १७९५ या त्यांच्या राज्यकाळात प्रशासनिक कौशल्यासोबतच समाजकल्याण क्षेत्रातही त्यांचे अतुलनीय योगदान दिसून येते. न्याय, करूणा आणि प्रभावी प्रशासन यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून त्यांचे जीवन आणि कार्य आजही प्रेरणादायी आहे. या लेखात त्यांच्या समाजकार्याचा आढावा घेतला असून, त्यांच्या उपक्रमांनी एक समृद्ध व सुसंवादी समाज कसा घडवला, हे उलगडण्यात आले आहे.

**पार्श्वभूमी आणि सत्तेची वाटचाल**

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला आणि त्यांना औपचारिक शिक्षण मिळाले नाही. तरीही त्यांची तीव्र बुद्धिमत्ता आणि भक्तिभावाने मराठा साम्राज्यातील प्रमुख सरदार मल्हारराव होळकर यांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यांनी अहिल्यादेवींना आपल्या सुनेचे स्थान दिले. त्यांच्या पती खंडेराव होळकर यांच्या अकाली निधनामुळे त्यांचे जीवन शोकमग्न झाले, परंतु त्यांनी आपल्या लोकांसाठी समर्पण आणि जिद्दीने मल्हाररावांकडून राज्यकारभाराचे धडे घेतले. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर, सामाजिक प्रतिरोधावर मात करत, त्यांनी मालवा राज्याचा गादीवर आरूढ होऊन एक कुशल व दूरदृष्टी नेता म्हणून स्वतः सिद्ध केले.

**पायाभूत सुविधांची उभारणी**

अहिल्यादेवी होळकर त्यांच्या भव्य पायाभूत सुविधांच्या योगदानासाठी विशेषतः ओळखल्या जातात. त्यांनी आपल्या प्रजेसाठी आणि अध्यात्मिक कल्याणासाठी विस्तृत बांधकाम प्रकल्प हाती घेतले. त्यांच्या राज्यकाळात किल्ले, विहिरी, रस्ते आणि धर्मशाळा बांधण्यात आल्या. त्यांच्या सार्वजनिक सुविधांवरील भरामुळे मालव्यातील लोकांना स्वच्छ पाणी, सुरक्षित रस्ते आणि आश्रय मिळू शकला.

काशीच्या विश्वनाथ मंदिराचे पुनर्निर्माण, गुजरातमधील सोमनाथ मंदिराचे पुनर्बांधणी तसेच गया, मथुरा, अयोध्या यांसारख्या अनेक पवित्र स्थळांचे जीर्णोद्धार हे त्यांच्या उल्लेखनीय कामांपैकी होते. या योगदानाने त्यांनी भारताच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारशाला बळकटी दिली.

**कृषी सुधारणा**

अहिल्यादेवींनी कृषीला अर्थव्यवस्थेचा कणा मानून शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांनी जमिनीचे समतोल वाटप व न्याय्य कर प्रणाली लागू केली. तसेच, व्याजमुक्त कर्जे आणि सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. या उपक्रमांमुळे दुष्काळ व पिकांच्या नुकसानीच्या काळातही शेतकऱ्यांना आधार मिळाला व राज्यात आर्थिक स्थिरता प्रस्थापित झाली.

**महिलांचे सशक्तीकरण**

अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्री सक्षमीकरणाच्या क्षेत्रात एक नवा आदर्श घालून दिला. त्यांनी महिलांना आर्थिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले आणि त्यांना व्यापार व हस्तकलेत संधी उपलब्ध करून दिल्या. स्वतःच्या नेतृत्वाद्वारे त्यांनी महिलांच्या भूमिकेवरील पारंपरिक अपेक्षांना आव्हान दिले.

त्यांच्या न्याय प्रणालीत महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला. घरगुती हिंसाचार आणि अन्य शोषणाच्या प्रकारांवर कडक कायद्यांची अंमलबजावणी केली. त्यांच्या या धोरणांनी स्त्री-पुरुष समतेला आणि न्यायाला प्राधान्य दिले.

**शिक्षण आणि सांस्कृतिक जतन**

औपचारिक शिक्षणाचा अभाव असूनही, अहिल्यादेवींनी ज्ञानाच्या परिवर्तनकारी शक्तीची जाणीव ठेवली. त्यांनी शाळा स्थापन केल्या आणि जात व लिंगभेद न करता शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या संरक्षणामुळे विद्वान, कवी आणि कलाकार यांना आपले कार्य पुढे न्यायला प्रेरणा मिळाली.

कलाविषयक व साहित्य क्षेत्रातील त्यांच्या प्रोत्साहनामुळे मालवा सांस्कृतिक पुनर्जागरणाचा केंद्रबिंदू बनला. त्यांच्या दरबाराने वैचारिक व सर्जनशील उपक्रमांना आश्रय दिला आणि भारतीय सांस्कृतिक इतिहासाला समृद्ध करण्यासाठी मोलाची भर घातली.

**आरोग्यसेवा उपक्रम**

अहिल्यादेवींच्या समाजकल्याणाच्या दृष्टिकोनात व्यापक आरोग्यसेवा उपक्रमांचा समावेश होता. त्यांनी रुग्णालये व औषधालये स्थापन करून आपल्या प्रजेसाठी मोफत वैद्यकीय सेवा पुरवल्या. पारंपरिक आयुर्वेदिक उपचार पद्धतींसोबत आधुनिक वैद्यकशास्त्रालाही त्यांनी पाठिंबा दिला.

साथीच्या रोगांचा मुकाबला करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांच्या सुधारासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांनी क्रियाशील प्रशासनाचा आदर्श घालून दिला. दानशूर रुग्णालये आणि संकटाच्या वेळी जीवनावश्यक वस्तूंचे वितरण ही त्यांच्या करुणामय नेतृत्वाची प्रतीके आहेत.

**न्याय आणि प्रशासकीय सुधारणा**

अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रशासनाचे वैशिष्ट्य म्हणजे न्याय व कार्यक्षमतेचा मिलाफ. त्यांनी स्वतः आपल्या प्रजेशी तक्रारी ऐकून त्यांचे निराकरण केले आणि त्यांचा विश्वास व निष्ठा मिळवली. त्यांच्या न्याय व्यवस्थेमध्ये निष्पक्षता आणि तातडीने न्याय मिळवून देण्यावर भर होता.

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी त्यांनी प्रभावी प्रणाली आणल्या आणि प्रशासनात पारदर्शकता राखली. गुणवत्तेच्या आधारावर निवडलेल्या मंत्रिमंडळाच्या सहकार्याने त्यांनी लोककल्याणाला प्राधान्य देणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी केली.

**अध्यात्मिक नेतृत्व आणि दानशूरता**

अहिल्यादेवींचे जीवन अध्यात्माशी घट्ट जोडलेले होते, ज्याचा प्रभाव त्यांच्या राज्यकारभारावर दिसून येतो. त्यांनी राजकर्तीची भूमिका लोकसेवेचा पवित्र धर्म मानली. गरीबांना अन्नदान करणे, धार्मिक उत्सवांचे आयोजन करणे यांसारख्या त्यांच्या विविध दानशूर उपक्रमांनी समाज उन्नतीसाठी त्यांची बांधिलकी दर्शवली. त्यांचे धार्मिक स्थळांच्या पुनरुज्जीवन व देखभालीचे प्रयत्न केवळ हिंदू स्थळांपुरते मर्यादित

नव्हते. त्यांनी मशिदींच्या उभारणीतही सहभाग दर्शवला, धार्मिक सलोखा आणि सर्वसमावेशकतेसाठी त्यांची वचनबद्धता दर्शवली.

**वारसा आणि प्रभाव**

अहिल्यादेवी होळकर यांच्या राज्यकारभाराने चांगल्या प्रशासन व सामाजिक जबाबदारीचे आदर्श स्थापित केले. त्यांच्या धोरणांनी व उपक्रमांनी मालव्याची समृद्धी वाढवली आणि संपूर्ण भारतभरातील शासकांना प्रेरित केले. प्रशासनिक कार्यक्षमतेसोबतच करूणेच्या बळावर त्यांनी मिळवलेले यश त्यांना "पुण्यश्लोक" ही उपाधी देण्यासाठी पात्र ठरवते, जी त्यांच्या सद्गुणी आणि आदर्श जीवनाचे प्रतीक आहे.

त्यांनी स्थापन केलेल्या संस्था, पुनर्निर्मित मंदिरे आणि घडवलेली माणसे यांतून त्यांचा वारसा आजही जिवंत आहे. अहिल्यादेवींची कथा नैतिक नेतृत्वाची ताकद आणि निःस्वार्थ सेवेतून निर्माण होणाऱ्या चिरस्थायी परिणामांची आठवण करून देते.

**निष्कर्ष**

अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आणि कार्य न्याय, करूणा आणि प्रभावी प्रशासनाचे आदर्श उदाहरण आहे. पायाभूत सुविधा, कृषी, महिलांचे सशक्तीकरण, शिक्षण, आरोग्यसेवा आणि सांस्कृतिक जतन यातील त्यांच्या योगदानाने त्यांच्या समाजकल्याणाच्या बहुआयामी दृष्टिकोनाचे दर्शन घडवले. राजकर्ती, सुधारक आणि अध्यात्मिक नेत्या म्हणून अहिल्यादेवींनी भारतीय इतिहासात अमिट ठसा उमटवला. त्यांचा वारसा आजही पिढ्यान् पिढ्या प्रेरणा देतो आणि नेतृत्व व मानवतेचे मौल्यवान धडे देतो.

**संदर्भ**

1 शिवाजी सावंत लिखित "अहिल्या बाई होळकर: होळकरांची राणी".

2 शोभा के. राणी यांचे "अहिल्याबाई होळकर: अ लाइफ"

3.आर सी मजुमदार लिखित "माळव्याची राणी: अहिल्याबाई होळकर".

4 विश्वास पाटील यांचे "अहिल्याबाई होळकर: एक मराठा आयकॉन".

5 लोकराज्य मासिक

6 योजना मासिक

# "पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर एक जीवन प्रवास"

**सौ. प्रिया नितीन उपासनी**
माहीम मनपा माध्यमिक शाळा माहीम

**"यत्र नार्यस्तु पूजते**
**रमन्ते तत्र देवता"**

जेथे स्त्रियांची पूजा केली जाते मान दिला जातो तिथे देवता आनंदाने राहतात जेथे' त्यांना मान दिला जात नाही तेथील सर्व कार्य निष्फळ होतात. भारतात अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या त्या स्त्रियांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. ज्यांच्या मनगटात बळ, बुद्धी, चातुर्य आहे तोच स्व कर्तुत्वावर राजा होऊ शकतो असा संदेश देणाऱ्या ते एकमेव द्वितीय होत. मग अशा या अहिल्याबाईंचे कार्यकर्तृत्व केवळ एका गोष्टी पुरते मर्यादित नसून सर्व समभाव अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता स्त्री पुरुष समानता गोरगरिबांविषयी वाटणारा कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बीमोड, मूल दत्तक वारसा हक्क प्रजेविषयी तळमळ असे कितीतरी सामाजिक आयाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडले गेले आहेत.

अहिल्याबाई होळकरांचा जन्म 31 मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील "चौंडी" या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशिलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला. आई-वडिलांचा आपल्या मुलांना घडवण्यात खारीचा वाटा असतो त्याप्रमाणे माणकोजी शिंदे यांनी त्या काळात शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील अहिल्याबाईंच्या शिक्षणाची घरीच व्यवस्था केली होती. अवघ्या आठ वर्षाच्या असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजश्री मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक मुलगा "खंडेराव होळकर" यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह दिनांक 20 मे 1733 रोजी पुण्यातील शनिवार वाडा येथे झाला.

लग्नानंतर आपल्या चतुर व शांत स्वभावाने त्यांनी सर्वांना आपलेसे केले त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. मल्हार रावानी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळात सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे वाचणे गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या तसेच घोड्यावर बसणे ,दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी गोष्टींचे प्रशिक्षण दिले.

परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धि परिपक्व झाली. इसवी सन 1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याबाईंचा शूर वीरपती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी त्यांना वैधव्य आले. पूर्वीच्या काळी नवरा गेल्यानंतर सती जाण्याची पद्धत होती पण रूढी परंपरेनुसार त्यांनी सती न जाता जे मनोधैर्य दाखवले ते अलौकिकच म्हणावे लागेल. एक प्रजाहित दक्ष राजा कसा असतो? तो लोकांचा कसा विचार करतो? याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होत.

"आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल" हा विचार करून प्रजेच्या हितासाठी ज्यांनी जगण्याचा निर्णय घेतला. धर्म, रूढी,

परंपरा या पलीकडे "कर्तव्य" महत्त्वाचे असते हे सिद्ध केले आणि कल्याणकारी राज्याची मुहूर्तमेढ रोवली. मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर 29 वर्षे अत्यंत यशस्वीपणे खऱ्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या जातात हे त्यांनी दाखवून दिले. सासरे मल्हाररावांचा मृत्यू 20 मे 1766 मुलगा मालेगाव चा मृत्यू 27 मार्च 1767 मध्ये झाला अशी एका मागून एक संकटे कोसळत असताना त्या डगमगल्या नाहीत "प्रजेचे हित प्रथम कर्तव्य" या न्यायाने आपली प्रजा सुखी समाधानी संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार मागे सारून धर्मनिरपेक्षता स्वातंत्र्य समता, बंधुता, न्याय या मूल्यांचा अंगीकार करून त्यांनी राज्य केले.

रघुनाथराव पेशवे यांना या होळकर साम्राज्याचा लोभ सुटला त्यांनी पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन व्हावे म्हणून 50 हजाराची फौज घेऊन इंदोरवर चढाई केली हे वृत्त कळताच त्यांनी रघुनाथ रावांना खरमरीत खलिता पाठवला. आपले लोक कल्याणकारी कार्य हे केवळ इंदोरपुरतेच मर्यादित न ठेवता संपूर्ण भारतात त्यांचे कार्य पसरले आहे

भारतातील अनेक विहिरी तलाव, कुंड घाट, रस्ते, पुल निर्माण केले आहेत. उद्योगधंदाच्या विकासाला प्रथम प्राधान्य दिलं आहे. मल्हार रावांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानाची राजधानी "महेश्वर" या ठिकाणी आणून कारागीर मजूर, विणकर, कलावंत साहित्यिक अशा गुणी लोकांसाठी त्यांच्या विकासासाठी जमीन पैसा  घर या सोयी त्यांनी उपलब्ध करून दिल्या.

एखादी व्यक्ती माणसाबरोबर सूक्ष्म जीवाचा किती विचार करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होत. मुंग्यांना साखर, माशांना कणकेचा गोळा उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना कपडे याची त्यांनी सोय केली. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे चालवली. घाट बांधताना केवळ तज्ञांची मते विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलावून घाटाच्या पायऱ्या कशा असाव्यात? कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोईस्कर पडेल कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? या आणि अशा बारीक तपशीला सह घाट बांधून घेतले इतकेच नव्हे तर सर्वधर्म समभावाचा आदर्श जोपासत मंदिरे मशिदी, दर्गे, विहार बांधले.

राष्ट्रीय एकात्मता कशी जोपासायला हवी याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होत. अहिल्याबाई या समाजसुधारक होत्या हे आणखी एखाद्या उदाहरणावरून स्पष्ट होते. त्यांच्या राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या "यशवंत फणसे" या बहादूरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एका मुलीचा आंतरजातीय विवाह लावून त्यांनी जातीभेदाला तडा दिला. धर्मातील रूढी परंपरा यांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही "मानवता धर्म" हाच खरा धर्म असे मानून त्यांनी आचरण केले. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग लोककल्याणासाठी केला. त्यांचे कार्य केवळ इंदोर, महेश्वर पुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारतात त्यांनी लोककल्याणात्मक कामे केली. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्या "लोकमाता" म्हणून प्रसिद्ध झाल्या त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा पुढील ओळीतून उद् धृत होतो.

**मधुर होती जिची वाणी, अशी**
**जन्मली तत्वज्ञानी राणी, गाजवल्या**
**जिने दिशा दाही, तिच्या उत्तुंग**

**कार्याला खरंच सीमा नाही ,सुखात**
**नांदली आमची जनता, कारण उत्तम**
**शासन तत्त्वज्ञानी राणी होती**
**अहिल्या राजमाता.**

अशा या प्रजाहितदक्ष, सुशासक, न्यायदायिनी पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा मृत्यू 13 ऑगस्ट 1795 रोजी झाला

त्यांच्या या महान कार्याला माझा शतशः प्रणाम.।

**संदर्भ पुस्तके**

1. महती संतांची
2. अहिल्याबाई चरित्र _ श्री पुरुषोत्तम
3. विकिपीडिया गुगल

# अहिल्यादेवी होळकर : एक राजकीय दृष्टिक्षेप

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
सहयोगी प्राध्यापकव राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली – 441207

**प्रस्तावना :-**

अहिल्याबाई होळकर यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात एक कुशल प्रशासक म्हणून सुवर्णाक्षरात लिहिले गेले आहे. त्यांनी अठराव्या शतकात इंदूर संस्थानाच्या प्रशासकीय व्यवस्था सुधारण्यासाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी होळकर राज्याचे व्यवस्थापन प्रजाहित धार्मिक पुनरुत्थान व सामाजिक सुधारणा यावर विशेष भर दिला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर इ. स. 1667 ते इ.स. 1795 या भारतातील माळव्याच्या 'तत्त्वज्ञानी महाराणी' म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलवली. मल्हार रावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी माळव्यावर राज्य केले. "इंग्रजी लेखक लारेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या 'कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट' यांच्याशी एकत्रित तुलना केली आहे" [1] त्याने म्हटले आहे की, ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल त्यावेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्वप्रथम लिहिले जाईल.

**मूळ शब्द :-** प्रजाहितदक्ष, सुधारणावादी, धार्मिक कार्य , न्यायप्रिय शासक, आर्थिक सुधारणा

**जीवन परिचय :-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला त्यांचे वडील मानकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकविले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस येथे थांबले होते. अख्यायिकेनुसार आठ वर्षाच्या अहिल्यादेवींना मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले. अहिल्यादेवीचे पती खंडेराव होळकर हे इ. स. 1754 मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. बारा वर्षानंतर मल्हारराव होळकर मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई धनगर समाज साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

**न्यायप्रिय शासक :-**

अहिल्याबाई या अत्यंत न्यायप्रिय होत्या. त्यांच्या दरबारात सर्व जाती, धर्माचे लोक न्याय मिळविण्यासाठी येऊ शकत होते. न्यायदान करताना त्यांनी लोकांच्या हिताचा विचार केला. त्या स्वतः दररोज न्यायालयात येऊन जनतेच्या समस्या ऐकत आणि तत्काळ निर्णय देत असत. इ. स. 1765 मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान मल्हाररावांनी अहिल्याबाईच्या कर्तुत्वाबाबत लिहितात, "चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा, तेथे तुम्ही 4-5 दिवस मुक्काम करू शकता, तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा. कूच करताना मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा." अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. याला माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत असे म्हणतात.

**प्रजाहितदक्ष :-**

पेशव्यांच्या परवानगी नंतर मल्हाररावाचा दत्तक पुत्र तुकोजीराव होळकर यास सैन्याचा मुख्य करून अहिल्यादेवी होळकर यांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही.

त्या रोज जनतेचा दरबार भरवीत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदा तीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही इंदूर या खेड्याचा विकास करून त्यांचे सुंदर मोठे शहरात रूपांतर करणे हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरामध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू राहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या. अहिल्याबाईंनी आपल्या प्रजेच्या हिताचा विचार करून अनेक उपाययोजना केल्या. त्यांनी आपल्या राज्यात शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नाही याची खात्री केली. पाण्याचे स्त्रोत, रस्ते, मंदिराच्या देखभालीचे काम त्यांनी वेळोवेळी केले.

**जनसेवेचे व्रत :-**

भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकर यांनी केलेल्या बांधकामाची यादी आहे. अहिल्यादेवीस सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालवीला होता. अहिल्यादेवींनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या, त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यास मदत केली. अहिल्यादेवीच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊन शकत असे. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून सन 1996 मध्ये इंदूरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो दरवर्षी जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुख यांना दिला. तसेच इंदूर येथील विश्वविद्यालयाला व सोलापूर विद्यापीठाला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' हे नाव आहे. अहिल्याबाई होळकर यांनी जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापन याकडे विशेष लक्ष दिले. त्यांनी अनेक जलाशय, तलाव आणि बंधारे बांधले. पाण्याची समस्या सोडविण्यासाठी त्यांनी नदीजोड प्रकल्प हाती घेतले ज्यामुळे सिंचनास मदत झाली आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले.

**सांस्कृतिक कार्याला चालना :-**

महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्यसंगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशाली राम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला होता. कारागारांना, मूर्तीकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणी पण सुरू केली. 19 व्या व 20 व्या शतकातील भारतीय इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार मानतात की, अहिल्यादेवी होळकरास माळवा व महाराष्ट्रात त्या काळी व आताही संताचा सन्मान दिला जातो. राजकारणातील बारकावे व तत्व व्यवहारिक नीती, नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या ही ख्याती. अहिल्याबाई या धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या खूप प्रगल्भ होत्या. त्यांनी अनेक मंदिरे, धर्मशाळा आणि घाटांची बांधणी केली. काशी, विश्वनाथ मंदिराचा जिर्णोद्धार, रामेश्वर मंदिराची पुनर्बांधणी हे त्यांच्या महान कार्याचे उदाहरण आहे. त्यांच्या कारकीर्दीत हिंदू धर्माचे महत्त्वपूर्ण स्थळे पूर्ण स्थापित करण्यात आली. अहिल्याबाईंनी भारतातील अनेक ठिकाणी मंदिराचे बांधकाम केले. विशेषता काशी, सोमनाथ, गया, रायेश्वरम, जगन्नाथ, पुरी यासारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये त्यांनी धर्मशाळा, घाट, मंदिर व धर्मपिठ बांधले.

**सुधारणावादी कार्य :-**

ज्या काळात दळणवळणाची अत्यल्प सोय अशा खडतर स्थितीत भारतातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे, धर्मशाळा, तलाव, विहिरी, पाणीपाई, घाट अशी अनेक समाजोपयोगी कामे केली. आज ही वस्तुशील्प व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साथ देत उभी आहेत. वास्तुशिल्पे व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याचबरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चितच अभिमानास्पद आहे.

लोककल्याण व समाजसुधारणा कार्यासोबतच लोकांमध्ये समानता आणण्याचे कार्य करीत सैन्यामध्ये पुरुषांप्रमाणेच महिलांनाही सामावून घेतले म्हणूनच अहिल्यादेवींना समान न्याय करणाऱ्या न्यायदेवता म्हणून ओळखल्या जाते. तसेच 'शेतकरी सुखी तर जग सुखी' या संकल्पनेतून शेतकऱ्यांना जाचक करातून मुक्त केले. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून दिले. इतकेच नव्हे तर प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले. त्या काळात स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला. विधवांना सन्मानाने जगण्याचा हक्क असावा याची त्यांनी काळजी घेतली. सामाजिक अन्याय आणि अनिष्ट प्रथा त्यांनी आपल्या राज्यात कमी केल्या.

**आर्थिक सुधारणा** :-

अहिल्याबाईच्या प्रशासनात आर्थिक सुधारणा महत्त्वपूर्ण ठरल्या. त्यांनी व्यापार, शेती आणि करप्रणालीमध्ये बदल घडवून आणले. शेतकऱ्यांना कर सवलती दिल्या ज्यामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली. व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी कर सवलती आणि सुरक्षित व्यापार मार्ग तयार केले. त्यांनी राज्याच्या आर्थिक विकासासाठी योग्य धोरण अवलंबीले. व्यापाराचा विकास होण्यासाठी त्यांनी व्यापाऱ्यांना प्रोत्साहन दिले. जमिनीचे मोजमाप करून कर संकलनाची पद्धत सुधारली. प्रशासनाबरोबरच अहिल्याबाई होळकर यांनी सैन्य व्यवस्थापनातही निपुणता दाखवली. त्यांनी एक सशक्त आणि प्रशिक्षित सैन्य निर्माण केले. ज्यामुळे त्यांचे राज्य सुरक्षित राहिले त्यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने अनेक वेळा त्यांच्या शत्रूंना पराभूत केले. प्रशासक म्हणून अहिल्याबाईंनी आपल्या सैन्याचे योग्य व्यवस्थापन केले. त्यांनी सुरक्षितता, संरक्षण आणि सैन्याचे प्रशिक्षण यांचा व्यवस्थित विचार केला.

**गुणग्राहकता :-**

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ऐकून अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यासाठी येत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री, पंडित, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजश्रय देत असत. महेश्वर नगरी या त्याकाळी संस्कृती, विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती. धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता त्याकाळी हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत, त्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखले जातात त्याप्रमाणे विद्येचे महत्त्व जाणत असल्याने त्यांच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली व शाळा काढून विद्या प्रसाराचे काम केले.

**अंधश्रद्धा निवारण :-**

या काळात सती जाण्याची पद्धती होती. रामायण व महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाही. असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने 1829 साली राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली. यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टीची प्रचिती आपणास येते. त्याकाळी प्रजेची चोर, दरोडेखार व भिल्ल लुटमार करीत असत. अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमिनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिल्लकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा निर्माण केला.

**अहिल्यादेवीबाबत प्रशंसाद्वोगार :-**

"अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्यांचा राज्यकाळ सुमारे 30 वर्षे चालला, हा एक स्वप्नपत काळ होता. त्या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवन काळात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला" [2] ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते. तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. आपल्या असामान्य कर्तुत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती

आजतागायतची सर्वात शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती."[3] "अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना 'तत्त्वज्ञानी राणी' असे संबोधतात याचा संदर्भ बहुतेक 'तत्त्वज्ञानी राजाभोज' यांच्याशी असावा."[4]

**ब्रिटिशांबाबतचा दृष्टिकोन :-**

अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन 1772 मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे. "वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती वा युक्तीने मारले जाऊ शकतात परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्यांच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा त्यांच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्यांच्या शिकारीस गुदगुल्या करून ठार मारते. असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता त्यांच्यावर मात करणे कठीण आहे." [5]

**उदारतावादी दृष्टिकोन :-**

या इंदूरमधील शासकांनी त्यांच्या अखत्यारित असलेल्या सर्वास चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्याचे उत्पादन केले. "व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहीत होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवींना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही हे बघणे आवडत असे. दूर दूर पर्यंत रस्त्यांच्या कडेला दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे, गरीब घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार सर्व मिळत होते. भिल्ल लोकांना प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत व त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करीत. दुर्दैवाची बाब म्हणजे त्यांच्या कन्येने तिच्या पती यशवंतराव फानसे यांच्या मृत्यूनंतर सती जाणे हे अहिल्यादेवीच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दुःख होते."[6]

**अहिल्यादेवींचा सन्मान** :-

"अहिल्यादेवींच्या सन्मानाप्रीत्यर्थ व स्मृतिप्रीत्यर्थ भारत सरकारने 25 ऑगस्ट 1996 रोजी एक टपाल तिकीट जारी केले."[7] "इंदूरच्या विमानतळाचे नाव देवी अहिल्यादेवी विमानतळ असे ठेवले. इंदूर विद्यापीठास 'देवी अहिल्या विश्वविद्यालय' असे नाव दिले."[8] "महाराष्ट्रातील सोलापूर विद्यापीठाचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ' असे ठेवले. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ 13 मार्च 2024 रोजी महाराष्ट्र सरकारने अहमदनगरचे नामांतर 'अहिल्यानगर 'असे केले." [9] अहिल्याबाई होळकर या फक्त एक शासक नव्हत्या, तर त्या एक आदर्श प्रशासक, कुशल्यत्या आणि सामाजिक सुधारक होत्या. त्यांचे प्रशासन आदर्श मानले जाते आणि आजही त्यांचा आदर आणि सन्मान केला जातो. त्यांच्या नेतृत्वामुळे इंदूर संस्थान एक समृद्ध आणि सुरक्षित राज्य बनले. अहिल्याबाई होळकर यांची प्रशासकीय कार्य त्यांच्या प्रजेवर प्रेम, आदर व न्यायशीलता यांचा उत्तम नमुना होती. त्यांच्या कार्यकाळात राज्यात स्थौर्य सुरक्षा आणि धार्मिक सद्भावना होती.

**संदर्भ :-**


1. विकीपिडिया : "प्रजाहितदक्ष राजमाता अहिल्यादेवी होळकर", mymahangar.com, 9 जून 2019 रोजी मूळ पान पासून संग्रहित
2. नेहरू जवाहरलाल डिस्कवरी ऑफ इंडिया, पान- 304
3. कामत एम. बी. , खेर व्ही. बी., : माल्कम जे. अमेमॉयर ऑफ सेंट्रल इंडिया, "अहिल्यादेवी होळकर वैचारिक राणी", पेज 85 आणि जॉन केय यांच्या इंडिया : अहिस्टोरी, पेज 407
4. जॉन कीम, इंडिया : अहिस्टोरी, पान 407, गार्डन एस. द मराठाज, पान 162
5. जॉन कीम, इंडिया : अहिस्टोरी, पान 425, सरदेसाई जी. एस. रियासत, मुंबई 1925, एम.बी. कामत, व्ही. बी. खेर, 'अहिल्यादेवी होळकर एक वैचारिक राणी' पेज 126
6. डॉ. एनी बेजंट : अहिल्यादेवी अ ग्रेट रुलर, चिल्ड्रेन ऑफ मदरलँड, पान 290 – 291
7. कर्वे स्वाती : कर्तुत्ववान स्त्रिया, उत्कर्ष प्रकाशन पुणे,2014 पेज 37 ISBN 978-81-7425-310-1
8. Banerjee, Shoumojit : "Maharashtra's Ahmednagar to be officially called 'Ahilya Nagar' 2024, ISSN 0971-75IX
9. शेळके, केदारी प्रा, निलेश : "अहिल्याबाई होळकरांचे पीटकेश्वर येथील दोन नवीन शिलालेख", जून 2018
10. विजया जहागीरदार : महाराष्ट्राचे शिल्पकार तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, प्रकाशक महाराष्ट्र सरकार
11. खडपेकर विनया : ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर

# अखिल भारतीयत्व जपणाऱ्या प्रशासक - राजनीतीज्ञ : अहिल्यादेवी होळकर

**श्रीनिवास भोंग**
राज्यशास्त्र विभाग, संगमनेर महाविद्यालय(स्वायत्त), संगमनेर

**सारांश**

अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण सदर शोधनिबंधात करण्यात आले आहे. अहिल्यादेवी होळकर या राजकीय संस्कुती घडविणाऱ्या राज्यकर्त्या होत्या. त्यांचे राज्य हे 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेवर आधारीत होते. अहिल्यादेवी होळकर या एक उत्तम राजनयज्ञ होत्या .त्यांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना राबविली. राज्यकर्त्या म्हणून आपल्या संस्थानापुरता मर्यादित दृष्टीकोन न ठेवता त्यांनी अखिल भारतीयत्व जपण्याचा प्रयत्न केला. आपल्या जीवनकार्यातून त्यांनी राजकीय सिद्धांताची उभारणी केलेली आहे .

**कळीचे शब्द :** राजकीय संस्कृती, राजनय, कायद्याचे राज्य ,कल्याणकारी राज्य

**प्रस्तावना**

अहिल्यादेवी होळकर (जन्म ३१ मे, १७२५ – मृत्यू १३ ऑगस्ट, १७९५) या मध्य भारतातील माळव्याच्या **'तत्त्वज्ञ राज्यकर्त्या'** म्हणून ओळखल्या जातात. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

**राजमाता अहिल्यादेवी : राजकीय संस्कुती घडविणाऱ्या राज्यकर्त्या**

कोणतीही राजकीय व्यवस्था ज्या विशिष्ठ राजकीय मूल्य, श्रद्धा आणि प्रेरणांच्या चौकटीत कार्यरत असते, त्या राजकीय चौकटीला राजकीय संस्कुती असे म्हणतात. अहिल्यादेवींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी फक्त राज्य केले नाही तर त्याला पूरक अशी एक राजकीय संस्कृती घडविण्याचे कार्य केले. सुशासन, विकास प्रशासन या लोकप्रशासनातील संकल्पनाची मुळे अहिल्यादेवींच्या राज्य प्रशासनात दिसून येतात. अहिल्यादेवींचे प्रशासन विकास कार्याला प्राधान्य देणारे आणि मानवी संबंधांना प्राधान्य देणारे प्रशासन होते.

**अहिल्यादेवींचे राज्य : कायद्याचे राज्य**

राजकीय सत्तेसंदर्भात एक विधान आहे - All Power Corrupts and absolute power corrupts absolutely. आधुनिक लोकशाही व्यवस्थेतही हे वाक्य अनेकदा खरे ठरते. मात्र पूर्णपणे राजेशाही असलेल्या काळातही अहिल्यादेविनी हे विधान खोटे ठरविले. आधुनिक स्वरुपाची लिखित राज्यघटना नसली तरी प्रजाहिताचा विचार करणारया नियमांच्या आधारे चालणारी राजसत्ता अहिल्यादेवींनी राबविली. त्यांनी आपल्या सहकार्यांनाही नियमांच्या चौकटीतच अधिकार राबविण्यासाठी प्रोत्साहन दिले.

'कायद्याचे राज्य' हि संकल्पना ब्रिटीश कायदेतज्ञ ए व्ही डायसी यांनी मांडली. या संकल्पनेनुसार सर्व लोक, संस्था,कायद्याचे निर्माते, नेते कायद्यासमोर समान असतात. कायद्याचे राज्य म्हणजे कोणीही

कायद्याच्या वर नाही. कायद्याचे राज्य ही संकल्पना घटनावादाशी संबंधित आहे. भारतीय संदर्भात १८ व्या शतकात अहिल्यादेविनी कायद्याचे राज्य हि संकल्पना प्रत्यक्षात आणली होती .

पुरुषप्रधान संस्कुतीत स्त्री राज्यकर्ती असणे दुर्मिळ. स्त्री राज्यकर्ती आपल्या कलानुसार वागेल यासाठी राजघराण्यातील इतर पुरुष अधिकारी प्रयत्न करण्याची शक्यता अधिक असते. मात्र राजमाता अहिल्यादेवी इतरांच्या कलाने वागणाऱ्या नव्हत्या तर प्रसंगी राजघराण्यातील पुरुष अधिकाऱ्यांना न्यायाने वागण्याची ताकीद दिली .तुकोजी होळकर यांना लिहलेले पत्र, मालोजी होळकर यांच्या संदर्भात केलेले न्यायनिर्णय याची साक्ष आहे .

**अहिल्यादेवी : एक उत्तम राजनयज्ञ**

'अन्य देशांशी संबंध प्रस्थापित करणे व हे संबंध टिकवून ठेवणे' याला आंतरराष्ट्रीय संबंधांच्या परिभाषेत 'राजनय' असे म्हणतात. डिप्लोमसी हा शब्द आपल्याला परिचित आहे. अहिल्यादेवींचा कालखंड हा आधुनिक अर्थाने परराष्ट्र संबंधांचा नसला तरी शेजारी राज्यांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा होताच. रघुनाथराव पेशवे हे जेव्हा इंदूरवर चाल करण्याची शक्यता निर्माण झाली तेव्हा ज्या कुशलतेने अहिल्यादेविनी त्यांना त्यापासून परावृत्त केले, ते पाहता अहिल्यादेवी या एक उत्तम राजनयज्ञ होत्या असे म्हणता येते.

**कररचनेत सुधारणा केल्या**

भुंगा जसा फुलातून रस शोषून घेतो तसा प्रशासनाने कर गोळा करावा. भुंग्याचेही काम होते आणि भुंग्याने रस शोषला म्हणून फुल सुकत नाही, या पद्धतीची कररचना असावी असे कौटिल्य सांगतात. अहिल्यादेवीनी याच पद्धतीने कररचना ठेवली.

अहिल्यादेवींनी करपद्धती सौम्य केली. त्यात सुधारणा केली. आवश्यक तिथे योग्य बदल केले .भिल्ल मंडळी प्रवाशांकडून कर वसूल करत. त्याला त्यांनी मान्यता दिली. बदल्यात त्यांच्याकडून पडीक जमिनीवर लागवड करून घेतली. आधुनिक लोकशाहीला अपेक्षित कल्याणकारी राज्य संकल्पना अहिल्यादेविनी राबविली .

**अखिल भारतीयत्व जपणाऱ्या प्रशासक -**

खरे तर अहिल्यदेवीनी जिथे राज्य केले त्या माळव्यात त्यांचा जन्म झाला नव्हता . अगदी आजच्या प्रशासकीय रचनेचा विचार केला तरी जन्म एका राज्यात, प्रशासकीय कारकीर्द अन्य राज्यात आणि विकासकामे देशभर असा अहिल्यादेवींचा कार्यविस्तार होता. मराठी – अमराठी असे वाद निर्माण करीत राजकीय पक्षकारण सुरु असलेल्या आजच्या काळात अहिल्यादेवींचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे. परिस्थितीचे अपत्य न होता परिस्थिती दिशादिग्दर्शन करणारे अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्व होते. त्यामुळे Ahilya Devi was a leader who gave direction to her time असे म्हणावे लागते .

**अहिल्यादेविनी कार्यातून राजकीय सिद्धांताची उभारणी -**

राज्यशास्त्रात आदर्श राजा आणि आदर्श राज्यासंदर्भात काही संकल्पना प्रसिद्ध आहेत. प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथात मांडलेली आदर्श राज्य व तत्वज्ञ राजाची संकल्पना ,कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथातील राजा आणि मॅकियावेलीने The Prince या पुस्तकात मांडलेला राजा ह्या त्यापैकी काही चर्चित कृती आहेत. या तीनही विचारवंतांचा हा सैद्धांतिक दृष्टीकोन आहे. राज्यकर्त्यांबाबत या तीन विचारवंतानी मांडलेले

दृष्टीकोन वास्तवात पूर्णपणे अस्तित्वात असतातच असे नाही. मात्र राजमाता अहिल्यादेवी यांनी आपल्या राजनीती आणि प्रशासनातून उभ्या केलेल्या आदर्शातून, राज्यकर्त्यासंदर्भातील प्रत्यक्ष सिद्धांतनाचे कार्य केलेले आहे.

**अहिल्यादेवींचे राज्य : रक्षक राज्य**

राज्याचा एक प्रकार रक्षक राज्य असा आहे. असुरक्षिततेतून बाहेर पडण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती झाली असे राज्यनिर्मितीच्या सामाजिक करारवादी अभ्यासकांनी सांगितले आहे. जीवन सुरक्षितपणे जगता येईल अशी व्यवस्था करणे हे राज्याचे कर्तव्य असते. अहिल्यादेवींचे राज्य हे दुर्बलाचे रक्षण करणारे राज्य होते.

अहिल्यादेवींचे राज्य सुरक्षितपणाची गरज पूर्ण करणारे होतेच पण त्यापलीकडे जाऊन नैतिक मुल्यांची जोपासना करणारे राज्य होते. राज्यसंस्थेच्या भारतीय दृष्टीकोनानुसार राजाने राज्यात जे नाही ते मिळविणे, जे मिळविले त्याचे रक्षण करावे, रक्षण केलेल्याचा विकास करावा आणि वाढविलेल्या संपत्तीचे योग्य वाटप करावे अशी राजाची कामे सांगितली आहेत. अहिल्यादेविनी आपले राजपद याच धर्तीवर सांभाळल्याचे अनेक दाखले सापडतात .

**प्रजेच्या सुखाला प्राधान्य देणारे अहिल्यादेवींचे कल्याणकारी राज्य** –

**"प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्।**
**नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्।।"**

प्रजेच्या सुखातच राजाचे सुख असते, प्रजेच्या कल्याणातच त्याने आपले हित पाहिले पाहिजे. राजाला आपल्या आवडीच्या गोष्टीत रस नसतो, त्याची आवड प्रजेला जे आवडते त्यात असते. असे कौटिल्याने सांगितले आहे. त्याच धर्तीवर अहिल्यादेविनी राज्य केले.

**अहिल्यादेवींचे नेतुत्व काळावर स्वार होणारे नेतुत्व होते -**

Every Political Thinker is the child of his times या उक्तीप्रमाणेच प्रत्येक राज्यकर्ता हा देखील त्याच्या स्थळ काळाचे अपत्य असतो. खरे पाहता अहिल्यादेवींचा काळ हा पुरुषप्रधान कालखंड होता. ज्या स्त्रीचे आधी पती गेले, नंतरच्या काळात मुलगा, मुलगी, जामातही गमावले अश्या राज्यकर्त्या स्त्रीपुढे अनेक आव्हाने असतात. ही आव्हाने राज्याअंतर्गत असतात तशीच बाह्य आव्हानेही असतात. मात्र अहिल्यादेवी डगमगल्या नाहीत. त्यांनी अश्या परिस्थितीवर मात करत काळावर आपली मुद्रा उमटवली.

**निष्कर्ष**

देशामध्ये दोन राज्यात पाणीवाटप ,सीमारेषा यावरून मतभेद असतात. 'आपले – बाहेरचे' या मुद्द्यावरून राजकीय पक्ष निर्माण होतात, अशांतता निर्माण होण्याच्या घटना घडतात. अश्या प्रसंगी राजमाता अहिल्यादेवींची आठवण होते. आजच्या रूढ अर्थाने अहिल्यादेवी जन्मल्या महाराष्टात. त्यांच्या राजवटीचे कार्यक्षेत्र होते आजच्या मध्यप्रदेश. मात्र अहिल्यादेवीनी आपले लोककल्याणाचे व्रत जपले आखिल भारतात.

एकाच राज्यात दोन गट निर्माण करणारे राजकीय पक्ष अथवा नेतुत्व असो अथवा दोन राज्यांच्या वादात आपली पोळी भाजू इच्छिणारे राजकीय कार्यकर्ते असो, सर्वानीच अहिल्यादेवींचे चरित्र नव्या परिप्रेक्ष्यातून अभ्यासणे आवश्यक आहे. भाषा, प्रांत हा विषय प्रशासकीय सोयीचा असतो, न कि

मनभिन्नतेचा हे आपण लक्षात घेतले पाहिजे आणि आखिल भारतीय समाज मन घडविणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी दाखविलेल्या मार्गावरून वाटचाल केली पाहिजे.

**संदर्भ**

**English**

1. Gupta R.C., Indian Political Thought, Lakshmi Narain Agarwal Educational Publisher, Agra, First Edition,1999
2. Mahajan V.D., Political Theory, S.Chand & Company Ltd. New Delhi, Fourth Edition, 2003

**मराठी**

1. खडपेकर विनया, ज्ञात अज्ञात अहिल्यादेवी होळकर, राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती ,२००७
2. घांगरेकर चिं.ग.,राज्यशास्त्राची मुलतत्वे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती,१९९९
3. टिपणीस गोविंद गोपाळ, कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप, वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती ,१९९०

**संकेतस्थळ**

1. पंडित शान्तिश्री अहिल्याबाई होळकर: सुधारक, सांस्कृतिक संरक्षक आणि नेत्या https://sundayguardianlive.com/opinion
2. धुळप प्राजक्ता, अहिल्याबाई होळकर : युद्धाच्या विरोधात होत्या कारण, बीबीसी मराठी, ३० मे २०२३ bbc.com
3. जगताप दिलीप, कल्याणकारी राज्य, २०२०, marathivishwakosh.org/39213
4. जोशी लक्ष्मणशास्त्री, प्राचीन भारतीय राज्यशास्त्र, मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/31123/
5. जोशी लक्ष्मणशास्त्री, राजेशाही, मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/31118/
6. रानडे अक्षय, राजनय, मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/31085/

# पुण्यश्लोक: अहिल्यादेवी होळकर यांच्या धार्मिक कार्यांचा अभ्यास

**रतन अंबादास कराड**

अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील सर्वात पूजनीय शासकांपैकी एक मानल्या जातात. त्यांच्याबद्दल साहित्यिक आणि लेखक यानी विविध बाजूनी लेखन केले आहे. त्यांची केवळ कुशल प्रशासनासाठीच नव्हे तर धर्म, अध्यात्म आणि सांस्कृतिक वारसा यासाठी केलेल्या अतुलनीय योगदानासाठीही आठवण केली जाते. "पुण्यश्लोक" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यादेवींचे पुण्यकर्म, नम्रता आणि लोककल्याणासाठी केलेली निस्सीम सेवा भारताच्या अध्यात्मिक वारशाचे संरक्षण करण्यात दिसून येते. त्यांच्या धार्मिक कार्यांचा अभ्यास हा मंदिरे, तीर्थक्षेत्रे आणि भारतातील अध्यात्मिक प्रथांवर त्यांचा झालेला खोल परिणाम अधोरेखित करतो. या अभ्यासामध्ये त्यांच्या धार्मिक कार्यांचा सखोल विचार केला जातो, ज्यामुळे मंदिरे, तीर्थक्षेत्रे आणि भारतातील अध्यात्मिक प्रथा यावर झालेला त्यांचा परिणाम समजून घेतला जातो.

**प्रारंभिक जीवन आणि अध्यात्मिक पाया**

३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चोंडी गावात जन्मलेल्या अहिल्याबाई यांना त्यांचे वडील मनकोजी शिंदे यांच्याकडून भक्ती आणि शिस्तीचे मूल्य मिळाले. होळकर घराण्याचे वारसदार खंडेराव होळकर यांच्याशी विवाह करून, त्या मराठा शासन परंपरा आणि अध्यात्मिकतेत सामील झाल्या. त्यांच्या पतीचे आणि नंतर सासरे मल्हारराव होळकर यांचे निधन झाल्यानंतर, अहिल्यादेवींनी १७६७ मध्ये होळकर साम्राज्याची सूत्रे हाती घेतली, ज्यामुळे त्यांच्या प्रसिद्ध कारकिर्दीचा आरंभ झाला.

अहिल्यादेवींच्या वैयक्तिक दु:खांनी त्यांच्या अध्यात्मिक दृष्टिकोनावर खोल प्रभाव टाकला. निराशेला बळी पडण्याऐवजी, त्यांनी धर्मात आश्रय घेतला आणि आपल्या अध्यात्मिक सामर्थ्याचा उपयोग जनतेचे उत्थान करण्यासाठी आणि भारताचा धार्मिक वारसा टिकवण्यासाठी केला.

**मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांना दिलेले योगदान**

अहिल्यादेवींचे सर्वात मोठे योगदान म्हणजे भारतभर मंदिरे आणि घाटांच्या पुनर्बांधणी आणि बांधकामाचे कार्य. त्यांच्या कार्याची व्याप्ती केवळ त्यांच्या राज्यापुरती मर्यादित नव्हती, तर संपूर्ण भारतीय उपखंडात पसरलेली होती, ज्यामुळे एकात्मिक अध्यात्मिक आणि सांस्कृतिक भारताची त्यांची दृष्टी स्पष्ट झाली. महत्त्वाची मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे जी त्यांनी पुनर्स्थापित केली किंवा बांधली

काशी विश्वनाथ मंदिर, वाराणसी: अहिल्यादेवींनी काशी विश्वनाथ मंदिराचे पुनर्रचनाचे श्रेय जाते, जे हिंदूसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे. मुघल काळात या मंदिराचा नाश झाला होता, आणि त्यांच्या प्रयत्नांनी त्याचे पवित्रत्व आणि भव्यता परत मिळवली.

**सोमनाथ मंदिर, गुजरात**: त्यांनी सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेसाठी योगदान दिले, जे श्रद्धा आणि सहनशक्तीचे प्रतीक आहे. गया घाट, बिहार: अहिल्यादेवींनी गया येथे घाटांच्या बांधकामासाठी आणि देखभालीसाठी निधी पुरविला, ज्यामुळे पिंड दान विधी सुलभ झाले. रामेश्वरम मंदिर, तमिळनाडू: त्यांनी भारताच्या दक्षिणेकडील भागांमध्येही प्राचीन मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कार्य केले. उज्जैनचे महाकालेश्वर

मंदिर, मध्य प्रदेश: महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाचे संरक्षण आणि सुशोभीकरण करण्यात अहिल्यादेवींनी महत्त्वाचे योगदान दिले, ज्यामुळे ते एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र बनले.

**वाराणसीतील घाट:** गंगा नदीकिनारी अनेक घाट बांधले, जसे अहिल्या घाट, ज्यामुळे यात्रेकरूंना विधी सुलभतेने करता आले.

**मंदिर बांधकामामागील तत्त्वज्ञान**

अहिल्यादेवींनी मंदिर बांधणीच्या पुढाकारामध्ये धर्म (कर्तव्य) आणि सेवा (सेवा) या तत्त्वांचा विचार केला. त्यांनी मंदिरे केवळ अध्यात्मिक शांततेची केंद्रेच नव्हे तर समाजकल्याणाचेही केंद्र मानले. प्राचीन मंदिरांचे पुनरुज्जीवन करून त्यांनी भारताचा सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जपला तसेच कारागीर आणि कामगारांना रोजगार उपलब्ध करून दिला.

**धार्मिक प्रथांचा प्रसार**

अहिल्यादेवी केवळ वास्तुकलेच्या संरक्षक नव्हत्या तर धार्मिक आणि अध्यात्मिक प्रथांच्या प्रवर्तक होत्या. त्यांनी आपल्या राज्यात नियमित पूजा, यज्ञ आणि भजन सभा आयोजित केल्या. महेश्वरमधील त्यांचा राजवाडा वैदिक शिक्षण आणि भक्ती संगीताचे केंद्र बनला.

**विद्वान आणि संतांना पाठिंबा**

अहिल्यादेवींनी विद्वान, संत आणि धार्मिक संस्थांना आपले संरक्षण दिले. त्यांनी आपल्या दरबारात विद्वान ब्राह्मण आणि संतांना आमंत्रित केले आणि अध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार सुनिश्चित केला. मोरोपंत आणि शंकराचार्य यांसारख्या प्रमुख व्यक्ती त्यांच्या उपक्रमांशी जोडल्या गेल्या.

**यात्रांसाठी प्रायोजकत्व**

अहिल्यादेवींनी गरीब आणि वृद्ध प्रजेसाठी यात्रांचे आयोजन आणि आर्थिक सहाय्य केले. त्यांनी पवित्र स्थळांच्या भेटीसाठी निधी, अन्न आणि व्यवस्था पुरवली, ज्यामुळे त्यांना कोणत्याही अडचणीशिवाय यात्रा करता आल्या. या उदारतेच्या कृतीमुळे त्यांना त्यांच्या लोकांचे प्रेम आणि सन्मान मिळाला.

**प्रशासकीय आणि धार्मिक सुधारणा**

अहिल्यादेवींच्या शासनात त्यांच्या न्यायबुद्धी आणि धर्मनिष्ठेचे प्रतिबिंब दिसून येते. त्यांच्या प्रशासनाचे मूल तत्त्वे वेद आणि स्मृतींवर आधारित होती, आणि त्यांनी आपल्या राज्यात धार्मिक आणि सामाजिक सलोखा सुनिश्चित केला.

**यात्रेकरूंचे संरक्षण**

यात्रेकरूंना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अहिल्यादेवींनी सुरक्षित मार्ग, विश्रामगृहे आणि पाण्याच्या सोयी स्थापन केल्या. तसेच त्यांनी लुटारूंपासून संरक्षण देण्यासाठी उपाय केले, ज्यामुळे त्यांची यात्रा सुरक्षित आणि शांततापूर्ण झाली.

**धार्मिक सहिष्णुता**

अहिल्यादेवी जरी कट्टर हिंदू होत्या तरीही त्यांनी सर्व धर्मांचा आदर केला आणि सहिष्णुतेचे वातावरण वाढवले. त्यांनी त्यांच्या समावेशक दृष्टिकोनाने हिंदूतर समुदायांना त्यांचे उपासनेचे स्थळे बांधण्यासाठी आणि देखभालीसाठी मदत पुरवली.

**अहिल्यादेवी होळकर यांचा वारसा**

अहिल्यादेवींचे धार्मिक आणि अध्यात्मिक योगदान भारताच्या सांस्कृतिक इतिहासावर अमिट ठसा उमटवते. त्यांची कामे आजही लाखो लोकांना प्रेरणा देतात आणि त्या भक्ती, शहाणपणा आणि निःस्वार्थ सेवांचे प्रतीक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी उभारलेली मंदिरे आणि घाट त्यांच्या भक्ती आणि दृष्टिकोनाचे चिरंतन प्रतीक आहेत.

त्यांचा वारसा केवळ भौतिक संरचनांपुरता मर्यादित नाही तर एका अध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा आहे जो काळाच्या पुढेही टिकून आहे. अहिल्यादेवींचे जीवन आपल्याला आव्हानांवर मात करण्यासाठी आणि चिरस्थायी प्रभाव निर्माण करण्यासाठी श्रद्धा आणि सेवेमध्ये सामर्थ्य आहे हे शिकवते.

**निष्कर्ष**

अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य, त्यांच्या अविचल भक्ती आणि कर्तव्यभावनेमुळे प्रेरित, भारतीय इतिहासातील एक अमर व्यक्तिमत्त्व बनले आहे. भारताचा अध्यात्मिक वारसा जतन करण्यासाठी, धार्मिक प्रथांचा प्रसार करण्यासाठी आणि त्यांच्या जनतेचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांमुळे त्या "राजमाता" या आदर्शाचे प्रतीक ठरल्या, ज्या शहाणपणा, करुणा आणि भक्तीने राज्य करतात. "पुण्यश्लोक" या शीर्षकासाठी खरोखरच पात्र, अहिल्यादेवींचे जीवन आणि कार्य येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणा आहेत.

**संदर्भ**

1 शिवाजी सावंत लिखित "अहिल्या बाई होळकर: होळकरांची राणी".

2 शोभा के. राणी यांचे "अहिल्याबाई होळकर: अ लाइफ"

3.आर सी मजुमदार लिखित "माळव्याची राणी: अहिल्याबाई होळकर".

4 विश्वास पाटील यांचे "अहिल्याबाई होळकर: एक मराठा आयकॉन".

5 विविध वर्तमानपत्र

6 लोकराज्य मासिक

# “अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभारातील पैलू”

**डॉ. निलेश गोकुळ शेरे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग, जि.धाराशिव.

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात वळुन पाहिले असता असे दिसते की, या देशात अनेक राजे, संस्थानिक, सरदार होऊन गेले की, त्यांनी आपल्या कार्य व कर्तृत्वाच्या बळावर आपली राज्यव्यवस्था आदर्श बनवली. व नावारूपाला आणली. त्यांनी केलेल्या आदर्श राज्यकारभाराची आधुनिक राजकीय व्यवस्थेतील नेते व सामान्य जनता यांना सातत्याने आठवण झाल्याशिवाय राहत नाही. या आदर्श राज्यकर्त्यांमध्ये केवळ पुरूष राज्यकर्तेच होते असे नाही. तर काही महिला राज्यकर्त्या देखील होत्या. की, ज्यांनी आपल्या राज्याचा किंवा संस्थानाचा राज्यकारभार करीत असतांना खुप मोठे कर्तव्य बजावून जनतेप्रती उत्तरदायीत्वाची भावना बाळगून सातत्याने लोककल्याणकारी कार्य केली आहेत. अशा भारताच्या राजकीय पटलावर काही महिला राज्यकर्त्या होउन गेल्या आहेत. त्यामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई, जीजाबाई व लोकमाता अहिल्याबाई होळकर इत्यादीची नावेघेता येतील.

इंदोरच्या होळकरांचे राज्य म्हणजे मराठी राज्यसत्तेमधील एक महत्वाचे संस्थान होते. इंदोर राज्याच्या होळकरशाहीमध्ये अनेक राजे होउन गेले. त्यामध्ये आदर्श महिला राज्यकर्त्या म्हणून अहिल्याबाई होळकरांचा सिंहाचा वाटा होता. इंदोर राज्याची जवळ जवळ 29 वर्षे सत्ता ही अहिल्याबाईंच्या हाती होती. त्यांनी अत्यंत पारदर्शकपणे राज्यकारभार केला. जनतेप्रती फार मोठी उत्तरदायित्वाची भुमिका त्यांनी पार पाडली. त्यांनी अनेक लोककल्याणाची कामे केलेली आहेत. आज आपण लोकशाहीमध्ये कल्याणकारी राज्याची संकल्पना अभ्यासतो. पण स्वातंत्र्याच्या अगोदर राजेशाहीच्या काळात देखिल या महिला राज्यकर्तीने कशा प्रकारे लोककल्याणाची कामे करून आपले राज्य कल्याणकारी राज्य बनवले हे त्यांच्या अनेक कार्यावरून समजून येते.

म्हणून संबंधित लघु शोध निबंधामध्ये अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभारातील विविध पैलूंचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये :**

१. एक आदर्श राज्यकर्ती म्हणून त्यांच्या लोककल्याणकारी कार्याचा अभ्यास करणे.
२. अहिल्याबाईंच्या आदर्श राज्यकारभाराचे अध्ययन करणे.

**न्यायदान** :

एकदा अहिल्याबाईच्या राज्यात एक श्रीमंत सावकार वारला होता त्यांची अफाट संपत्ती होती. त्याला पुत्र नसल्यामुळे संपत्तीची देखभाल करण्यासाठी त्याच्या पत्नीला दत्तक पुत्र घेण्याची परवानगी मागितली. तेव्हा त्या ठिकाणी असलेला कारभारी यांनी त्या बाईला दत्तक पुत्र घेण्यासाठी नजराना मागितला त्या बाईने नजराना न देता अहिल्याबाईकडे अपील केले. तेव्हा अहिल्याबाईने सावकराच्या

पत्नीचे म्हणणे ऐकूण घेवून धर्माप्रमाणे दत्तक घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. दत्तक घेण्याची परवानगी अहिल्यादेवीने दिली आणि नजराना मागणाऱ्यास ताकीत दिली. अशा प्रकारे त्या निराधार बाईला न्याय मिळाला. असेच आणखीन एक नमुनेदार उदाहरण ऐकावयास मिळते. मल्हारराव होळकराने सावकर महादजी थिटे यांच्याकडून सैन्याचे घोडे खरेदी करण्यासाठी कर्ज घेतले होते. मल्हारराव होळकर आणि सावकार यांच्या मृत्यूनंतर ती रक्कम परत मिळावी म्हणून सावकाराने नातू रानोजी थिटे महेश्वरी दरबारात अहिल्याबाईकडे कर्जाचे रक्कम मागण्यासाठी गेले. तेव्हा अहिल्यादेवीने रानोजी थिटे यांचे म्हणणे ऐकून घेवून योग्य कागदपत्रे पाहून त्यांची कर्जाची रक्कम पूर्णपणे परत केली. अशा प्रकारे रानोजीला न्याय मिळाला.माळवा प्रांतात राजेरजवाडे आपल्या कौटुंबिक न्यायनिवाड्याचे निर्णय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्याकडून घेत असत. होळकर राज्यात न्यायालयाची सुरुवात् १३ मार्च १७६७ रोजी सुरू केली.

**सैन्य व्यवस्था :**

युद्धामधून होणाऱ्या हानीची पूर्वकल्पना अहिल्याबाईना होती. म्हणून युद्ध होवू नये म्हणून प्रयत्न करत. युद्ध अटळ असल्यास धैर्याने सामोरे जात. सैन्यांना काळाप्रमाणे शिक्षण मिळावे म्हणून १७९५ मध्ये फ्रेंच अधिकारी यांची नियुक्ती करून सैन्यांना प्रशिक्षण काळाप्रमाणे देण्याची व्यवस्था केली. ४ बटालियनचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि त्या अधिकाऱ्याला दर महा तीन हजार पगार देत असल्यामुळे अहिल्याबाईचे सैन्य नेहमी उत्साहित असत. एकदा अहिल्याबाईच्या आदेशाने तुकोजीराव होळकर जयपूरच्या राज्याकडे चौथाईच्या वसुलीसाठी सैन्यासह निघाले. वाटेत त्यावर महादजी शिंदे यांच्या सैन्याने अचानक आक्रमण केले. तुकोजीराव होळकरांनी अहिल्याबाईकडे सैन्याची व पैशाची मागणी केली. देवी अहिल्याबाईने ५ लाख रूपये आणि १८ हजार सैन्य तत्काळ रवाना केले. त्या सोबत पाठविलेल्या आदेशात अहिल्याबाई तुकोजींना म्हणते निर्भयपणे लढून पराभव करा. रूपये आणि सैन्याचा पूल बांधून देईन मला पत्र लिहा मी स्वतःही युद्धात उतरेन.

अहिल्याबाई यांना आपल्या फितुर दुताजवळ अहिल्याबाई सोबत विरोधाचे शब्द बोलून दाखविले. तेव्हा अहिल्याबाई क्रोधीत होवून म्हणाल्या की आपण आपल्या घरातील स्त्रियांना सुपारीच्या तुकड्याप्रमाणे तोंडात टाकून गिळंकृत करता तसा उपदेश करण्याचा प्रयत्न करू नये. ज्या दिवशी तुमचे सैन्य इंदौरवर आक्रमण करेल त्याच दिवशी हत्तीच्या पायाला बांधून मी स्वागत केले नाही तर मी मल्हाररावांची सून कशी ठरेन अशा शब्दात महादजी शिंदे यांना उत्तर दिले आणि त्यांचा कट उलटून लावला. अहिल्याबाईना आपल्या सैन्यामध्ये शांतता आणि बाह्य शत्रूपासून संरक्षण करण्याइतकी कुशलता निर्माण केली होती. त्यांच्या काळामध्ये कुशालगड, चांदवड, अशीलगड, हिंगलगड इत्यादी किल्ल्यात सैन्याच्या छावण्या त्यांनी ठेवल्या होत्या. त्यांच्या काळात पोलीस यंत्रणा अतिशय चोख होती. त्यांच्या राज्यामध्ये नगर कोतवालाचे पद त्यांनी निर्माण केले होते. नगर कोतवालाला आर्थिक दंड देण्याचा अधिकार होता. अहिल्याबाईनी आपल्या राज्यात चोख असा व्यवहार करून लोकांना योग्य न्याय देवून लोकहितवादी विकास कामे केली होती. इतर राज्याबरोबर मैत्रीचे संबंध ठेवून परराज्यात ६५ वकिलांच्या नेमणुका केल्या होत्या.

**पर्यावरण :**

आज एकविसाव्या शतकात सगळे पर्यावरणाविषयी चर्चा करीत असताना दिसतात. पण अहिल्याबाईने त्याकाळी हे पर्यावरण योग्य ठेवण्यास्तव आटोकाट प्रयास केल्याचे दिसतात. रस्त्याच्या दुतर्फा ओसाड, पडीक, डोंगराळ जमीनीवर लिंब, आंबा, चिंच, पिंपळ, वड, औदुंबर याची भरपूर झाडे लावलेली दिसतात.ज्यांना धार्मिक महत्त्व आहे तसेच ज्यांची मूळे खोलवर दूरवर जावून जमिनीत नैसर्गिक गारवा कसा टिकेल अशीच झाडे लावली. यातूनचं आजची अभयारण्याची कल्पना उदयास आलेली दिसते. प्रत्येक शेतकन्याने २० झाडे लावलीच पाहिजेत. यातील ११ झाडे सरकारी तर ९ झाडे शेतकऱ्यांची होती. संबंधितांना लागणारे लाकूड त्या झाडापासून घेतले जात असे. योग्य जागी तलाव, विहीरी बांधून पाण्याची सुबत्ता निर्माण केली होती. नदीचे वाहते पाणी खराब होवू नये यास्तव मूळ प्रवाहापासून एक प्रवाह वाजूस वळवून त्याचा उपयोग स्नान, कपडे धुणे, जनावरांना पाणी आदी कामास्तव केला होता. तेच पाणी पुढे शेतीस देण्याची उत्तम सोय केल्याने पाणी प्रदूषण नव्हते. परिणामी शेतीमाल भरपूर, सकस पीके येत असे. इतकेच नव्हे तर वनीकरण, जलसंवर्धन, जलवितरण इ. स्वतंत्र खाते निर्माण केले होते. एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची हत्या करणे अशा विचार तिने समाजात रूढ केला होता.

**कायदा व सुव्यवस्था :**

मल्हारराव होळकरांनी बनविलेल्या कायद्यात तिने अचूक योग्य सुधारणा केल्या. परंतु पूर्तीप्रमाणे असणारी पाटील, कुलकर्णी इ. वतने तिने कायम ठेवली. कायदा पद्धत अतिशय सोपी अन सुटसुटीत केली. परिणामी तिच्या राज्यात शांतता सुव्यवस्था नांदत होती. कायदा मोडल्यास कडक शिक्षा असल्याने लोक, दरबारी मंडळी सहसा कायदे मोडत नसत. इतकेच नव्हे तर लोक कायद्याचे पालन करतात किंवा नाही हे पाहण्यासाठी स्वतः राज्यात फेरफटका मारीत असे. तिच्या न्यायदान पद्धतीवर अभिप्राय व्यक्त करताना सर जॉन मालकम लिहितो की, "आहिल्याबाईसारखा न्यायाधीश पुन्हा होणे मुश्किल आहे." यावर भाष्य करण्याची गरजच नाही. याला प्रयोजन असे की, राज्यकारभाराच्या दृष्टीने सुटसुटीत कायदे होते. गावागावातील तंटे मिटवण्यासाठी त्यांनी समक्ष पंचाधिकारी नेमले होते. त्यांच्या न्यायपद्धतीवर तिची करडी नजर होती. परिणामी निर्णय देताना पंचाधिकारी अचूक, योग्य निर्णय देत असत. पक्षपातीपणा करता येत नसे. प्रजेला मिळालेल्या न्याय, अन्यायाविरुद्ध तक्रार न जाईल याची खबरदारी पंचाधिकारी घेत असत.

**उद्योगाला चालना :**

अहिल्याबाई यांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्याची राजधानी इंदूरहून नर्मदा नदीच्या तीरी महेश्वर या ठिकाणी हालवली होती. १७७२ मध्ये त्यांनी अनेक वास्तू बांधल्या. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अहिल्याबाईंनी वस्त्रोद्योगास चालना दिली. कोष्टी लोकांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची सणंगे (उंची वस्त्रे) बनतील, अशी पेठ कायम केली.

**करपद्धती :**

अहिल्याबाई यांनी पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली. मात्र शेतकऱ्यांकडून सारा (कर) घेणे चालू ठेवले. गावोगावी न्याय देणारे पंच

अधिकारी नेमले. त्या वेळी डोंगर मुलखातून भिल्ल आणि गोंड आदिवासी हे प्रवाशांना उपद्रव देत अन् त्यांच्याकडून 'भिलवडी' नावाचा कर वसूल करत. तेव्हा अहिल्याबाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा अधिकार मान्य केला. त्यांच्याकडून पडिक भूमीची लागवड करून घेतली, तसेच त्यांना विशिष्ट सीमा नेमून दिली आणि भूमी करार पट्ट्याने देण्याची पद्धत चालू केली. तिने दरबारी मंडळीस अशी आज्ञा दिली की कर असा ठेवावा की प्रजेस सुखसमाधानाने तो देता यावा. आर्य चाणक्याच्या करपद्धतीनुसार तिची कर पद्धती होती. शेतसारा देखील शेतकऱ्यांच्या शेतीतील उत्पन्नावर आधारित होता. परिणामी तिचे राज्य आदर्श होते.

तिच्या राज्यात प्रजा सुखासमाधानात होती याचे मूळ कारण असे की कायदा, न्यायदान, करपद्धती अतिशय चांगली होती. गोरगरिबांना हिवाळ्यात तिने घोंगडी, रंग, उलनचे कपडे प्रदान करीत असे तर उन्हाळ्यात कापडी व्यापारी, प्रवाशास्तव रस्त्यात, गावात पाणपोया घालीत असे. तसेच शेतकरी जमीन नांगरत असताना त्याला, त्यांच्या बैलाला पाणी पाजण्यासाठी स्वतंत्र तरतूद केली होती. गोरगरिबांना अन्नछत्रे सुरू होती. तसेच त्यांच्या निवासासाठी धर्मशाळा बांधल्या होत्या. दानधर्माचे सोळा प्रकार तिने अंमलात आणले होते. यात धर्मशाळा बांधणे, जिर्णोद्धार, पूजा प्रबंध, कुंडनिर्मिती, तलाव विहिरी खोदाई, घाटांची निर्मिती, नंदादीप, रस्ते बांधणे, गंगेची कावड, सभामंडप उभारणी आदींचा समावेश होता. याचाच अर्थ राज्यकर्त्यांचे देव देव्हाऱ्यात नसतात तर रस्त्यावर असतात याची तिला यथार्थपणे जाण होती. राज्याविषयी इतिहासकार म्हणतात हिंदूस्थानात आजूबाजूला युद्धे, अशांतता यांचे वारे वाहात असताना अहिल्याबाईच्या राज्यात मात्र शांतता सुव्यवस्था होतीं. विद्वान संतुष्ट होते. कलावंत आनंदात होते. प्रजेला योग्य न्याय मिळत होता. कोणताही अधिकारी जुलूम जबरदस्ती करीत नव्हता. परिणामी शांततेचे वातावरण असल्याने व्यापार-उदीम उत्तम प्रकारे सुरू होता. तिची गंगाजळी नित्य भरलेली असे. जगा व जगू द्या राजनीति असल्याने तिच्या राज्यात अंतर्गत यादवी कधी निर्माण झाली नाही.

**दानधर्म :**

दानधर्म ही अहिल्याबाईंची सर्वांत मोठी कर्तबगारी आहे. कित्येकांना असे वाटते की, अहिल्याबाईंनी दानधर्मात एवढा पैसा खर्च केला परंतु त्यांनी दान धर्म केलेला सगळा पैसा हा स्त्री धनाचाच एक भाग होता आणि स्त्रीधन हे फक्त धर्मकार्यासाठी वापरायचे असते. अहिल्याबाईना खाजगीतील स्त्रीधन मिळाले होते. तसेच अहिल्याबाईना दरवर्षी सणानिमित्त भेटी म्हणून चोळीसाठी एकलाख तेरा हजार आठसे रूपये येत असे. तसेच होळकरांची गंगाजळी ही सोळा कोटीची होती हाच पैसा त्या दानधर्मासाठी वापरत अहिल्या बाईच्या धर्म कार्याची एक विशाल यादीच तयार होईल. अहिल्याबाईनी पुष्कर, ऋषिकेश, सुलतानपूर, जेजुरी. संगमनेर, राममंदिर, पंढरपुर राम मंदिर, चौडी अहिल्येश्वर, नाशिक चित्रकुट वेरुळ घृणेश्वरांचे तळे, अयोध्या, उज्जेन, अवंतिकेचे मंदिर, काशी विश्वेश्वर, वैजनाथ आणि सोरटी सोमनाथ इत्यादी ठिकाणी काही नवीन मंदिरे उभारली. काहीचा जीर्णोद्धार केला तर बद्रीनारायण नाथद्वार, सप्तश्रृंग आणि अमरटेक या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या तर मल्लिकार्जुन व्यंकटेश तिरुपती बालाजी आधी अठरा देवस्थानांना नदन जमिनी उत्पन्नासाठी दिल्या.

**अहिल्यादेवी होळकर यांचे महिलांसाठी विशेष कार्य :**

एक महिला राज्यकर्ता व राज्यशासक या नात्याने त्यांनी आपल्या राज्यातील सर्व महिलांसाठी विशेषतः विधवा महिलांसाठी नवीन कायदे व नियम बनविले. विधवा महिलांना संपत्तीचा अधिकार दिला, सती प्रथा बंद केली. महिलांना किमान शिक्षण मिळावे यासाठी विद्यालयांची व्यवस्था केली. महिलांसाठी नद्यांवर स्वतंत्र घाट बांधले. मल्हारराव होळकर आणि पुत्र मालेराव यांच्या निधनानंतर अहिल्यादेवी स्वतंत्रपणे राज्यकारभार करू लागल्या. त्यावेळी शेजारी असलेल्या राज्यांनी उपद्रव देण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांना प्रतिकार करण्यासाठी अहिल्यादेवींनी महिला सेना निर्माण केली. समकालीन भारतातच नव्हे तर जगामध्ये अशा प्रकारचे हे एकमेव उदाहरण असावे.

थोडक्यात अहिल्याबाईंनी एका राज्याच्या प्रमुख राज्यकर्त्या म्हणून जी कार्ये केली. ती आजच्या लोकशाहीतील शासनासाठी मार्गदर्शक ठरतील. राज्यकारभार, करत असतांना जनतेप्रती उत्तरदायित्व, आत्मीयतेची भावना, जबाबदार राज्यकारभार, कायदयाचे राज्य, निःपक्ष न्यायव्यवस्था, उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था, धाडसी निर्णयक्षमता, सामान्य व दुर्बलांना न्याय अशा स्वरूपाची कल्याणकारी कार्ये केली आहेत. म्हणूनच एक आदर्श राज्यकर्ती म्हणून आजही त्यांचे नाव गौरवाने घेतले जाते.

**संदर्भसूची:**

1. ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर, विनया खडपेकर, राजहंस प्रकाशन, पुणे, एप्रिल 2010.
2. परिवर्तनाची गौरवगाथा: लोकमाता अहिल्यादेवी होळकर, संपादक प्रा. धनंजय बेडदे, यशवंत महाविद्यालय, नांदेड, विद्याभारती प्रकाशन, फेब्रुवारी 2000.
3. https://marathi.hindustantimes.com/religion/ahilyabai-holkar-punyatithi-2024.

# मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक अत्यंत प्रभावशाली आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व: अहिल्याबाई होळकर

**डॉ. सविता सदाशिवराव आवचार**
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली

**प्रस्तावना :**

**अहिल्याबाई होळकर**(१७२५-१७९५) होळकर घराण्यातील एक प्रमुख राणी आणि प्रशासनिक नेतृत्व म्हणूनत्याओळखल्या जातात. अहिल्याबाई होळकर यांचे कार्य आणि इतिहास संपूर्ण भारतात आदर्श मानले जाते.अहिल्याबाईं होळकर याना देवीचा अवतार अशी उपाधी देण्यात आली आहे. त्या अंधारात एका प्रकाशाच्या किरणासारख्या होत्या. त्यांना अंधार पुन्हा पुन्हा भस्मसात करण्याचा प्रयत्न करत होता परंतु त्यांनी कधीच हार मानली नाही. उत्कृष्ट विचार आणि नैतिक आचरणामुळे त्यांना समाजात देवीचा दर्जा मिळाला आहे.अहिल्याबाई होळकर यांनी अनेक धार्मिक कार्य केले आहेत. औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे त्यांनी पुन्हा बांधली. श्रीनगर, हरिद्वार, केदारनाथ, बद्रीनाथ, प्रयाग, वाराणसी, नैमिषारण्य, पुरी, रामेश्वरम, सोमनाथ, महाबळेश्वर, पुणे, इंदूर, उडुपी, गोकर्ण, काठमांडू इत्यादी ठिकाणी भारतभर त्यांनी अनेक मंदिरे बांधली आहेत.

अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र वाचल्यावर स्त्रीशक्ती किती महान आहे आणि एक स्त्री आपल्या जीवनात काय काय करू शकते याचे उदाहरण आपल्याला अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र वाचल्यावर समजते. आयुष्यात कितीही अडचणी आल्या तरी त्यांना कसे सामोरे जायचे हे अहिल्याबाईंच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते.

अहिल्याबाई होळकरयाना त्यांच्या आयुष्यात अनेक संकटांचा सामना करावा लागला परंतु त्यांनी कधीच हार मानली नाही. स्वाभिमानाची खोटी आसक्ती सोडून गोरगरिबांना आणि जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न अहिल्याबाई होळकर यांनी शेवटपर्यंत केला आहे.अहिल्याबाई होळकर यांनी सदैव आपल्या राज्याच्या आणि जनतेच्या हितासाठी काम केले. त्यांच्या कामाची पद्धत अतिशय सरळ आणि सोपी होती. अहिल्याबाई होळकर आपल्या राज्यातील लोकांशी अत्यंत प्रेमाने आणि दयाळूपणे वागायच्या.अहिल्याबाई होळकर यांनी अनेक युद्धांमध्ये आपल्या सैन्याचे नेतृत्व केले आणि स्वतः हत्तीवर स्वार होऊन शौर्याने लढल्या. अहिल्याबाई होळकर माळवा प्रांताची राणी होती. त्यांनी आपल्या माळवा प्रांताचे अनेक लोकांच्या आक्रमणापासून रक्षण केले.अहिल्याबाई होळकर यांची सामाजिक कार्यासाठीही ओळख आहे. त्यांनी समाजसेवेसाठी स्वतःला वाहून घेतले होते.

**जन्म आणि प्रारंभिक जीवन**: अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील चौंडी या छोट्याशा खेडे गावात झाला. चौंडी हे खेडे गाव महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात आहे. अहिल्याबाई होळकर यांचे वडील माणकोजी शिंदे हे चौंडी गावचे पाटील होते. अहिल्याबाई होळकर यांच्या आईचे नाव सुशीलाबाई शिंदे होते.त्या काळात स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नव्हते तरीही माणकोजी शिंदे यांनी अहिल्याबाईना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. तुम्हाला हि गोष्ट ऐकून आश्चर्य वाटेल की त्यावेळी महिलांना शिक्षण दिले जात नव्हते, पण

माणकोजी यांनी आपल्या मुलीला चांगले शिक्षण दिले आणि चांगले आचरणही दिले. माणकोजी हे खूप विद्वान आणि दूरदर्शी गृहस्थ होते, म्हणूनच त्यांनी अहिल्याबाईंना नेहमीच पुढे जाण्याची प्रेरणा दिली. त्यांनी बालपणीच अहिल्याबाईंना शिकवायला सुरुवात केली होती.अहिल्याबाईंचं शिक्षण आणि संस्कार चांगल्या घराण्यातून झाले होते, आणि त्या लहानपणापासूनच धैर्य, बुद्धिमत्ता आणि नेतृत्व गुणांनी भरपूर होत्या.

**जीवनातील महत्त्वाचे घटनाक्रम:** अहिल्याबाईंचं जीवन एक सशक्त संघर्ष आणि शौर्याची गाथा आहे.इ. स. 1733 साली अहिल्याबाई आणि खंडेराव यांचा विवाह मोठ्या थाटामाटात करण्यात आला. अहिल्याबाईंनी मल्हारराव होळकरांच्या घरात त्यांची सून म्हणून प्रवेश केला आणि होळकरांच्या घरामध्ये आनंद आणि उत्साहाला जणू उधाण आले होते. अहिल्याबाईंनी आपल्या प्रेमळ वागण्याने घरातील सर्वांची मने जिंकली.कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता विनम्रतेने आणि निष्पक्षपातीपणे अहिल्याबाई सर्वांची कामे चोखपणे करत असत. आपल्या सासू सासऱ्यांची सेवा त्या स्वतःच्या आई वडिलांप्रमाणे करीत असत. अहिल्याबाईंनी त्यांच्या अंगी असणाऱ्या विनयशील आचरणाने आणि दयाळूपणाने थोड्या दिवसातच सर्वांच्या लाडक्या बनल्या.

खंडेराव होळकर हे होळकरशाहीचे वारसदार होते परंतु राज्यकारभार करण्यासाठी आवश्यक असणारे गुण त्यांच्या अंगी नव्हते. खंडेराव एक स्वच्छंदी, चिडखोर, तापट स्वभावाचे होते. खंडेरावांच्या अशा वागण्यामुळे मल्हारराव होळकर नेहमी चिंतित राहत असत.खंडेरावांना राज्यकारभाराची जरादेखील आवड नव्हती. खंडेरावांचा स्वभाव लहानपणापासूनच हट्टी, भांडखोर आणि चिडखोर होता. अहिल्याबाईंनी आपल्या बिघडलेल्या पतीराजाचे व्यक्तिमत्त्व सुधरवण्याचा प्रयत्न सुरू केला.अहिल्याबाईंचे शुद्ध प्रेम आणि विनम्र सेवाभाव यामुळे खंडेरावांच्या वाईट वर्तनात बदल घडू लागला. अहिल्याबाई जेव्हापासून खंडेरावांच्या आयुष्यात त्यांची सहचारिणी म्हणून आल्या, तेव्हापासून अहिल्याबाईच्या सहवासाने खंडेरावांच्या जीवनामध्ये परिवर्तन होत चालले होते.

अहिल्याबाईंच्या सुशील आचरणाने आणि प्रेमळ वागण्याने खंडेराव नेहमी प्रसन्न असायचे. त्यांच्यामधील वाईट वृत्ती हळूहळू कमी होत चालली होती. खंडेराव आता एक आदर्श गृहस्थ बनत चालले होते.अहिल्याबाईंच्या प्रेरणेमुळे खंडेराव राज्यकारभार आणि युद्ध शिक्षण शिकू लागले होते. अशा प्रकारे खंडेरावांनी राज्यकारभारात लक्ष द्यायला सुरुवात केली आणि त्यांनी युद्धकलेतही नैपुण्य संपादन केले होते.काही वर्षातच अहिल्याबाईंना पुत्र झाले. त्याचे नाव मालेराव असे ठेवण्यात आले होते. त्यानंतर एक कन्या झाली. कन्येचे नाव मुक्ताबाई असे ठेवण्यात आले होते.

ई.स.1754 साली अजमेर येथे कुंभेरच्या किल्ल्याजवळ होळकर आणि जाट यांच्यामध्ये घनघोर युद्ध झाले. कुंभेरच्या किल्ल्यावरून जाटांनी गोळीबार केला आणि त्यातील एक गोळी खंडेरावांच्या छातीत लागली. खंडेराव धारातीर्थी पडले आणि त्यातच त्यांना वीरगती प्राप्त झाली.खंडेरावांच्या मृत्यूनंतर आहिल्याबाईंवर दु:खाचा डोंगरच कोसळला होता. अहिल्याबाईंनी सती जाण्याचे ठरवले होते. खंडेरावांच्या जाण्यामुळे मल्हारराव खूप दुखी झाले होते. त्यांनी अहिल्याबाईंना सती जाण्यापासून रोखले. मल्हारराव होळकर यांची आज्ञा मानून अहिल्याबाईंनी प्रजाहितासाठी सती न जाण्याचा निर्णय घेतला.

इ.स. 1754 पासूनच अहिल्याबाईंच्या दुःखी जीवनास सुरुवात झाली. खंडेरावांच्या मृत्यूनंतर होळकर घराण्यात मृत्यूची अखंड मालिकाच सुरू झाली होती. खंडेरावांच्या मृत्यूनंतर मल्हारराव अत्यंत खचून गेले होते. परंतु तो काळ अत्यंत अराजकतेचा आणि अशांतीचा होता.इ.स. 1761 च्या पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा दारुण पराभव झाला होता. देशामध्ये सर्वत्र अशांतता पसरली होती. मराठ्यांच्या झालेल्या पराभवाने त्यांचे विरोधक आनंदित झाले होते. मराठ्यांचे साम्राज्य समूळ नष्ट करण्यासाठी विरोधकांचे प्रयत्न चालू होते.माळवा प्रांतातून मराठा साम्राज्याचा अस्त करण्याचा विरोधक प्रयत्न करत होते. सर्वत्र अशांती, अराजकता, अंदाधुंदी पसरली होती. मराठेशाहीची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती.अशा अतिशय बिकट प्रसंगी मल्हारराव देशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र अथक परिश्रम करत होते. रोजची होणारी दगदग आणि नेहमी होणारी युद्धे यामुळे वृद्धत्वाकडे झुकलेल्या मल्हाररावांची तब्येत बिघडत चालली होती. शेवटी 26 मे 1766 रोजी महापराक्रमी वीरपुरूष मल्हारराव होळकर यांचे निधन झाले.

अहिल्याबाईंना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये होती. मुलाचे नाव मालेराव होते. अहिल्याबाईंनी मालेराव यांचा राज्याभिषेक करण्याचे ठरवले. 23 ऑगस्ट 1766 रोजी मालेरावांचा राज्याभिषेक संपन्न झाला आणि मालेराव होळकर राज्याचे सर्वाधिकारी बनले.परंतु मालेरावांना राज्यकारभारात जरासाही रस नव्हता. मालेरावांनी राज्यकारभाराकडे किंचितही लक्ष दिले नाही. काही दिवसातच मालेराव आजारी पडले आणि काही दिवसातच त्यांचे निधन झाले.

मालेरावांच्या मृत्यूनंतर अहिल्यामातेने राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. तो काळ अत्यंत अशांतीचा आणि अराजकतेचा होता. सर्वत्र अशांतता पसरली होती. पती खंडेराव, त्यानंतर सासरे मल्हारराव आणि मुलगा मालेराव यांच्या मृत्यूने अहिल्याबाई पूर्णतः खचून गेल्या होत्या. अशी जीवाची माणसे एकापाठोपाठ एक निघून गेली होती.

अहिल्याबाईंचा (AHILYABAI HOLKAR) लाडका नातू म्हणजेच मुक्ताबाईचा मुलगा नथू याचाही आजारपणामुळे मृत्यू झाला. त्यानंतर काही दिवसातच मुक्ताबाईचे पती यशवंतराव फणसे यांचाही आजारपणामुळे मृत्यू झाला. पतीच्या निधनानंतर अहिल्याबाईंची आता एकुलती एक मुलगी मुक्ताबाईही सती गेली.अहिल्याबाईंवर एकामागून एक असे दुःखाचे डोंगर कोसळत होते. परंतु त्यांची सदसद्विवेकबुद्धी आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे प्रजाहितासाठी त्या राज्यकारभाराकडे लक्ष देत असत. अहिल्याबाईंनी महेश्वरला राजधानी बनवली आणि तेथूनच त्यांनी राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली.

अहिल्याबाईंचे जीवन हे अत्यंत साधे, सरळ आणि प्रेरणा देणारे होते. त्यांच्या जीवनचरित्रामुळे मनुष्याच्या जीवनास योग्य दिशा मिळते. धार्मिकता, कर्तव्यदक्षता आणि प्रजाहित या बाबींना त्यांच्या जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व होते.अहिल्याबाई होळकर यांनी अनेक धार्मिक कार्य केले आहेत. औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे त्यांनी पुन्हा बांधली. श्रीनगर, हरिद्वार, केदारनाथ, बद्रीनाथ, प्रयाग, वाराणसी, नैमिषारण्य, पुरी, रामेश्वरम, सोमनाथ, महाबळेश्वर, पुणे, इंदूर, उडुपी, गोकर्ण, काठमांडू इत्यादी ठिकाणी भारतभर त्यांनी अनेक मंदिरे बांधली आहेत.अहिल्याबाईंनी भारतभर केवळ मंदिरेच बांधली नाहीत, तर अनेक मंदिरे, अनाथाश्रम, अन्नछत्रे, सिंचन तलाव इत्यादी स्थापन केलेअहिल्याबाईनी स्वतःला पूर्णपणे समाजसेवेत वाहून घेतले. अहिल्याबाईंनी नेहमीच आपल्या प्रजेच्या आणि गरिबांच्या कल्याणाचा विचार केला, त्यासोबतच गरीबजनतेच्या मदतीसाठी त्या सदैव तत्पर होत्या.

**कार्य आणि प्रशासन:**

अहिल्याबाई होळकर यांचे शासन हे कर्तव्यनिष्ठेने आणि सजगतेने चालले. त्या गोरगरीब लोकांसाठी कार्य करणाऱ्या एक उत्तम शासक होत्या. त्या शासक म्हणून:

1. **न्यायव्यवस्था**: अहिल्याबाईंनी न्याय व्यवस्था सुदृढ केली आणि गरीब-धनाढ्य, सर्व वर्गांमध्ये समान न्याय मिळवून दिला. त्यांचं शासन अत्यंत निष्कलंक होते आणि त्यांना प्रत्येक प्रजेचा विश्रांतीचे, समृद्ध जीवन दिले.
2. **धार्मिक सहिष्णुता**: अहिल्याबाई होळकर धार्मिक सहिष्णुतेच्या प्रतीक होत्या. त्यांनी हिन्दू धर्माच्या प्रचारासाठी अनेक मंदिरे बांधली आणि धर्मनिरपेक्षतेचे महत्त्व सांगितले. त्याचबरोबर, त्यांनी मुस्लिम, जैन, बौद्ध समुदायाच्या मंदिरांचे पुनर्निर्माण देखील केले.
3. **विकास कार्य**: अहिल्याबाईंच्या काळात इंदोर राज्याने खूप मोठ्या प्रमाणावर प्रगती केली. त्यांनी इंदोर शहराची पायाभरणी केली आणि तिथे पाणीपुरवठा, रस्ते आणि बाजार व्यवस्थाही चांगली केली. त्यांची शहरे आणि किल्ल्यांची बांधणी देखील अतिशय चांगली होती.
4. **शैक्षणिक प्रगती**: त्या शैक्षणिक क्षेत्रात देखील खूप महत्त्वपूर्ण काम करत होत्या. त्या महिला शिक्षणाला प्रोत्साहन देत होत्या आणि त्यांच्या राज्यात शाळा आणि शिष्यवृत्त्यांचे आयोजन करण्यात आले.
5. **युद्ध कौशल्य**: अहिल्याबाई होळकर एक कुशल सैनिक नेत्या होत्या. त्यांना युद्धकला आणि सामरिक योजना यांमध्ये असाधारण कौशल्य होते. त्यांच्या नेतृत्वाखाली होळकर राजघराण्याने मराठा साम्राज्याची प्रतिष्ठा उंचावली.

**प्रसिद्ध प्रकल्प:**

अहिल्याबाई होळकर यांच्या कालावधीत अनेक मंदिरांमध्ये सुधारणांची कामे केली गेली. त्या तुळजापूर, पंढरपूर, काशी (वाराणसी), उज्जैन आणि अन्य महत्त्वाच्या धार्मिक स्थळांवर मंदिर बांधण्याचे आणि त्यांचे पुनर्निर्माण करण्याचे कार्य करत होत्या.

**निधन:**अहिल्याबाई होळकर यांचे निधन १३ ऑगस्ट १७९५ रोजी इंदोर येथे झाले. त्यांचं निधन भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण क्षण म्हणून ओळखले जातं. त्यांच्या कार्याच्या प्रभावामुळे आजही त्या संपूर्ण भारतात आदर्श आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व मानल्या जातात. त्यांची गाथा त्यांच्या कर्तव्यदक्षते, शौर्य, धार्मिक सहिष्णुते आणि प्रशासन कौशल्यामुळे अमर राहिली आहे. त्यांचे जीवन एक आदर्श शासक म्हणून सर्वांसमोर उभे आहे.

**सारांश :**


1. धर्मभास्कर (आहिल्याबाई होळकर विशेषांक) संपादक अवधुत शास्त्री , 1975.
2. हिरालाल शर्मा, आहिल्याबाई नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली.
3. हाडपे म. शि., पुण्य श्लोक आहिल्या देवी , ललित प्रकाशन, जळगाव ,1995.
4. विनया खडपेकर, ज्ञात अज्ञात आहिल्याबाई राजहंस प्रकाशन, पुणे 2007.
5. शर्मा उदयभान लोकमाता आहिल्याउत्सव समिती इंदोर 1932.
6. भागवत अ. ना. होळकरांची कैफियत , केळकर प्रकाशन 1820.
7. भात विठ्ठलराव, राजयोगिनी आहिल्याबाई , मनोविकास प्रकाशन, 2013.

# "कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकरांच्या जनकल्याणकारी कार्यांचा अभ्यास"

**प्रा. डॉ. अनिल काशिनाथ साळुंके**
सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महिला महाविद्यालय शहादा
जि. नंदुरबार (महाराष्ट्र), ४२५४०९

**सारांश :**

मराठा साम्राज्यातील माळवा, इंदोर प्रांताचे संस्थानिक म्हणून होळकर परिवारातील प्रजाहित वस्सल साम्राज्ञी कर्मयोगिनी पुण्यश्लोकी अहिल्यादेवी होळकर यांनी केलेली जनकल्याणाची कामे ही आज देखील आदर्शवत स्वरूपाचे आहे. त्यांनी केलेले मंदिरांची निर्मिती जीर्णोद्धार धर्मशाळा, विहिरी, वाडे, तलाव, घाट, रस्ते व पूल यांचे बांधकाम, प्रवासी यात्रेकरूंसाठी ठिकठिकाणी पाणपोई अन्नछत्र, सदावर्तेची केलेली सुविधा, पशुपक्ष्यांसाठी दाखवलेला मानवतावाद, महिलांसाठी हुंडाबंदी, विधवा स्त्रियांना दत्तक मुल घेण्यास परवानगी, लुटारूंच्या केलेला बंदोबस्त, केलेली कार्य, राजकीय दूरदृष्टीने अमेरिकन कर्नल जे. पी. बॉईड याच्याशी केलेला करार आदी विविध जनकल्याणकारी कार्यांचा अभ्यास प्रस्तुत शोध लघुनिबंधात करण्यात आलेला आहे.

**शोध संज्ञा:** मंदिर, धर्मशाळा, जीर्णोद्धार, जनकल्याणकारी कार्य आदी.

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात मराठा साम्राज्यात झाशीची राणी लक्ष्मीबाई, राष्ट्रमाता जिजामाता व कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सारख्या आदर्श महिला राज्यकर्त्या होऊन गेल्या त्यापैकी एक इंदोरच्या होळकरांचे माळवा प्रांताचे महत्वाचे संस्थान होते. या संस्थानाच्या विकास कार्यात अहिल्यादेवी होळकरांचा सिंहाचा वाटा असून त्यांनी जनतेप्रती फार मोठी उत्तरदायित्वाची भुमिका त्यांनी पार पाडून अनेक प्रकारे जनकल्याणाची कामे केलेली आहेत. अहिल्यादेवी होळकरांनी जनकल्याणाच्या दृष्टीने केलेल्या विविध स्वरूपाच्या कार्याची माहिती जाणून घेण्यासाठी हा विषय लघु शोधनिबंधाच्या संशोधनासाठी निवडला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची, महत्वाची व उत्कृष्ठ राज्यकर्तीची भुमिका समाजासमोर येईल. राजकीय अभ्यासाच्या दृष्टीने त्यांच्या कार्याचा करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

1. अहिल्यादेवी होळकर यांच्या समकालीन परिस्थीतीचा आढावा घेणे.
2. अहिल्यादेवी होळकर एक आदर्श राज्यकर्ती म्हणून त्यांच्या जनकल्याणकारी कार्याचा अध्ययन करणे.
3. अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्श राज्यकारभाराचे अभ्यास करणे.
4. अहिल्याबाई होळकरांच्या जनकल्याणकारी कार्यामुळे समाजावर झालेल्या परिणामाचा जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितके :**

1. अहिल्यादेवी होळकरांनी तत्कालीन परिस्थितीत सामाजिक व राजकीय दृष्टिकोण बाळगुन कार्याला प्रारंभ केला.
2. अहिल्यादेवी होळकरांचे कार्य सर्वव्यापक व जनकल्याणकारी असे होते.
3. अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा मध्यबिंदू हा सामान्यजन होता.
4. अहिल्यादेवी होळकरांच्या कार्यामुळे समाजावर व तत्कालीन राज्यकर्त्यांवर सकारात्मक परिणाम झाले.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन करतांना ऐतिहासिक, वर्णनात्मक, तुलनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी व्दितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असून यात संशोधन विषयासंबधीचे साहित्य, चरित्रे, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, अग्रलेख मासिके, अधिकृत प्रकाशने, शासकीय दस्तऐवज, ग्रंथ, इंटरनेट इत्यादी. स्वरूपाच्या स्त्रोतांव्दारे प्राप्त होणाऱ्या माहितीवरअधिक भर देउन तथ्य संकलित करण्यात आले आहे.

**व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत शोध लघूनिबंधाच्या अभ्यास हा केवळ कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या केवळ जनकल्याणकारी कार्यांच्या संदर्भात करण्यात आला असून हीच याची व्याप्ती व मर्यादा आहे.

**संशोधन विषयाचे महत्व :**

कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक कर्तृत्ववान राज्यकर्त्या होऊन गेल्यात. संकटाच्या परिस्थितीत आलेली राजकीय जबाबदारीला, न डगमगता संघर्ष करीत पारदर्शक राज्यकारभार सांभाळुन प्रजेचे हित, अनेक जनकल्याणकारी, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, प्रशासकीय कार यांची ओळख होणे गरजेचे आहे. एक आदर्श राज्यकर्ता कसा असावा व जनहितकारी, जनकल्याणकारी राज्य कशा प्रकारे असावे. या संबंधी समाजाला त्यांचे विचार व कार्ये मार्गदर्शक ठरू शकतील. म्हणून त्यांच्या विचार, कार्याची समाजाला व देशाला आजही प्रासंगिक असल्याकारणाने प्रस्तुत संशोधन अधिक महत्वाचे ठरणार आहे.

**विषय विवेचन :**

प्रस्तुत शोध लघूनिबंधाच्या अभ्यास हा केवळ कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या केवळ जनकल्याणकारी कार्यांच्या संदर्भात करण्यात आला असून त्याचा सविस्तर आढावा हा पुढील प्रमाणे.

**कौटुंबिक जीवन :**

माणकोजी शिंदे व सुशिलाबाई शिंदे या दांपत्याच्या घरी अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) या खेड्यात झाला. त्यांचे वडील गावचे पाटील होते त्यांनी अहिल्यादेवींना लिहिण्यावाचण्यास शिकवले.

**विवाह :** वयाच्या ८ व्या वर्षीच अहिल्यादेवींचा विवाह मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचे सेनापती तथा इंदोरच्या होळकर संस्थानाचे संस्थापक मल्हारराव होळकर यांच्या मुलगा खंडेराव होळकर यांच्याशी झाला. त्यांना मालोजीराव आणि मुक्ताबाई ही दोन अपत्ये होती.

**सुन ते साम्राज्ञीकडे वाटचाल करताना संकटांशी प्रखरपणे केलेला सामना :**

अहिल्यादेवी यांनी आपले पती खंडेराव यांना राज्यकारभारात नेहमीच मोलाची साथ दिली. इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी त्यांना सती जाण्यापासून प्रवृत्त करून त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, व भौगोलिक परिस्थितीचा परिचय करून देत राज्यकारभार, प्रशासन, सैनिकी व व्यावहारिक शिक्षण देऊन निपुण व कर्तबगार बनविले. तसेच प्रसंगी ते युद्धात व्यस्त असल्यास पत्राद्वारे देखील त्यांना मार्गदर्शन करीत असे. इतिहासात असे एकमेवच उदाहरण दिसून येते. मात्र १२ वर्षांनंतर १७६६ मध्ये सासरे मल्हारराव होळकर हे मृत्यू पावले. त्यानंतर एकाच वर्षांनी राज्यकारभार पाहणाऱ्या एकुलत्या एक मुलगा मालोजीराव याचे २७ मार्च १६७६ रोजी मृत्यू झाला, त्यानंतर मुलगी मुक्ताबाईच्या यशवंतराव मनसे यांच्याशी विवाह लावून दिला. कालांतराने नातू, जावई व मुलीचा देखील मृत्यू त्यांना पाहावा लागला. मालोजीराव मृत्यूपश्च्यात प्रजेलाच सर्वश्रेष्ठ मानून, 'प्रजेचे हित ते राजाचे हित' हे लक्षात घेऊन अहिल्यादेवी ह्या स्वतः मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा राज्यकारभार पाहू लागल्या. अहिल्यादेवींनी दूरचे नातलग तुकोजीरावांचे पुत्र मल्हार रावांना दत्तक घेतले मात्र तो देखील कृतघ्न निघाला अशा प्रकारे अहिल्यादेवींना आपल्या आयुष्यात एकापाठोपाठ एक आप्तस्वकियांचा मृत्यू, संघर्ष व संकटांच्या प्रसंगी न डगमगता संघर्ष व सामना करणाऱ्या संघर्षयात्री व लढणाऱ्या लढवय्या योद्धा ठरल्या. कर्मयोगिनी पुण्यश्लोकी अहिल्यादेवी होळकर यांच्या दिव्य आत्म्याने १३ ऑगस्ट १९७५ रोजी वयाच्या ७० वर्षांच्या आपल्या शरीराचा त्याग केला.

**अहिल्यादेवींचे जनकल्याणकारी कार्य :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या दीन दयाळू, दानशूर म्हणून ओळखले जातात. त्यांनी जनतेकडून कर स्वरूपात आलेले पैसे स्वतःसाठी महाल बांधण्यात न खर्च करता, आपली खासगी संपत्ती ही दानधर्म, मंदिरे, घाट, विहिरी, बारव, तलाव, तळे, रस्ते, पूल, धर्मशाळा बांधण्यात, अन्नछत्र व सदावर्ते तसेच संरक्षण, सोई व सुविधा आदी जनकल्याणासाठी खर्च केली.

**मंदिरांची निर्मिती आणि जीर्णोद्धार :**

भारतीय इतिहासातील एक महान शिवभक्त व धर्मभक्त शासक म्हणून अहिल्यादेवी ओळखली जाते. त्यांनी आपल्या शासन काळात मुस्लिम आक्रमकांकडून हल्ले व लूट विध्वंस झालेल्या देशभरातील बारा ज्योतिर्लिंगांसह इतर मंदिरांच्या जीर्णोद्धार आणि पुनर्बांधणी, हिंदू मंदिरांची निर्मिती, बांधकाम यासाठी आयुष्य समर्पित केले.

**काशी-विश्वनाथच्या मंदिराची पुनर्बांधणी:**

हिंदूंच्या पवित्र श्रद्धा स्थान तीर्थक्षेत्र व बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले काशी येथील विश्वनाथ धाम हे होय. १८ एप्रिल १६६९ रोजी मुस्लिम शासक मुघल सम्राट औरंगजेबाच्या स्पष्ट आदेशानुसार काशी-विश्वनाथचे मंदिर लुटले गेले आणि पाडून तिचे ज्ञानवापी मशिदीत रूपांतरित केले

गेले होते." देशावर मुस्लिम आक्रमकांचे संकट असताना, हिंदू धर्मातील मानबिंदू पुन्हा उभारण्याचे काम अहिल्याबाईंनी हाती घेतले होते. याचे सर्वात चांगले उदाहरण म्हणजे काशी-विश्वनाथ मंदिर. मूळ नष्ट झालेल्या मंदिराच्या पुनर्बांधणीचे स्वप्न अनेक मराठा राज्यकर्त्यांनी पाहिले होते. परंतु, ते सत्यात उतरवण्याचे श्रेय अहिल्यादेवी होळकर यांना जाते. त्यांनी या मशीदीशेजारीच नवे भव्य मंदिर उभारले. काशीचे मुख्य आकर्षण म्हणून प्रसिद्ध असलेला 'मणिकर्णिका घाट' बांधला. पुढे शीख राजा रणजीत सिंहाने या मंदिराच्या शिखरावर सोन्याचा पत्रा चढवला. "[१]

**सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार :**

भारताच्या पश्चिमेतील गुजरात मधील सोमनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र ज्योतिर्लिंग मानले जाते. मोहम्मद गजनी सह अनेक मुस्लिम सेनापतींनी सोमनाथ मंदिराची लूट करून विध्वंस केला. "१७८३ साली अहिल्यादेवी यांनी सोमनाथच्या शिव मंदिराचा जीर्णोद्धार केला. अहिल्याबाईंनी बांधलेले मंदिर आता 'जुने सोमनाथ' किंवा 'अहिल्यादेवी मंदिर' म्हणून ओळखले जाते आणि मुख्य सोमनाथ मंदिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावर आहे."[२] याशिवाय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार, पुनर्बांधणी व नवनिर्मिती केली आहे, त्याची माहिती पुढील प्रमाणे

१७८७ मध्ये बिहार मधील गया येथे श्री विष्णुपद मंदिर आणि सभा मंडप, उत्तरांचल मधील गंगोत्रीमध्ये विश्वनाथ, केदारनाथ, अन्नपूर्णा, भैवर मंदिरे आणि सहा धर्मशाळा, हरिद्वार, केदारनाथ, बद्रीनाथ, ऋषिकेश येथे शिव मंदीर, उत्तर प्रदेश मधील प्रयागमध्ये विष्णू मंदिर, धर्मशाळा तर चित्रकूटमध्ये श्री राम आणि इतर चार मूर्तींची स्थापना, महाराष्ट्रातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वरमध्ये दोन मंदिरे व एक तलाव, नाशिकमध्ये श्रीराम मंदिर, गोरा महादेव मंदिर आणि धर्मशाळा, महाबळेश्वर, पुणे येथे शिव मंदीर, राजस्थान मधील पुष्कर येथे श्री विष्णू मंदिर, घाट आणि धर्मशाळा, नाथद्वारामध्ये मंदिर, धर्मशाळा, विहीर आणि तलाव, दक्षिण भारतात नैमिषारण्य, पुरी, रामेश्वरम, श्रीशैलम, उडीपी, गोकर्ण येथे शिव मंदीर, कर्नाटक मधील बेरूळ येथे गणपती, पांडुरंग, जलेश्वर, खंडोबा, तीर्थराजा आणि अग्निची मंदिरे, मध्यप्रदेश मधील ओंकारेश्वर, इंदूर, महेश्वर तसेच श्रीनगर, नेपाळ मधील काठमांडू येथे शिव मंदीर बांधले. भारतातील हिंदू धर्म आणि मंदिरे यामध्ये समन्वय व सुविधा निर्मितीत त्यांचा मोलाचा वाटा आहे, त्यांच्याच अथक प्रयत्नांमुळे विविध पवित्र स्थळांच्या स्थापत्य वारशाचे पुनरुज्जीवन आणि जतन करण्यास मदत झाली. हेच त्यांच्या महान जीवनचरित्रातून दिसून येते.

**गंगा नदीचे पाणी पूजेसाठी पोहोचवण्याची सोय :**

हिंदू धर्मशास्त्रानुसार गंगा नदीला विशेष अनन्य साधारण महत्त्व असून तिचे पाणी म्हणजे गंगाजल हे पवित्र मानले जाते. गंगा नदीच्या काठी प्रयागराज येथे कुंभमेळा आयोजित केला जातो. गंगा नदीत स्नान करणे, याशिवाय हिंदू मंदिरांमध्ये केल्या जाणाऱ्या अभिषेक, अभंग्यस्नान, व अनुष्ठान, षडोपचार व विविध पूजांमध्ये वापरास धार्मिक महत्व असल्याने अहिल्यादेवींनी गंगेच्या उगम असलेल्या 'गंगोत्री'चे पाणी केरळ, तामिळनाडू व कर्नाटक असे भारतातील सर्व मंदिरातील मूर्ती मूर्तींना घालण्यासाठी पूजेसाठी पोहोचवण्याची सोय केली.

**वाडे, धर्मशाळा बांधकाम व अन्नछत्र, सदावर्ते सुविधा :**

धार्मिक यात्रा प्रसंगी तीर्थयात्रा यांना राहण्याच्या सुविधेसाठी पंढरपूर, जेजुरी, चांदवड, काशी, सोमनाथ आदी ठिकाणी वाडे व मठ तर उज्जैन, काशी, अयोध्या, हरिद्वार, केदारेश्वर, गंगोत्री, प्रयाग, नाशिक, पुष्कर, नाथद्वार आदी ठिकाणी धर्मशाळा यांचे बांधकाम करून त्यांची भूक शमविण्यासाठी अन्नछत्र व सदावर्ते यांची सुविधा उपलब्ध करून दिली.

**विहिरी, तलाव, बारव आणि घाटांची निर्मिती :**

प्रवासी व तीर्थयात्रेकरूंच्या सुविधेसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, त्यांची तहान भागावी यासाठी त्यांनी त्र्यंबकेश्वर येथे तलाव तर नाथद्वार, उज्जैन, भीमाशंकर, चांदवड, सकरगाव, देवाचे विखरण, नंदुरबार आदी ठिकठिकाणी विहिरी, बारव, तळे, कुंड, पाणपोई, पायविहिरी यांची निर्मिती केली.

तीर्थयात्रा व इतर प्रसंगी पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे तसेच बहुउपयोगी सुविधांसाठी विविध नदी किनारी घाट बांधले त्यात काशी येथील प्रसिध्द मणिकर्णिका घाट, पुष्कर, नाथद्वारमहेश्वर, मंडलेश्वर तसेच नाशिक, पुणतांबे, गया, कुरुक्षेत्र, निमिषारण्य आदी ठिकाणांचा प्रामुख्याने समावेश आहे.

**रस्ते निर्मिती :**

हिंदू धर्मात चारधाम तीर्थयात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांनी भारतातील चारधाम स्थळांना रस्ता मार्गे जोडून एक अर्थाने हिंदूंना तीर्थयात्रा प्रवासाची सोय करून जवळ आणले. त्यापैकी एक काशी ते कलकत्ता हा रस्ता सांगता येईल.

**पूलाची उभारणी :**

नाशिक जिल्ह्यातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर येथील मंदिरापासून ते कुशावर्त तीर्थ कडे जाणाऱ्या मार्गावर तसेच मालेगाव शहरातील मोसम नदीवर मौसम पूल बांधला याशिवाय यात्रेककरुंच्या सुविधेसाठी अनेक ठिकाणी मुलांची निर्मिती केली.

"बद्रीकेदारपासून रामेश्वरपर्यंत, पुरीपासून ओखापर्यंत त्यांनी सर्वच पवित्र क्षेत्री अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, पाणवठे बांधले. असंख्य लोककल्याणकारी कार्य केले. त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वाला इतिहासात तोड नाही. त्यांचे कर्तृत्व भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान होते. त्या लोकमाता झाल्या होत्या. कारण त्यांनी निरंतर प्रजेच्या सुखसोयींकडे लक्ष दिले. त्यांनी अन्नछत्र उघडून भुकेल्यांना अन्न दिले. तहानलेल्यांसाठी आड, विहिरी खोदल्या, रस्ते बनवले. मंदिरांमध्ये विद्वानांची नियुक्ती केली. आत्मप्रतिष्ठेचा खोटा मोह त्यागून सदा न्याय करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या हयातीतच जनता त्यांना देवी समजत असे व देवी म्हणूनच हाक मारीत असे. एवढे मोठे व्यक्तिमत्त्व या आधी लोकांनी बघितलेच नव्हते."[३]

**पशु - पक्ष्यांची सेवा :**

त्यांनी आपल्या लाडक्या जनतेप्रमाणेच पशु, पक्षी व मुकी प्राण्यांचीही लेकरासारखी माया लावून सेवा केली. स्वतः रोज गो सेवा केल्याशिवाय अन्नप्रशान करीत नसे. गाय, वासरू, बैल आदी मुक्याप्राण्यांच्या वैरणीसाठी चारा, कुरण व उभे पीक असलेली शेती विकत घेऊन ती त्यांच्यासाठी

राखीव ठेवली तसेच त्यांना पाणी पिण्याची व्यवस्था व्हावी म्हणून जंगलात ठिकठिकाणी तळी व कुंडे बांधली. धान्याने भरलेली कोठारे विकत घेऊन ती पक्षांसाठी मोकळी ठेवत असे. मुंग्यांसाठी गोड साखर ठेवण्यात येई. नर्मदा व शिप्रा नदीच्या पाण्यात माशांसाठी कणकेचे गोळे टाकण्यात येत असे. अशा सर्व कार्यांसाठी स्वतंत्र मोठा नोकर वर्गाची नेमणूक केली आणि मोठ्या प्रमाणात सरकारी खर्चाची तरतूद करण्यात आलेली होती. अशाप्रकारे मुके प्राणी व पक्ष्यांवर मानवता दृष्टिकोनातून भूतदया दाखवत त्यांची सेवा त्यांनी केली.

**हुंडा बंदी कायदा :**

अहिल्यादेवी या स्वतः एक महिला असल्याने त्यांना महिलांचे दुःख चांगले ज्ञान होते त्यापैकी हिंदू धर्मात प्रचलित असलेली एक वाईट पद्धत म्हणजे हुंडा पद्धत होय. हुंडा पद्धती बद्दल त्यांना तक्रार मिळाल्यानंतर याबाबत त्यांनी सक्त ताकीद देत म्हटले की, "वधूला देवी म्हणावे, लक्ष्मी म्हणावे आणि तिच्या प्रवेशाचे आदिमायेच्या स्वागताचे पैसे घ्यावे हे कसे? स्त्रीच्या कौतुकाची नुसती सोगे नुसता देखावा खोटा ! मातोश्री म्हणूनच आम्ही आलो आहोत यातून काही मार्ग काढावा लागेल यासाठी त्यांनी कारभारी मुकुंद हरीस दऊतलेखणी घेऊन बोलावले सांगू लागल्या श्री शंकर आज्ञेवरून हे जाहीर करण्यात येत आहे की, यापुढे कुठल्याही जाती जमातीत विवाहाच्या समयी कन्येच्या पालन कर्त्यांकडून पैसे घेतल्यास तो गुन्हा समजण्यात येईल. द्रव्य घेईल त्याच्या कडून दामदुप्पट. जो देईल त्याच्याकडून जितके दिले तितके आणि मध्यस्थाकडून त्यास मिळाले असतील तितके सरकारात भरणा करावे लागतील अधिक रक्कमेचा दंड करण्याचा अधिकार सरकारला राहील याच्या नकला करून अहिल्यादेवीने प्रांतो प्रांती पाठविल्या. आजही हुंड्यांच्या प्रकरणाहून अनेक वाद निर्माण होऊन स्त्रियांचा छळ केला जातो. अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात दोनशे वर्षांपूर्वी हुंडाबंदी करून एक आदर्श घालून दिला. शासन व्यवस्थेपुढे आदर्श ठेवला."[४]

**विधवा स्त्रीला दत्तक मुल घेण्यास परवानगी :**

१८ व्या शतकात समाजाने स्त्रियांना अनेक रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यात बंदिस्त करून दुय्यम दर्जा दिलेला होता. त्याकाळी विधवा स्त्रियांना दत्तक पुत्र घेण्याची आणि आपल्या धनाचा उपयोग करण्याची परवानगी नसल्याने अपत्यहीन विधवांची संपत्ती ही सरकार जप्त करत असे. त्यामुळे त्यांना कष्टमय हलाखीचे जीवन जगावे लागत असे. विधवा स्त्रियांना अहितकारक असलेले पूर्वीचे सर्व प्रथा, नियम, अटी, कायदे आणि कर त्यांनी रद्द करून त्यांना न्याय मिळवून दिला. तसेच राज्यातील स्त्रियांना पुरुषांबरोबरचे समान स्थान देऊन, त्यांच्या अडीअडचणी समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या कार्याच्या महतीवरून सुप्रसिद्ध कवी मोरोपंत म्हणतात की ,

**"देवि अहिल्याबाई । झालीस जगत्रयात तूधन्या ॥**<br>**न - न्याय धर्म निरता अन्या कलिमाजि ऐकली कन्या ॥"**[५]

**माहेश्वरी सिल्क साडी निर्मितीस प्रोत्साहन :**

अहिल्यादेवी होळकर यांनी महेश्वर येथील महिला बघिनींच्या सिल्क साडी निर्मितीस उद्योगास हातभार लागावा म्हणून त्यांनी विशेष सवलतीसह प्रोत्साहन दिले. त्यामुळे माहेश्वरी सिल्क साडी ही नावारूपाला येऊन संपूर्ण भारतामध्ये प्रचलित झाली आहे.

**स्त्रियांच्या सैन्याची उभारणी:**

अहिल्यादेवींनी स्त्रियांची सैन्य तयार करून त्यांना शस्त्रास्त्रे हाताळण्याचे व युद्ध रणनीती, संरक्षण आदींचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. स्त्रियांच्या हाताखाली काम करण्याची पुरुषी मानसिकता व अहंकारपणामुळे गंगाधर चंद्रचूड व चिंतो विठ्ठल यासारख्या सरदारांनी कटकारस्थान करून सर्वच बाजूने कोंडी करत राघोबा दादांना इंदूर वर आक्रमण करण्यास प्रवृत्त केले. त्यावेळी न डगमगता त्यांनी राघोबा दादाला पत्र लिहिले. “तूम्ही माझे राज्य बळकावायला आले आहेस. ते तुम्हाला शोभत नाही. स्त्रीशी भांडू नका नाहीतर हा कलंक पुसला जाणार नाही. मी एक असहाय्य स्त्री आहे, असा विचार करून आला असाल तर हे युद्धभूमीवर कळेल. मी एक स्त्री आहे. मी युद्धात हरलो तरी माझी आठवण कोणी ठेवणार नाही, युद्धात हरलो तर जग हसेल. मी माझ्या महिला सैन्यासह रणांगणात तुझ्याशी लढेन. तुम्ही आलात तितक्याच शांतपणे परत जाणे हे तुमच्या हिताचे आहे.” **६** राघोबाने दादाने जेव्हा हे पत्र वाचले तेव्हा प्रचंड सैन्य, महिला सैन्य आणि त्यांचा युद्धाच्या तयारीने राघोबा दादाच्या धैर्याचा पराभव केला. त्यानंतर गैरसमज दूर होऊन वास्तव स्थिती समजल्यावर राघोबा दादाने स्वतः त्यांची भेट घेतली. अशा प्रकारे राणीने युद्ध न करता, रक्तपात न करता युद्ध जिंकले आणि आपल्या वर्तनाने शत्रूला मित्र बनवले.

**शिक्षण विषयक कार्य :**

त्यांनी अनेक प्रांतातील विद्वान, पंडित, वैद्य, शास्त्री, अभ्यासक आदींना राजाश्रय देऊन भारतीय संस्कृती, पारंपारिक शिक्षण, ग्रंथांचे अध्ययन व अध्यापन करण्यासाठी अहिल्याकामधेनू सारख्या राजकोष ग्रंथ निर्मिती, काशी येथे ब्रह्मपुरी सारखे विद्यापीठ तर महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा काढून विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. यावरून त्यांचा शिक्षणाबद्दलचा उदात्त दृष्टिकोन दिसून येतो.

**विद्वानांना राजाश्रय :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या गुणग्राहक व रत्नपारखी असल्याकारणाने त्यांनी कला साहित्य ज्योतिष अशा विविध क्षेत्रातील विद्वानांचा व रत्नांचा आदरपूर्वक सत्कार करीत त्यांना इनामे, वतने देऊन सन्मानपूर्वक राजाश्रय दिला. त्यात कवी साहित्यिक पंडित शाहीर प्रवचनकार ज्योतिष तसेच विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींच्या समावेश होता. त्यापैकी प्रामुख्याने काही नाव घेता येतील यात कवी पंडित मोरोपंत, शाहीर अनंत फंदी, रामचंद्र कानडे, मल्हार भट, बाळकृष्ण जोशी, ज्ञानोबा पुराणिक आदींच्या उल्लेख करता येईल. विद्वान लेखकांकडून धार्मिक पौराणिक क सांस्कृतिक विषयांचे लिखाण करून घेतले.

**ग्रंथसंग्रह :**

अहिल्यादेवी या ग्रंथांच्या अभ्यास करण्याची आवड असल्याकारणाने त्यांनी वाल्मीकि रामायण, ज्ञानेश्वरी, पद्मपुराण, मधुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणि, द्रोणपर्व, श्रावणमास माहात्म्य, निर्णयसिंधू

आदी ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती विद्वानांकडून लिहिलेले होते, या दुर्मिळ ग्रंथांचा मोठा संग्रह जमविला होता.

**लुटारू, दरोडेखोरांचा बंदोबस्त :**

राज्यातील मुलखातून मालाची ने- आण करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून काही दरोडेखोर लुटारू भिल्ल व गोंड टोळ्यांनी यांच्याकडून 'भीलकवडी' हा कर वसूल करीत. तसेच दरोडा टाकून प्रजा, प्रवाशी व सधन यात्रेकरूंना लूटत. याबाबत तक्रारी त्यांच्याकडे आल्यानंतर दरोडेखोरांवर जरब बसवण्यासाठी त्यांनी आपले जावई यशवंतराव फणसे यांना सैन्य घेऊन पाठविले. याप्रसंगी भिल्लांच्या प्रमुखांना पकडून दरबारात आणल्यानंतर स्थानिक भिल्ल व गोंड लोकांना उपजिविकेचे अन्य साधन नसल्याकारणाने ते लूट करतात व भीलकवडी हा कर वसूल करीत असल्याबाबत त्यांची ही बाजू समजून घेतल्यानंतर त्यांचा विश्वास संपादून उपजीविकेसाठी रास्त न्याय देऊन मार्गदर्शन करीत त्यांना सदर कर वसुलीचा अधिकारासह दुसरे उपजिविकेचे साधन म्हणून त्यांच्या वस्ती असलेल्या शेजारील शासकीय पडीक जमिनी देऊन शेती व्यवसायास व शारीरिक श्रमास प्रवृत्त केले असेल तरी मात्र या सवलतीच्या मोबदल्यात प्रवाशांच्या संरक्षणाची जबाबदारी दिली तसेच राज्याच्या सीमांच्या आत जर कोणाचा माल व द्रव्य लुटले गेल्यास तर ते लुटारुंकडून परत मिळवून मालकाच्या स्वाधीन करण्याचा भार त्यांच्याकडे सोपवून या भक्षकांनाच रक्षक म्हणजेच सरकारचे नोकर बनविले, याशिवाय राज्यात ठिकठिकाणी रक्षक दलाच्या चौक्या बसवून कायमची लुटालूट थांबवून राज्यातील जनतेला अभय देऊन सुरक्षितता मिळवून दिली. अशा प्रकारे कोणतीही व्यक्ती ही जन्माने गुन्हेगार नसते तर परिस्थितीमुळे ते गुन्हे करण्यास भाग पडतात यामुळे त्यांनी लुटारु टोळीच्या लुटी संदर्भातल्या परिस्थितीच्या मुळाशी जाऊन त्यांची कारणे शोधून या प्रश्नाची सोडवणूक केली. अशी ही जगाच्या पाठीवरची एकमेव अभूतपूर्व व्यवस्था निर्माण केली.

**राजकीय दूरदृष्टीने अमेरिकन कर्नल जे. पी. बॉईड सोबत केलेला करार :**

त्याकाळात भारतातील विविध राजे व संस्थानिक व साम्राज्यांमध्ये पाश्चात्य पद्धतीने आधुनिक सैन्यांची पलटण तयार करण्याची पद्धत रूढ झाली होती. त्याप्रमाणे इ.स. १७९२-९३ च्या सुमारास अहिल्यादेवींनी अमेरिकन कर्नल जे. पी. बॉईड या अधिकाऱ्यामार्फत पाश्चात्य पद्धतीची कवायती पलटन तयार करण्याची निश्चित केले. परंतु त्यांनी केलेला करार हा भारतातील इतर संस्थानिकांपेक्षा वेगळा होता. कारण या फौजेत केवळ कर्नल जे. पी. बॉईड हाच एकमेव अधिकारी परकीय असून बाकी सर्व फौज ही ऐतदेशीय होती आणि कर्नल जे. पी. बॉईड

या अधिकाऱ्यास जहागिरी न देता त्यास मासिक वेतनावर नोकरी वर ठेऊन त्यास दारू गोळा व बंदुका आणि इतर युद्धविषयक साहित्य यासाठी महेश्वर दरबारावर अवलंबून राहावे लागणार व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कारकून ठेवला होता. यापूर्वी मराठा सरदारांनी कवायती पलटणी निर्माण केल्या त्यात परकीय अधिकाऱ्यास जहागिरी देण्यात येत असे तसेच ते ब्रिटिशांबरोबर म्हणजे आपल्या देशाच्या विरुद्ध आम्ही लढणार नाही अशी करारात ठळक अट होती. मात्र त्यापेक्षा त्यांनी केलेला करार हा वेगळा होता. त्यामुळे राष्ट्रीयत्व बळ वाढविण्याच्या कामी या पलटणीचा उपयोग होऊन राष्ट्राचे संरक्षण होणार होते यामुळे राष्ट्रीय भावना वृद्धीस झाल्याचे दिसून येते. राष्ट्र व

राज्य हिताच्या दृष्टीने ब्रिटिश अधिकारी ऐवजी अमेरिकन अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याच्याशी केलेल्या कराराात राजकीय दूरदृष्टी व बुद्धीचातुर्य दिसून येते.

**निष्कर्ष:**

1. अहिल्यादेवी होळकरांनी तत्कालीन परिस्थितीत सामाजिक व राजकीय दृष्टिकोण बाळगुन कार्याला प्रारंभ केलेला दिसून येते.
2. अहिल्यादेवी होळकरांचे कार्य सर्वव्यापक व जनकल्याणकारी असे होते.
3. अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा मध्यबिंदू हा सामान्यजन होता, यामुळे त्यांची कार्य जनतेच्या हृदयात कायमचे कोरले गेले आहे..
4. अहिल्यादेवी होळकरांच्या कार्यामुळे समाजावर व तत्कालीन राज्यकर्त्यांवर सकारात्मक
5. अहिल्याबाई होळकर यांनी खऱ्या अर्थाने विविधतेने नटलेल्या भारताला एकात्मतेच्या धाग्यात सुसूत्रपणे बांधण्यात मोलाची भूमिका निभावलेली आहे.

**समारोप :**

कर्मयोगीनी अहिल्यादेवी होळकर यांनी जनहित लक्षात घेऊन केलेली जनहिताची व जनकल्याणकारी कार्ये ही आज देखील आदर्शवत स्वरूपाचे असून त्या कार्याची प्रचिती म्हणून विविधतेने नटलेला हा भारत देश धार्मिक , सांस्कृतिक दृष्ट्या एकसंघ करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे.

**संदर्भ :**


1. https://marathi.newsbharati.com/ahilyadevi-holkar-info/
2. उपरोक्त.
3. तायडे सुरेश -बहुजनांचे दीपस्तंभ, अथर्व पब्लिकेशन्स जळगाव, २०१३, पृष्ठ क्र. ७४
4. https://ahilyabaiholkar.in/ahilyabai-holkar-information/
5. उपरोक्त.
6. https://panchjanya.com/2024/08/13/336519/bharat/madhya-pradesh/ahilyabai-holkar-journey-from-rajshri-to-rajarshi/
7. खडपेकर विनया - ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००७,
8. लोही म. ना. - देवी अहिल्याबाई : वास्तव दर्शन
9. शर्मा उदयभानू -लोकमाता अहिल्या

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal** (A Peer Reviewed Referred) **ISSN – 2454 - 7905**

# भारतीय स्त्री चिंतनाच्या आदर्श :- अहिल्याबाई होळकर

**नादरगे चंद्रदीप बालाजी**
कलाशिक्षक, श्री पांडूरंग विद्यालय,कल्लूर ता. उदगीर जि. लातूर, महाराष्ट्र

अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक विलक्षण स्त्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या विविध कार्यामुळे त्या भारतीय स्त्रीच्या आदर्श जीवनाचे प्रतीक बनल्या आहेत. अहिल्याबाईंचे जीवन, त्यांचे कार्य आणि त्यांनी उभारलेला समाजसुधारक दृष्टिकोन हे आजही प्रेरणादायी आहेत. त्यांचे कर्तृत्व म्हणजे राजकारण, समाजकारण आणि धार्मिक आस्थेचा उत्तम संगम होय.परंतु या लेखाच्या माध्यमातून भारतीय स्त्रियांसाठी अहिल्याबाई होळकर यांनी केलेले कार्य अभ्यासणार आहोत.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी महिलांच्या सामाजिक शैक्षणिक आणि धार्मिक उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य केले त्यांच्या कार्यातून स्त्री शक्तीच्या आदर्शाचा डोंगरच उभा राहिला हे त्रिकाल सत्य आहे. भारतीय स्त्री चिंतनाच्या आदर्श ही संकल्पना भारतीय संस्कृती, समाज, आणि तत्त्वज्ञानाच्या मूळ गाभ्याशी जोडलेली आहे. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत स्त्रीला एक सर्जनशील, शक्तिशाली, आणि आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख दिली गेली आहे. भारतीय स्त्री चिंतन हे स्त्रीच्या विविध भूमिकांवर आधारित आहे, जसे की ती एक माता, पत्नी, कन्या, शिक्षिका, योद्धा, तसेच समाज सुधारक आहे. हे चिंतन केवळ तिच्या सामाजिक कर्तव्यासाठी मर्यादित नसून, तिच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक, आणि मानसिक शक्तींचा सन्मान करणारे आहे.

**प्रारंभिक जीवन**

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी गावात झाला. त्यांचे वडील मानकोजी शिंदे हे एक सामान्य शेतकरी होते. अहिल्याबाईंचे बालपण अत्यंत साधेपणाने गेले, पण लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये असलेल्या चातुर्यामुळे त्या सर्वांच्या लक्षात आल्या. त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी कमी मिळत असे, पण अहिल्याबाईंना त्यांच्या वडिलांनी धार्मिक आणि नैतिक शिक्षण दिले. त्यांच्या चरित्रात साधेपणा, शिस्त, आणि धर्मनिष्ठा ही गुण स्पष्ट दिसून येतात.

**होळकर घराण्यात प्रवेश**

माळव्यातील होळकर घराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर हे एक पराक्रमी योद्धा आणि प्रशासनतज्ञ होते. मल्हाररावांना अहिल्याबाईंच्या गुणांची ओळख झाली आणि त्यांनी आपल्या मुला खंडेराव होळकरांसाठी अहिल्याबाईंचा विवाह निश्चित केला. विवाहानंतर अहिल्याबाई इंदूरच्या राजघराण्यात आल्या, जिथे त्यांनी राजघराण्यातील परंपरा आणि कार्यपद्धती शिकली. मात्र, त्यांचे वैवाहिक जीवन फार काळ टिकले नाही. खंडेराव युद्धात शहीद झाल्यानंतर अहिल्याबाई विधवा झाल्या, पण त्यांच्या आयुष्याचा प्रवास इथेच संपला नाही.

**"ज्यांच्या हातात महादेवाची पिंड**
**आणि तलवार पेलली जाते....!**
**त्याच व्यक्तीमध्ये इतिहास**
**घडविण्याचे सामर्थ्य असते."**

पुण्यश्लोक, कर्मयोगीनी, शिवयोगीनी, राजमाता राणी असूनही जिची वेगळी छाप होती, अशी राणी अहिल्याबाई होती. मनगटात ताकत आणि त्यांच्या तलवारीत आग होती, इंग्रजांनाही दाद न देण्याची जिद्दच त्यांची न्यारी होती. राणी अहिल्यादेवी यांनी 28 वर्षे शासन केले आणि त्यांनी 65 पेक्षा जास्त मंदिर बनवले. पूर्ण हिंदुस्तान मध्ये प्रसिद्ध असलेले काशीमधले बाबा विश्वनाथाचे जे मंदिर आहे ती अहिल्यादेवीची देण आहे. स्त्री शिक्षणासाठी सर्वप्रथम आवाज उठवणारी महिला. साम्राज्ञी आणि संत पण. अहिल्याबाई होळकर एक अतिशय दानशूर, कर्तुत्वान, धर्मपरायण व कार्यक्षम राजकर्ती होत्या. एवढेच नव्हे तर त्या उच्च कोटीच्या दानशूर होत्या. कश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत अनेक मंदिराचा त्यांनी जिर्णोद्धार केला. तीर्थस्थळी धर्मशाळा बांधल्या. पिण्याच्या पाण्यासाठी

हौद बांधले. नदीकाठी घाट बांधले आणि गरिबासाठी अन्नछत्रे उभारले. ऑगस्ट 1795 मध्ये 70 वर्षे वय असताना त्या ज्यावेळेस आनंतात विलीन झाल्या. त्यावेळेस त्यांना देवीचा दर्जा देण्यात आला. अहिल्यादेवी या नावाने त्या ओळखल्या जाऊ लागल्या.

**भारतीय स्त्री चिंतनात अहिल्याबाईंचे स्थान :**

अहिल्याबाई होळकर हे स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत. त्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जात होते, पण अहिल्याबाईंनी त्यांच्या कर्तृत्वाने हे मत खोटे ठरवले. त्यांनी स्त्रीला फक्त कुटुंबापुरते मर्यादित न ठेवता, राज्यकारभारातही स्थान मिळवून दिले.

**सती प्रत्येच्या विरोधात भूमिका**

अहिल्याबाई होळकर यांनी सती प्रथेच्या विरोधात ठाम भूमिका घेतली आणि या अमानवी प्रथेच्या निर्मूलनासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्या काळात सती प्रथा म्हणजे पतीच्या मृत्यूनंतर पत्नीने स्वतःला त्याच्या चितेसोबत जाळून घेणे ही सामाजिक रूढी होती. अहिल्याबाई या प्रथेला विरोध करणाऱ्या थोर समाजसुधारकांपैकी एक होत्या. अहिल्याबाई होळकर यांनी स्त्रियांवरील अन्यायकारक प्रथांच्या विरोधात समाजसुधारकाची भूमिका बजावली. सती प्रथेचा विरोध करून त्यांनी स्त्रियांना न्याय, सन्मान आणि नवीन आयुष्य जगण्याचा मार्ग अश्याप्रकारे दाखवून दिला. अहिल्याबाईंनी सती प्रथेचे समर्थन करणाऱ्या विचारसरणीला आव्हान दिले. त्या स्वतः स्त्री शिक्षण आणि सन्मानाचे समर्थक होत्या. त्यांनी स्त्रियांना सती जाण्यासाठी जबरदस्ती करण्यास कडक मनाई केली.आपल्या राज्यकारभारात अहिल्याबाईंनी सती प्रथेवर बंदी घालण्यास सुरुवात केली. त्यांनी अधिकारी आणि समाजप्रमुखांना आदेश दिले की, कोणीही स्त्रियांवर सती जाण्यासाठी दबाव टाकणार नाही. सती जाणाऱ्या स्त्रियांना वाचऊन सुरक्षित वातावरण देण्यासाठी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी अहिल्याबाईंनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी विधवांना जीवन जगण्याचा एक नवा डोळस मार्ग दाखवून प्रोत्साहन दिले. त्यांनी सती प्रथेला अनिष्ट आणि अमानवी मानून समाजात एक अलौकीक जागृती घडवून आणली.

**विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन :-**

अहिल्याबाई होळकर यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले होते. त्या काळात समाजात विधवांना अनेक बंधनांमध्ये अडकवले जात होते आणि त्यांचे पुनर्विवाह करणे हे पूर्णपणे निषिद्ध मानले जात होते. मात्र, अहिल्याबाई होळकर यांनी या अनिष्ट प्रथेविरुद्ध आवाज उठवून विधवा पुनर्विवाहासाठी समाजात सकारात्मक विचारसरणी रुजवण्याचा प्रयत्न केला. अहिल्याबाईंनी होळकर यांनी त्यांच्या घराण्यातील किंवा परिचयातील विधवांच्या पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला. त्यांच्या उदाहरणाने इतर लोकांवर मोठा प्रभाव पडला. त्या लोकांमध्ये जाऊन विधवा पुनर्विवाहाची गरज सांगत आणि अशा विवाहांना सामाजिक मान्यता मिळावी यासाठी प्रयत्नशील राहिल्या. त्यांनी धार्मिक आणि सामाजिक बंधने बाजूला ठेवून अशाप्रकारे स्त्रियांच्या उद्धारासाठी पुढाकार घेतला.अहिल्याबाई होळकर या केवळ समाजसुधारक नव्हत्या, तर त्यांनी आपल्या राज्यकारभारात विधवा स्त्रियांना न्याय मिळावा यासाठी विशेष योजना आखल्या आणि सामाजिक सुधारणांसाठी धोरणे अंमलात आणली.अशा प्रकारे अहिल्याबाईंनी त्यांच्या प्रगल्भ विचारसरणीने आणि कृतीशीलतेने विधवा पुनर्विवाहाला मान्यता मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे स्त्रियांना नवीन आयुष्याचा विचार करण्याची संधी मिळाली.

**स्त्री शिक्षणाला पाठिंबा :**

अहिल्याबाई होळकर यांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्या काळात स्त्री शिक्षण पाप आहे असे म्हणून स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवले गेले. मात्र अहिल्याबाईंनी स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला. अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात स्त्रियांसाठी शिक्षण उपलब्ध होण्यासाठी शाळा आणि शिक्षणसंस्था स्थापन केल्या. यामुळे स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग खुला झाला. त्यांनी समाजात स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणामुळे स्त्रिया आत्मनिर्भर होतील आणि समाजाचा विकास होईल, हा विचार त्यांनी प्रत्येक स्त्रियांच्या मनात रुजवला. त्या काळात स्त्रियांना शिक्षण मिळू नये यासाठी धार्मिक व

सामाजिक बंधने होती. अहिल्याबाईंनी या अडचणींना दूर करून स्त्री शिक्षणाला पुढे नेले. शिक्षण हे स्त्रियांच्या स्वावलंबनाचे साधन आहे, हे अहिल्याबाईंनी समाजाला समजावून सांगितले. शिक्षणाने स्त्रिया आपल्या अधिकारांची जाणीव करून घेऊ शकतील, यावर त्यांनी भर दिला.

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या प्रगत विचारांनी स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले आणि शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना सामाजिक व आर्थिक सशक्तीकरणाचा मार्ग दाखवला.

**महिला आर्थिक स्वावलंबनासाठी उपाय :**

अहिल्याबाई होळकर यांनी महिला आर्थिक स्वावलंबनासाठी त्या काळात महत्त्वपूर्ण उपाय केले, जे स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने आदर्श मानले जातात.त्या काळात अहिल्याबाईंनी महिलांना स्वतःच्या उपजीविकेसाठी कौशल्याधारित रोजगार उपलब्ध करून दिला. कातडी कमावणे, विणकाम, हस्तकला, आणि शेती यांसारख्या क्षेत्रांत महिलांना संधी दिली. त्यांनी महिलांना छोटे उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले. जसे की वस्त्रनिर्मिती, घरगुती वस्तूंचे उत्पादन आणि व्यापार. यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचा मार्ग मिळाला. अहिल्याबाईंनी महिलांना सार्वजनिक कामांमध्ये सहभागी करून घेतले. मंदिरांची निर्मिती, रस्ते, आणि इतर पायाभूत सुविधांच्या निर्मितीत महिलांना सहभागी करून घेतल्यामुळे त्यांना आर्थिक लाभ मिळाला. त्यांनी महिलांच्या आर्थिक हक्कांना मान्यता दिली. महिलांना संपत्तीचे व मालमत्तेचे हक्क मिळावेत यासाठी त्यांनी न्याय्य धोरणे आखली. धार्मिक क्षेत्रातील अनेक महत्त्वाची कामे त्यांनी महिलांच्या नेतृत्वाखाली दिली, जसे की धार्मिक अनुष्ठानांसाठी लागणाऱ्या साहित्याचे उत्पादन. अहिल्याबाई होळकर यांनी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी केलेले उपाय समाजासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांनी महिलांना कौशल्य, रोजगार, आणि संपत्तीचे हक्क देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवले. तेव्हा त्या ठिकाणी अहिल्याबाई होळकर स्त्रियांच्या मना-मना वसल्या.

**महिला सुरक्षतेसाठी उपाय :**

अहिल्याबाई होळकर यांनी महिला सुरक्षेसाठी त्या काळात प्रभावी उपाय राबवले, ज्यामुळे महिलांना सामाजिक आणि वैयक्तिक स्तरावर सुरक्षिततेची भावना प्राप्त झाली. अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात महिलांविरोधातील अत्याचारांना आळा घालण्यासाठी कठोर कायदे लागू केले. गुन्हेगारांना कठोर शिक्षा देऊन त्यांनी महिलांच्या संरक्षणाची हमी दिली. त्यांनी महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचारासंदर्भात जनजागृती केली आणि अशा घटनांना समाजाने विरोध करावा यासाठी प्रयत्न केले. अहिल्याबाईंनी संकटात सापडलेल्या महिलांसाठी मदत केंद्रे उभारली. त्या केंद्रात त्यांना संरक्षण, सल्ला, आणि आधार मिळत असे. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात महिलांनाही स्थान देण्यात आले, ज्यामुळे महिलांना संरक्षणाची अधिक खात्री वाटली. समाजातील दुर्बल महिलांसाठी पुनर्वसनाची व्यवस्था केली आणि त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी सहाय्य केले.स्त्रियांना धोका निर्माण करणाऱ्या प्रथांवर (जसे की सती प्रथा आणि बालविवाह) त्यांनी कठोर बंदी घातली आणि त्याऐवजी सुरक्षित आणि सन्माननीय जीवनासाठी प्रयत्न केले. अहिल्याबाई होळकर यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी सामाजिक आणि प्रशासकीय स्तरावर महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. त्यांच्या उपायांनी महिलांना आत्मसन्मान आणि सुरक्षित जीवनाचा मार्ग मिळवून दिला.

**महिलांचे धार्मिक अधिकार :**

अहिल्याबाई होळकर यांनी महिलांना धार्मिक अधिकार मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्या काळात महिलांना धार्मिक कृत्यांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास अनेक मर्यादा होत्या. अहिल्याबाईंनी या सामाजिक बंधनांना आव्हान देत महिलांना धार्मिक अधिकार देण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली. अहिल्याबाईंनी महिलांना धार्मिक विधी आणि पूजा-अर्चनेत सहभाग घेण्याचा हक्क मिळवून दिला. त्यांनी समाजात हा विचार रूजवला की महिलांनाही धर्मशास्त्रीय अधिकार आहेत. त्या काळात अनेक ठिकाणी महिलांना मंदिरांमध्ये प्रवेश मर्यादित होता. अहिल्याबाईंनी महिलांसाठी मंदिरांचे दरवाजे खुले केले आणि त्यांना समान धार्मिक अधिकार मिळवून दिले.

महिलांना धार्मिक शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यामुळे स्त्रिया धर्मशास्त्र समजून घेत स्वतःच्या अधिकारांची जाणीव करू लागल्या. अहिल्याबाईंनी महिलांना धार्मिक क्षेत्रात नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

त्यांनी महिलांना धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन आणि देखरेख करण्याचे अधिकार दिले.अहिल्याबाईंनी स्त्रिया आणि पुरुष यांच्यात धर्माच्या बाबतीत कोणताही भेदभाव होऊ नये यासाठी कडक धोरणे आखली. त्यांनी धार्मिक स्थळे विकसित करून महिलांसाठी तीर्थयात्रांना सुलभता दिली, ज्यामुळे त्यांना धार्मिक साधना आणि उपासनेसाठी प्रोत्साहन मिळाले.

अहिल्याबाई होळकर यांनी महिलांना धार्मिक अधिकार मिळवून देऊन त्यांना समाजात एक आदराचे स्थान मिळवून दिले. त्यांच्या कार्यामुळे महिलांना धर्माशी संबंधित पारंपरिक बंधने सोडवून समान हक्कांचा लाभ घेता आला. अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व महिलांसाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या विचारांनी आणि कार्यांनी महिलांना आत्मसन्मान, अधिकार, आणि समाजात समान स्थान मिळवून देण्याचा मार्ग दाखवला. त्यांच्या जीवनातून आधुनिक काळातही महिलांना संघर्ष, धैर्य, आणि स्वावलंबनाची प्रेरणा मिळते.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. "श्रीमती अहिल्याबाई होळकर" – लेखक: य.गो. महाजन
2. "Ahilyabai Holkar: The Great Maratha Queen" – लेखक: V.S. Kadam

# लोककल्याणकारी व लोकाभिमुख राज्यकर्त्या: आहिल्याबाई होळकर

**Prof. Dr. Maheshwari Virsing Gavit**

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune Hind Seva Mandal's, Pemraj Sarda College, Ahilyanagar-414001.

**सारांश :-**

अहिल्याबाईंचे राज्यकारभारात येणे फार वेगळे होते.त्यांची गुणवत्ता लक्षात घेऊन त्यांचे सासरे मल्हाररावांनी त्यांना राजकारणात आणले. अहिल्याबाईंच्या राज्यकारभाराची प्रेरणा ही कधीच स्वार्थी नव्हती. **'जनकल्याणासाठी शासन'** ही गोष्ट त्यांनी महत्त्वाची मानली. त्यांनी राज्यकारभार हाती घेतला तेव्हा ''माझे कार्य प्रजेला सुखी करणे आहे,माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वतः जबाबदार आहे" अशी प्रतिज्ञा त्यांनी घेतली होती. अहिल्याबाईंनी जवळजवळ अठ्ठावीस वर्षे राज्यकारभार केला.**'राजा हा प्रजेचा विश्वस्त आहे'** हीच भावना त्यांच्या ठायी होती. प्रजाहित, लष्करी व्यवस्थापन, न्यायनिष्ठा, सामाजिक समता, धर्म-संस्कृतीचे रक्षण व संवर्धन ही त्यांच्या राज्यकारभाराची महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणता येतील. अहिल्याबाईंचे राजकारण लोकाभिमुख असल्याने लोककल्याणकारी कार्य त्यांनी केले, म्हणूनच त्यांना 'लोकमाता'या नावाने ओळखले जाते.

**बीजसंज्ञा :-** अहिल्याबाई, राज्यकारभार, लोककल्याणकारी, प्रजाहित, न्याय

**प्रस्तावना :-**

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये अहिल्याबाई होळकरांचे नाव अव्दितीय असेच आहे. आदर्श राज्यकर्ता कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाई. अहिल्याबाईंच्या दृष्टीने मुख्य केंद्र होते ती सर्वसामान्य जनता.म्हणूनच शेतकरी, कष्टकऱ्यांना त्यांनी विशेष अर्थसाहाय्य पुरवले. शेतीसाठी मुबलक पाण्याची सोय, बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या.कलावंतांनाही प्रशिक्षण कार्यशाळा, व्यवसाय, बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या. अनाथ, महिला, रंजल्या-गांजल्या सर्वांनाच आधार दिला. भटक्या-आदिवासी जमातींतील युवकांचे प्रबोधन करून, सन्मानाचे जीवन दिले. कलाकारांना राजाश्रय दिला, सन्मान दिला. गरीब व गरजूंसाठी मोफत अन्नछत्रे चालविली. आपल्या खाजगी उत्पन्नातून धर्मशाळा, प्रार्थनास्थळे, नद्यांवर घाट, पाणवठा यांचे बांधकाम केले. मंदिरांचे जीर्णोद्धार केले.त्यांच्या काळात सर्वसामान्य माणसाला न्याय मिळत होता.शेजारील राज्य व राज्यकर्ते यांच्याशी त्यांनी सलोख्याचे, मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. सैन्य, कर्मचारी यांना उत्तम पगार दिले. महसूल दर कमी केला. अहिल्याबाईंनी केलेले राजकीय कार्य आजही सर्वांना प्रेरणादायी आणि आदर्शवत आहे.

**संशोधनाची गृहितके :-**

१) अहिल्याबाई होळकरांच्या कार्याचा केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस होता.

२) अहिल्याबाई होळकरांचे कार्य सर्वव्यापक व लोककल्याणकारी होते.

३) अहिल्याबाईंच्या कृतीत आणि उक्तीत 'प्रजेचे अंतिम कल्याण'हेच सूत्र होते.

४) अहिल्याबाईंचे राजकारण लोकाभिमुख असल्याने लोककल्याणकारी कार्य त्यांनी केलेले दिसते.

**संशोधनाची उद्‌दिष्टे :-**

१) अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय कार्याचा परिचय करून देणे.

२) एक आदर्श राज्यकर्त्या म्हणून त्यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.

३) अहिल्याबाई होळकर यांच्या समकालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय कार्यातील नाविन्यपूर्ण पैलूंचा वर्तमान काळाच्या संदर्भात विचार करणे.

५) अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय कार्याचा सामाजिक परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्‌धती :-**

या शोधनिबंध लेखनासाठी विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन पद्‌धतीचे उपयोजन करण्यात आले आहे.तसेच चरित्रात्मक, ऐतिहासिक संशोधन पद्‌धतीचाही अवलंब केला आहे. अहिल्याबाई होळकर यांच्यावरील चरित्रग्रंथ, कोशवाड्मय, वैचारिक ग्रंथ यांचाही आधार घेतला आहे.

**विषय विवेचन :-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर माळवा प्रांताच्या (सध्याचा मध्यप्रदेश) शासक होत्या.मात्र त्यांची दृष्टी संपूर्ण भारताला कवेत घेणारी होती.अहिल्यादेवी या उत्कृष्ट शासक, प्रशासक, अर्थतज्ज्ञ, समाजसुधारक, लष्करी नेत्या आणि राजनीतिज्ञ होत्या अहिल्यादेवी यांनी कल्याणकारी राज्याची पायाभरणी केली होती. यात स्त्रियांच्या सन्मानापासून तर आदिवासींच्या सन्मानापर्यंत सर्वच घटकांचा समावेश होतो.त्यांनी घेतलेले सर्वसमावेशक आणि कल्याणकारी निर्णय अभ्यासले, तर अहिल्याबाई होळकर यांचे राज्य म्हणजे ‘वेल्फेअर स्टेट’ चे आदर्श मानावे लागेल. अहिल्याबाई यांनी मानवी जीवनाच्या सर्व पैलूंबाबत निर्णय घेतलेले दिसून येतात. त्यामध्ये शेती जलसंधारण,महसूल पासून मंदिर निर्मिती आणि त्यांचे व्यवस्थापन यांचा समावेश होतो. विशेष म्हणजे अहिल्यादेवी यांचे भारतातील अन्य शासकांशी अत्यंत सलोख्याचे संबंध होते.

इ.स.१७५४ मध्ये खंडेराव होळकरांचा मृत्यू झाला व अहिल्यादेवींना अकाली वैधव्य आले.पुढे अहिल्याबाईंचे सासरे मल्हारराव इ.स. १७६६ मध्ये मरण पावले.त्यांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाईंचा मुलगा मालेरावाला पेशव्यांकडून सरदारकीची वस्त्रे मिळाली, पण तो वेडसर, विलासी व व्यसनी निघाला. तसेच तो व्रात्य व तामसीही होता. जेमतेम आठ-दहा महिने कारभार केल्यावर तो वयाच्या बाविसाव्या वर्षी मरण पावला. अहिल्याबाईंनी तुकोजी होळकर नावाच्या आपल्या आप्त तरुणाला मल्हाररावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्याकडे फौजेची आणि मोहिमांची जबाबदारी सोपविली आणि त्या स्वतः खाजगीचा आणि दौलतीचा कारभार पाहू लागल्या. इंदोरपासून जवळच नर्मदा काठी महेश्वर येथे त्यांनी आपली राजधानी केली आणि तिथेच राहून त्या राज्यकारभार करू लागल्या.अहिल्याबाईंना राज्यकारभार कसा झेपणार?अशी शंका त्यावेळी कित्येक दरबारी मंडळींना आली.त्यात जुना दिवाण गंगोबा तात्या हा प्रमुख होता. ‘आपण दत्तक घ्या आणि कारभार माझ्यावर सोपवा’.असा त्याने बाईच्या मागे लकडा लावला,पण अहिल्याबाई बधत नाही,असे पाहून त्याने राघोबादादाशी संधान साधले आणि त्याला इंदोरवर स्वारी करून दौलत बळकावण्याची विनंती केली त्याप्रमाणे राघोबादादाने स्वारीचा बेत केला. अहिल्याबाईंना या कपटकारस्थानाचा सुगावा लागताच त्या राघोबाच्या स्वारीला तोंड देण्याच्या तयारीला लागल्या. भोसले,

गायकवाड, दाभाडे व शिंदे यांना त्यांनी आपल्याला मदत करण्यासाठी गुप्त पत्रे पाठवली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी पुण्याला जासूद पाठवून माधवराव पेशव्यांकडे दाद मागितली. न्यायनिष्ठूर माधवरावाने त्यांना निरोप पाठवला की, तुमचे दौलती विषयी जो पापबुद्धी ठेवील, त्याचे पारिपत्य बेलाशक करावे. राघोबा पन्नास हजार फौजेनिशी त्यावेळी उज्जयिनी जवळ अंकपात घाटावर मुक्काम करून होता. लढाई अटळ असल्याची खात्री होताच अहिल्याबाईंनी तुकोजी होळकर याला चालून जाण्याची आज्ञा दिली. तुकोबा रातोरात उज्जयिनीत दाखल झाला.दुसऱ्या दिवशी राघोबा दादाची आघाडीची तुकडी क्षिप्रेत उतरल्याचे कळताच तुकोजीने सांडणीस्वाराबरोबर इशारा दिला की क्षिप्रा उतरला असता तुमची आमची तलवार चालेल. याचा विचार करून पाऊल टाकणे.या निरोपासरशी लढाईचा रंगच बदलला.अहिल्याबाई लढणार नाही, तह करील, खंडणी देईल अशी राघोबाची कल्पना होती, पण ती फोल ठरली.अहिल्याबाईंची तयारी, हिंमत आणि डावपेच पाहून राघोबादादा चकित झाला. चढाई करावी तर होळकरांकडून कडवा प्रतिकार होणार, कदाचित पराभव पत्करावा लागणार.बाईकडून पराभूत होणे यासारखी मानहानी नाही. बरे बाईला जिंकले तरी त्यात फारसे भूषण नाही. अशा स्थितीत लढाई टाळून मान राखून घ्यावा, हेच बरे असा पोक्त विचार करून राघोबाने तुकोजीशी सामोपचाराची बोलणी लावली.नंतर राघोबा इंदोरला अहिल्याबाईंना भेटायला गेला. त्यांचा पाहुणचार, लोकप्रियता व आदर्श जीवन बघून राघोबा खजील झाला.अशा रीतीने अहिल्याबाईंनी धैर्याने व मुत्सद्देगिरीने राघोबावर विजय मिळवला.यामुळे प्रजाजनांत त्यांचा लौकिक वाढला आणि पेशवे, शिंदे, मोगल, निजाम सर्वांवर त्यांच्या कर्तबगारीची छाप बसली.[१]

अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाला मल्हाररावांच्या कार्तबगारींची,मार्गदर्शनाची आणि मायेची पार्श्वभूमी आहे.मल्हारराव लहानसहान जबाबदाऱ्या अहिल्याबाईवर सोपवित.पत्रांची ने-आण करणाऱ्या काशीद जोड्यांवर लक्ष ठेवणे, त्यांच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था पाहणे,हुंड्या वटवून पैसा उभा करणे इत्यादी. सून त्या चोख पार पाडू लागली, तसे मल्हारराव आणखी जबाबदाऱ्या सोपवू लागले, ते अहिल्याबाईंना शिकवू लागले.तोफांसाठी लागणारी दारू कशी तयार करायची, तो कारखाना कसा लावायचा, तो रणक्षेत्रापासून किती अंतरावर असला पाहिजे,विशिष्ट तोफा वाहून नेण्याचे काम कसे करायचे, त्यासाठी बैलजोड्या कशा असल्या पाहिजेत इ. काही गोष्टी अहिल्याबाई स्वतःहून करू लागल्या.लढाईत जखमी होणाऱ्या माणसांवर अनुभवी जाणते माणसे उपचार करीत असत.झाडपाल्याची, जडीबुटीची ती औषधे अहिल्याबाईंनी माहिती करून घेतली आणि त्याही ते उपचार करू लागल्या. मग इंदूरच्या वाड्यात कोणाची तब्येत बिघडली की, अहिल्याबाई औषध देत. मल्हारराव होळकरांच्या सान्निध्यात अहिल्याबाईच्या राजकीय आणि समाजोपयोगी कार्याची जडणघडण झालेली दिसते.[२]

अहिल्याबाईंनी जवळ-जवळ अठ्ठावीस वर्षे राज्यकारभार केला.आरंभी सोळा लाखांची रोकड व पाऊण कोट उत्पन्नाचा मुलुख त्यांच्या ताब्यात होता. त्यांच्या कारकिर्दीत हे उत्पन्न वाढत एक कोटीपर्यंत गेले.त्यांच्या कारभाराचे खाजगी व दौलत असे दोन भाग होते. खाजगीचा कारभार त्या स्वतः पाहत असत आणि दौलतीचा कारभार त्या कारभाऱ्यांमार्फत पाहात.खाजगीचे उत्पन्न सुमारे पंधरा लाखांचे होते व त्या उत्पन्नावर त्यांची पूर्णतः मालकी होती. धार्मिक कार्यासाठी त्या या उत्पन्नातून खर्च करीत.दौलतीचा म्हणजे राज्याचा पैसा त्यांनी वैयक्तिक दानधर्माकडे कधीच खर्च केला नाही. उलट खाजगी उत्पन्नातील शिल्लक दौलतीकडे लावण्याचा सुज्ञपणा त्यांनी दाखवला. फौजेची सारी व्यवस्था त्यांनी प्रथमपासून तुकोजी

होळकरांवर सोपवली होती.त्यांच्याजवळ पंधरा हजार फौज होती. याशिवाय अहिल्याबाईंनी स्वतःची अशी थोडी वेगळी फौज ठेवलीच होती.पेशव्यांवर त्यांची अपार निष्ठा होती.[३]

सवाई माधवराव, नाना फडणीस हरिपंत फडके यांच्याशी अहिल्याबाईंचे मैत्रीपूर्ण संबंध होते. ही सर्व मंडळी अहिल्याबाईंच्या चारित्र्याने अनेक कर्तृत्वाने भारावून गेलेली होती. इतर राज्यांशीही अहिल्याबाईंचे संबंध स्नेहाचे होते. अहिल्याबाईंनी सासऱ्याच्या वेळच्या अनेक कायद्यात सुधारणा केल्या त्यांच्या कारकीर्दीत करपद्धती सौम्य होती.शेतकऱ्यांकडून उत्पन्नानुसार सारा वसूल केला जाई. पाटील-कुलकर्ण्यांच्या हक्काचे त्यांनी संरक्षण केले व गावोगावी न्याय देणारे पंचाधिकारी नेमले.महालाच्या ठिकाणी लायक अधिकारी नेमले डोंगराळ मुलखात भिल्ल व गोंड लोक प्रजेला वारंवार उपद्रव देत असत. त्यांना प्रेमाने वठणीवर आणले.डोंगरी मुलखातून जाणाऱ्या येणाऱ्या व्यापाऱ्यांकडून भिल्ल व गोंड भीलकवडी नावाचा कर वसूल करीत असत. त्यांचा तो हक्क मान्य करून त्यांनी त्यांचा स्नेह संपादन केला व त्यांच्याकडून पडिक जमिनीची लागवड करून घेतली.क्वचित प्रसंगी कडक धोरण स्वीकारून अहिल्याबाईंनी मनरूप सिंहासारख्या डाकूला देहांताची शिक्षाही फर्मावली.[४]

त्यांच्या घरातील मुलगी सुनांसह १८ स्रिया सती गेल्या.अशा बिकट परिस्थितीत त्यांनी धैर्याने सर्व राज्यकारभाराचे रक्षण तर केलेच,परंतु मल्हारराव होळकरांचा लौकिक कायम राखत, राज्याची घडी विस्कटू दिली नाही, तर होळकरशाहीचे वैभव कायम राखले व अनेक सत्कृत्य करून 'पुण्यश्लोक' होण्याचा मान त्यांनी मिळविला.

राज्यकर्ता कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाई.त्यांनी अन्नछत्रे उघडली, विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा बांधल्या, राज्यात हकीम वैद्य नेमले, स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओव-या बांधल्या. उभ्या आयुष्यात त्यांनी किती मंदिरे बांधली आणि किती देवळांचा जीर्णोध्दार केला, याची गणतीच नाही.आयुष्यात दुःखाबरोबर अनेक संघर्षांनाही तोंड द्यावे लागले. पेशव्यांकडे अहिल्याबाईंना मानाचे स्थान होते. शिंदे- होळकर हा वाद फार जुना.त्यालाही त्यांनी धैर्याने तोंड दिले.

अहिल्याबाईंच्या कारभाराचे वैशिष्ट्य म्हणजे उपेक्षित समाजाच्या उन्नतीसाठी त्यांचे समर्पण.त्यांनी विविध कल्याणकारी योजना राबविल्या, ज्यात आर्थिक साहाय्य निवारा आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले. त्यांची धोरणे विशेषतः विधवा, अनाथ आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्यांसाठी फायदेशीर होती. ज्यामुळे असुरक्षित लोकसंख्येला संसाधने आणि संधी मिळतील याची खात्री होते अहिल्याबाईंचा कल्याणाचा दृष्टिकोन सर्वांगीण होता. त्यांना माहीत होते की खऱ्या सक्षमीकरणासाठी आर्थिक बळाची गरज असतेच, पण कौशल्यांचा विकास आणि उत्तम सामाजिक एकात्मता देखील आवश्यक असते. आत्मनिर्भरता आणि प्रतिष्ठा वाढवून प्रत्येकाला सन्मान आणि संधी मिळायला हवी त्यानुसार त्यांनी कार्य केले. पर्यावरणीय शाश्वततेची बांधिलकी हा उल्लेखनीय पैलू. त्यांनी पायाभूत सुविधांचे प्रकल्प दीर्घकालीन प्रभावाच्या जाणिवेने तयार केले. भिल्ल या उपेक्षित आदिवासींसाठी त्यांच्या भागात शाळा स्थापन केल्या. हस्तकला आणि व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे त्यांना आर्थिक समृध्दीच्या दिशेने प्रयत्नशील केले. शिक्षण आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करून भिल्लांना सशक्त करण्याचा प्रयत्न केला.

सर्व मराठ्यांप्रमाणेच पंढरपूरचा 'विठोबा' हे अहिल्याबाई आणि खंडेराव होळकर यांचे आवडते दैवत. दोघांचीही विठोबाविषयीची आत्मीयता त्यांच्या पत्रात व्यक्त होते. खंडेरावांनी विठोबाच्या नैवद्यासाठी वार्षिक पैशाचा करार लावून दिला आणि त्यानंतर पाचच दिवसात अहिल्याबाईंनी रखुमाईच्या मूर्तीसाठी दागिने पाठवले.ते पत्र म्हणजे इतिहासात ऐकू आलेले अहिल्याबाईंचे पहिले शब्द.खंडेरावांचे पत्र साधेच औपचारिक वाटते. अहिल्याबाईंच्या पत्रात मात्र अधिकाराची जाणीव होते त्या म्हणतात-

**"वेदशास्त्रसंपन्न राजश्री उत्पात समस्त क्षेत्र श्रीपंढरपूर स्वामीचे सेवेसी**

**सौभाग्यवती अहिल्याबाई होळकर यांचे दंडवत विनंती.**

**येथील कुशल जाणून घेऊन तिकडीलही लिहीत जाणे.विशेष आईचे पायेचा रमझोन सोन्याचा बाळोजी नाटे यांजबरोबर पाठविला आहे.तरी प्रत्यही भोगवीत जाणे यात अंतर पडिले तर उत्तम नसे.येविशीचा जाबसाल तुम्हास पुसिला जाईल.छ. १० जमादिलावल.बहुत काय लिहिणे.हे विनंती. (६ एप्रिल १७५०)**

या पत्राचा आशय असा होता-रखुबाईच्या पायातला दागिना पाठविला आहे. तो रोज घातलाच पाहिजे. सांगितल्याप्रमाणे झाले नाही तर जाब विचारला जाईल.[५]

अहिल्याबाईंना पेशव्यांनी राज्यकारभारासाठी अधिकृतपणे नियुक्त केले आणि खऱ्या अर्थाने त्या सत्तेवर आल्या,त्यावेळी त्यांचे वय ४२ वर्षांचे होते.अहिल्याबाईं मुलकी कारभार पाहात आणि तुकोजींची नेमणूक मुख्यतः फौजेच्या मोहिमांसाठी झालेली होती. तुकोजीही होळकरशाहीत आत्तापर्यंत कोणत्याही पदावर नव्हते,ते आता अगदी उच्च पदाने सन्मानित झाले.पेशव्यांनी सुभेदार हे पद दोघांपैकी कोणालाही दिलेले नसले,तरी पेशव्यांच्या वकिलासकट सर्व जनता तुकोजींना सुभेदार संबोधू लागली.अहिल्याबाईंना पूर्वीप्रमाणे 'मातोश्री' असेच सामान्यतः म्हटले जात होते,पण राज्यकारभार सांभाळल्यानंतर अहिल्याबाईंचा उल्लेख कधी 'सरदार', 'महाराज', 'साहेब' असाही होऊ लागला.[६]

अहिल्याबाईंनी ज्या क्षणी कारभार हाती घेतला, त्यावेळी देवा ब्राह्मणांसमक्ष संपत्तीवर तुळशीपत्र ठेवले आणि मनोमनी प्रतिज्ञा केली.ही प्रतिज्ञा महेश्वरच्या वाड्यावर आजही लिहिलेली आहे-

**"माझे कार्य प्रजेला सुखी करणे आहे.माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वतः जबाबदार आहे. सत्तेच्या अधिकारापुढे मी येथे जे जे काही करत आहे,त्या प्रत्येक कृत्याचा जाब मला परमेश्वरापुढे देणे आहे परमेश्वराने ज्या जबाबदाऱ्या माझ्यावर सोपवल्या आहेत,त्या मला पार पाडावयाच्या आहेत**".[७]

अहिल्याबाईंच्या राज्यकारभाराला आरंभ झाला तेव्हा अहिल्याबाईंनी प्रथम शेजारचा शिंदे राज्याचा विचार केला. पानिपतनंतरची सात वर्षे महादजींनी अत्यंत बिकट अवस्थेत काढलेली होती, हे अहिल्याबाईंना माहीत होते. हाती कारभार आल्यावर अहिल्याबाई स्वतः महादजींच्या मदतीसाठी पुढे झाल्या.अहिल्याबाईंनी महादजींना तीस लाख रुपये कर्जाऊ देऊ केले.

अहिल्याबाईंनी प्रत्येक विभागाची शाखेची रचना नव्याने केली. अहिल्याबाईंनी आपल्या सर्व कारभाऱ्यांना निरनिराळी कामे नेमून दिली.कारभाराची कार्यवाही मुख्यतः कमाविसाद्वारे होत असे.त्यांच्या जबाबदाऱ्या आणि पगार यासंबंधी सर्व काही तपशीलाने लेखी सांगितले जात असे. त्रिंबक बाबुराव यांना महेश्वरी कमाविसदार म्हणून नियुक्त केले गेले. त्या नियुक्तीपत्रात म्हटले होते, "महिलांची व्यवस्था, पालखी, शिबंदी, नाकेजात, ठाणेजात, भोजन खर्च हे सर्व मिळून कमाविसदाराचे वेतन वार्षिक तीस हजार रुपये ठरले. कमाविसदाराने भिल्ल, चोर वगैरेंचा बंदोबस्त करावा.सरकारचे जमीनदार आणि फडणीस

यांच्याकडून त्याने काम करवून घेणे, भूमिगत माल येईल तो दाखल करून घेणे. मासिक वेतन आणि कामाचे स्वरूप स्पष्टपणे निवेदन केल्यानंतर कमाविसदाराची सूचनाही दिलेली होती, आजवर चालत आलेल्या शिरस्त्याप्रमाणे हिशोबाच्या वेळी कमाविसदाराची सर्व चौकशी होईल. काही आफत किंवा फितुरी आढळल्यास त्याचा विचार करून वेतनातून अधिकउणे केले जाईल.[८]

अहिल्याबाईंच्या दरबारात लहानमोठी कित्येक प्रकरणे योग्यप्रकारे रोजची निकालात निघत होती.तुकोजी होळकर बऱ्याचदा या-त्या मोहिमेवरच होते. ते अहिल्याबाईंपुढे नमून होते. त्यांचा मोठेपणा सर्वदृष्टीने मानत होते. रयत अहिल्याबाईकडे अधिकाधिक विश्वासाने पाहू लागले होती. जुलमाचे परिमार्जन व्हावे, न्यायाने कारभार व्हावा, परिश्रमांना फळ लाभावे असे वातावरण निर्माण होत होते. त्यामुळे शेतकरी शेतात खपत होते. बारा बलुतेदार आपापल्या व्यवसायात श्रमत होते. व्यापारी चहूबाजूंनी आपापला माल घेऊन येत होते. दख्खनमधून माळव्यात ये-जा करणाऱ्या महाराष्ट्रीय माणसांचे महेश्वर हे मुक्कामासाठी हक्काचे घरच झाले. कर्नाटक, हैदराबाद या भागांतून येणारे ब्राह्मण,व्यापारीही महेश्वरला थांबून अहिल्याबाईंना भेटून मग पुढे जाऊ लागले. जाणाऱ्या-येणाऱ्यांकडून सर्व बाजूंच्या वार्ता अहिल्याबाईंना कळू लागल्या. वाहतूक जेवढी वाढू लागली, तेवढे उद्योग भरभराटीला येऊ लागले. अहिल्याबाईंच्या कृपेने विणकरांचा उद्योग चांगले मूळ धरू लागला.भरतखंडाच्या उत्तर आणि दक्षिण भागाला जोडणाऱ्या माळवा प्रदेशातले महेश्वर एक महत्त्वाचे केंद्र झाले.

अहिल्याबाईंचा कारभार सुरू झाल्यावर जुनी कर्जे, चालू खर्च, देवधर्माची व्यवस्था इत्यादींचे आधीपासूनचे हिशोब पाहणे चालू झाले. देवाचा नैवद्य, त्यासाठी असलेल्या गाईगुरांची व्यवस्था तपासण्यास सुरुवात झाली. दरबाराच्या वेळी प्रत्येक बाबीचे रूप पुढे येऊ लागले. त्यावर सर्व कारभाऱ्यांचे मिळून जाबसाल होऊ लागले. अहिल्याबाई आपला अंतिम निर्णय देऊ लागल्या. त्यातून अहिल्याबाईंच्या कार्याची नवी घडी बसत चालली. अहिल्याबाईंची एक कार्यपद्धती होती शेतकरी, बारा बलुतेदार, व्यापारी यांच्या कामाचा मोबदला अहिल्याबाई तत्परतेने देत असत, पण हातातला पैसा बड्यांसाठी सोडताना मात्र त्या दिरंगाई करत असत. अहिल्याबाईंचा मुलकी कारभार देवधर्म, अन्नछत्र, पाणपोया सुखेनैव चालू होत्या.त्यांची राज्यव्यवस्था जनहितासाठी राबत होती. अहिल्याबाईंचा दरबार भरत होता. रयत गाऱ्हाणी घेऊन येत होती. अहिल्याबाई शक्य ती मदत करीत होत्या. होळकरांच्या राज्यांतर्गत अहिल्याबाईंचा होळकरशाहीच्या मुलकी कारभारावर पूर्णपणे अंमल होता. त्यांच्या देवाधर्माच्या आणि जनहिताच्या कार्याला मात्र राज्याची सीमा नव्हती. ते भरतखंडाच्या चारी दिशांना पसरत होते.

अहिल्याबाईंच्या व्यवस्थापनाची सर्व वैशिष्ट्ये बुळे प्रकरणात दिसतात.त्यांनी गोविंदराव बुळे यांना मुजोर होऊ दिले नाही, पण सूडबुध्दीने अद्दलही घडवली नाही. आपला हिशोब वसूल करून त्यांना वाऱ्यावर सोडले नाही. त्यांच्याकडून सर्व हिशोब मागितला आणि तपासला. त्यातले एक-एक खाते अगदी सोलून पाहिले. चाकरी करणाऱ्यांचे आणि अहिल्याबाईंच्या कारभाऱ्यांचे दोघांचेही यामुळे समाधान झाले.सावकारांचे कर्ज फिटले पाहिजे याची खबरदारी घेतली.बुळे यांची कदर केली. त्यांची कर्जफेडीची रक्कम काही वर्षात विभागून त्यांचा भार हलका केला. होळकर राज्याचाही तोटा होऊ दिला नाही. आश्चर्य म्हणजे धर्मपरायण अहिल्याबाईंनी दानधर्माच्या नावाखाली कोणाकडूनही त्यागाची अपेक्षा केली नाही.[९]

अहिल्याबाईंनी स्वतःचे मोठे ग्रंथागार उभे केले होते. कोठून-कोठून निरनिराळे ग्रंथ त्या मागवत. त्यांच्या ग्रंथसंग्रहाची यादी उपलब्ध आहे. प्रसंगपरत्वे यातील निरनिराळ्या ग्रंथांचे ब्राह्मण वाचन करीत असत. अहिल्याबाई श्रवण करीत असत. अहिल्याबाई जेव्हा ऐकायला बसत असत, तेव्हा भोवताली महेश्वरची रयतही असे.

अहिल्याबाई माणसांची कदर उत्तम प्रकारे करत. गोविंदपंत गानू प्रथमपासून अहिल्याबाईंचे कारभारी होते. राजापूर प्रांतातल्या संगमेश्वर तालुक्यातून हे ब्राह्मण महेश्वरी आले होते. जेव्हापासून चाकरीत होते, तेव्हापासून अधिक उणा शब्द नाही. सुज्ञ माणूस. कमीजास्त वागणे नाही. कोठे काही जाबसाल करतील, तेव्हाही सगळ्या बाजूने आब राखून. कधी बेईमानी नाही. अहिल्याबाईंना वाटत असे माणूस म्हणजे बावन्नकशी सोने.सही त्यांच्या चाकरीला  आठनऊ वर्षे होताच अहिल्याबाईंनी ठरवले, त्यांच्या कायमच्या उपजीविकेची सोय लावून द्यायची. त्यांनी गोविंदपंतांना तसा अर्ज करण्याची सूचना केली. ते भरून पावले. धन्यांनी स्वतःहून चाकरीत केलेल्या कार्याची दखल घ्यावी, यासारखे दुसरे समाधान नव्हते.दुपारच्या दरबारात गोविंदपंतांनी विनंती अर्ज दिला, “आम्ही राज्याचे पुरातन सेवक. इतके दिवस एकनिष्ठतेने सेवा केली. यास्तव कृपाळू होऊन आम्हास खर्चाचे बेगमीस एक गाव दिला पाहिजे. ”सर्व कारभाऱ्यांनी विनंती अर्ज लगेच संमत केला.[१०]

राज्यकर्त्या म्हणून अहिल्याबाई यशस्वी होत्या. पेशव्यांच्या दरबारात अहिल्याबाईंना मान होता. इतर मराठे सरदार त्यांना उपद्रव देत नसत. बाईंचे कारभारी त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन करीत नसत, माघारी कारवाया करून त्यांच्यावर उलटत नसत. त्यांचे वकील निरनिराळ्या राज्यांत होते. कोणी कितीही दबाव आणला, तरी अहिल्याबाई वाकत नव्हत्या. त्या चिकाटीने तुकोजींचे हिशोब मागतच होत्या. दानधर्म, साधी राहणी, प्रजाहितदक्षता आणि प्रचंड धनसंचय यामुळे अहिल्याबाईंचा पुणे दरबारातही दरारा होता त्यांना कोणी अमर्यादपणे हुकूम सोडत नव्हते. उलटून जाब विचारत नव्हते. परमेश्वर चिंतन आणि जनहित रक्षण या दोन तत्त्वांच्या हातात हात घालून त्यांचा प्रवास चालला होता. गुन्हेगारांना शिक्षा करताना अहिल्याबाईंचा दृष्टिकोन उदार होता, हे अनेक ठिकाणी जाणवते.माणूस दूरवर्तनापासून परावर्त होण्यासाठी त्या कडक पाऊल उचलत असत, पण माणसाचे आयुष्यभराचे नुकसान त्या करीत नसत.

महेश्वरी रीवा तीरावर राघोबादादांनी भक्कम घाट बांधला होता. त्या घाटावर ब्राह्मण संध्यास्नानाधिक कर्म करत नित्य बसलेले असत. वस्तीचे लोक त्या घाटावरूनच पाणी भरत असत. घाटाच्या दोन्ही बाजूस दोन देवालये बांधली.एक सदाशिवाचे होते. दुसऱ्यामध्ये बाईंनी मुद्दाम परशुरामाची मूर्ती करून तिची स्थापना केली होती. दोन्ही देवालये  झाल्यावर पर्जन्यकाळी पावसाचे पाणी रस्त्यावरून घाटावर येऊ लागले. घाटाचे दगड त्यामुळे अस्ताव्यस्त झाले. माणसांची वर्दळ तिकडे होती. दगड ढासळून कोणाला इजा झाली असती. अहिल्याबाईंच्या कारभारात असे चालत नव्हते. त्यांनी लगेच बांधकामाची चांगली नजर असलेली माणसे बोलावून घेतली. सल्ला विचारला. पूर्व पश्चिम ६५ हात आणि उत्तर-दक्षिण १७ हात, एकंदर रुमाली क्षेत्र ११७० हात जागेत चीरे घालायचे ठरले.म्हणजे घाट चांगला राहील ही तज्ज्ञांकडून खात्री दिली गेली. पाथरवटाने अंदाजे पंधराशे-सोळाशे रुपये खर्च सांगितला. अहिल्याबाईंनी ते काम करून घेतले. रयतेने बाईंना दुवा दिला. दक्षिणेत टिपूशी झुंज चाललेलीच होती. या रणधुमाळीत अहिल्याबाई

प्रत्यक्ष नव्हत्या, तरी त्यामागे उभे आहेत याचाच अनेकांना आधार वाटत होता. लढाईच्या परिसरातील कैक माणसे निरनिराळ्या कारणांनी अहिल्याबाईंना पत्रे लिहीत होती, त्यातून हे व्यक्त होते.

२४ जानेवारी १७८७ सूर्यग्रहणाच्या दिवशी अहिल्याबाईंनी एक लक्ष रुपये दानाचा संकल्प केला.मुख्य तुळा नातवासह स्वतःची केली. ती सुवर्ण व सोळा हजार रुपयांची झाली.अशा त्यांनी एकंदर ३५ तुळा केल्या. यात त्यांची लेक, जावई, दरबारी माणसे सर्व होते. ही सगळी संपत्ती दान केली. दानामुळे अहिल्याबाईभोवती वलय निर्माण होत होते, कारण लोकांना युद्ध नकोसे होते. शांतता हवी होती. त्यासाठी अहिल्याबाई हा आधारस्तंभ वाटत होत्या. लढाई-लूट-मृत्यूचे तांडव- उपासमार हे जीवनचक्र जनतेला पाठ झालेले होते. ते अटळ म्हणून जनतेने स्वीकारलेले होते, पण या फंदात न पडता पोटाला अन्न आणि प्यायला पाणी देणाऱ्या, आनंदाने देवादिकांचे उत्सव करणाऱ्या अहिल्याबाईंविषयी अपार आदराची भावना भोवताली चारी दिशांना पसरत होती.

या सगळ्या राजकारणाच्या धुमाळीत अहिल्याबाई माणसाच्या मनाला जपत होत्या. त्यामुळे लोकही त्यांच्याशी प्रापंचिक सुखदुःखाच्या गोष्टी करीत होते. भोवतालच्या कुटुंबात काय घडते आहे, हे अहिल्याबाईंना माहिती असे.त्यामुळे दंडेली कोण करते आहे, अन्याय कोण करते आहे, हे त्यांच्या लक्षात झटकन येत असे. कधी समजावून, कधी धाक दाखवून त्या कुटुंबातले प्रश्न सोडवत असत. एका मुलाने विधवा आईकडून पैसे उकळून बायकोला दिले. अहिल्याबाईंची नित्याची पद्धत चौकशीची होती, पण तेथे त्यांना अन्याय इतका स्पष्ट दिसत होता, की त्या चौकशीच्या फंदात पडल्या नाहीत. अहिल्याबाईंनी त्याच्या बायकोला पैसे आपल्याकडेच परत करण्यासाठी धमकावले, म्हणजे पुन्हा सुनेने कबूल केले, पण त्या सासूला पैसे मिळाले की नाही वगैरे गोंधळ नकोच म्हणून एका स्वाराबरोबर पत्र पाठवून दिले आणि निकाल लावला.[११]

अहिल्याबाईंनी दादाजी गंगाधर यांना पत्र लिहिले, “**शिंदे यांनी पातशहांचीची वजारत संपादून कारभार केला. सीक्यात पातशहांचे वजीर श्रीमंत आणि त्यांचे मुतालिक आपण, असा अन्वय आणून वहिवाट केली. त्याप्रमाणे नजर नजराणा फरमान बाडी करून द्यावा हे त्यास उचित. परंतु पूर्वीपासून कैलासवासी बाजीराव यांचे कारकिर्दीपासोन पासून दिल्लीत पातशहा बलाय मजबूत बलाय मजबूत फौज व बलाय खजाना मुलखात अंमल दखल करून होते. तेव्हा (पेशव्यांनी) जोर पोहोचवून पातशहा लुटून मारून नवे पातशाह प्रस्थापित केले.(जेव्हा पातशः फौज आणि खजिना दोन्ही बाजूंनी मजबूत होते, तेव्हाही पातशहा कोण प्रस्थापित व्हावा हे पेशव्यांचा जोर कोणाच्या बाजूला त्यावरच ठरले होते.) ते समर्थी पातशाहीच केली असती तरी योग्यता होती. परंतु, राजाचा वरदहस्त मस्तकी आहे तोच असोन पृथ्वीत लौकिक असावा यावर नजर देऊन पातशहा आपल्या हातांनी स्थापन करून अटकेपर्यंत राज्य केले. हा विचार पाहता फरमान बाडी करून, नजर नजराणा घेऊन पातशाही चाकर म्हणवावे,यात आधिक्य नाही. नाना व तात्या विचारवंत आहेत. तेही श्रीमंतास असी सलाह देतील असे नाही. तत्रापि शिंदे यांचे भिडेस पडल्यास न कळे.याजकरिता तुम्ही प्रसंगोचित नानांस व तात्यांस सुचविणे.**”[१२] पुण्याहून कोणी सल्ला मागो वा न मागू अहिल्याबाई मनात असलेले विचार पुण्याला सतत कळवत होत्या.केवळ शिंदे विरोधातून हे पत्र लिहिले गेले नव्हते. पातशाही आणि मराठा साम्राज्य यांचा स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेला बाजीरावांपासूनचा इतिहास लक्षात घेऊन

अहिल्याबाईंनी जो मूलभूत विचार केला होता, तो या पत्रात जाणवतो. अहिल्याबाईंचा मराठा साम्राज्यबद्दलचा अभिमान या पत्रात काठोकाठ भरलेला दिसतो.

अठराव्या शतकाच्या कालपटाच्या पार्श्वभूमीवर अहिल्याबाईंच्या राजकीय जीवनाकडे पाहताना जाणवते की, अहिल्याबाईंच्या मागच्या पुढच्या काळात मराठाशाहित अनेक चौकस, कर्तृत्ववान स्त्रिया राजकारणात आल्या होत्या. पती- पुत्राला गादीवर बसविण्यासाठी त्या अटीतटीने सत्ता संघर्षात उतरल्या होत्या. त्या डावपेच खेळल्या होत्या, त्यांनी किल्ले लढवले होते, कधी यशस्वी झाल्या होत्या, कधी पराभूत झाल्या होत्या, कधी बळी ठरल्या होत्या, पण सत्तेच्या केंद्राभोवतीच फिरत राहिल्या होत्या.अहिल्याबाईंचे राज्यकारभारात येणे निराळे होते. त्यांची गुणवत्ता लक्षात घेऊन त्यांच्या सासऱ्यांनी त्यांना राज्यकारभारात आणले, इतर जणींपेक्षा अहिल्याबाई ह्याबाबतीत सुदैवी ठरल्या.त्यांच्या गुणांची कदर करणारे सासरे त्यांना लाभले होते. त्यामुळे त्यांचा राज्यकारभारात फार सहजपणे प्रवेश झाला आणि याचे शिक्षणही मिळाले, पण इतर जणींप्रमाणे अहिल्याबाई पुत्रप्रपौत्रांना सत्ता मिळवून देण्यासाठी राजकारण खेळल्या नाहीत. अहिल्याबाईंचे फार मोठे श्रेय हे होते की, मल्हाररावांची मदतनीस असतानाच्या पूर्वकाळात अहिल्याबाईंनी राज्यकारभारात स्वार्थी ढवळाढवळ केली नाही. सासऱ्यांचे माधवराव पेशव्यांना साथ देत, घरभेद्या राघोबादादांशीही संधान बांधणे यांसारख्या डावपेचांपासून त्या शक्य तेवढ्या दूर राहिल्या. सासऱ्यांच्या मृत्यूनंतर पुत्र त्यांच्या जागी आला. त्यावेळी मल्हाररावांचा उजवा हात म्हणून अहिल्याबाईंचा लौकिक मराठा राज्यात सर्वत्र पसरलेला होता. परंतु, या लौकिकामुळे त्या उन्मत्त राजकारणाकडे झुकल्या नाहीत. पुत्राच्या कारकिर्दीत कारभार यंत्रणेत अहिल्याबाईंचे स्थान अधिकृतपणे दुय्यम होते, तरी अनधिकृतपणे त्याच राज्यकर्त्या होत्या. ठरवलेच असते तर मुलाला हाताशी धरून पाहिजे तशी हुकमत त्या गाजवू शकत होत्या, परंतु तेव्हा त्या राज्याच्या जबाबदार विश्वस्त झाल्या. विश्वस्ताच्या कर्तव्याला स्मरून, पुत्राच्या अपराधाची चौकशी त्यांनी आरंभली आणि शेवटापर्यंत नेली.

पुत्राला अबाधितपणे सत्तेवर ठेवणे किंवा नातवाला सत्ता मिळवून देणे ही कधी अहिल्याबाईंच्या राज्यकारभाराची प्रेरणा होऊच शकली नाही. हे त्यांचे समकालीन स्त्रियांपेक्षा असलेले वेगळेपण होते सत्तेवर येताच अहिल्याबाईंनी शपथ घेतली की, “परमेश्वराने ज्या जबाबदाऱ्या माझ्यावर सोपवल्या आहेत, त्या मला पार पाडावयाच्या आहेत.” त्या शपथेशी त्या अखेरपर्यंत प्रामाणिक राहिल्या. मात्र परमेश्वर भक्ती किंवा विश्वस्ताची भूमिका यांचा अतिरेक करून त्यांनी सत्तेची सूत्रे हातातून सोडली नाहीत, ती शेवटपर्यंत स्वतःच्या हातात ठेवली. याचे कारण विश्वस्ताची कर्तव्य पार पाडण्यासाठी ही हातात सत्ता असणे गरजेचे असते, हे त्यांची राजकारणी बुध्दी त्यांना सांगत होती.अहिल्याबाईंची जनतेशी बांधिलकी अंत:करणाच्या गाभ्यातून होती. एकेका व्यक्तीच्या प्रश्नात लक्ष घालून त्या गरजेनुसार मदत करीत होत्या. त्यामुळे जनता त्यांना दुवा देत होती. उत्तम राजकारण जाणणाऱ्या अहिल्याबाई केवळ धर्मभोळेपणाने कोणतेही संकल्प करीत नव्हत्या. ब्रिटिश चारही बाजूंनी पसरू लागले होते. दिल्लीची बादशाही खिळखिळी झालेली होती.मराठ्यांच्या राज्याची मुख्य राजधानी सातारा दुबळी झालेली होती. पेशवाईचा जोर ओसरला होता. मराठ्यांचे आपापसातले तंटे वाढतच होते. अशा परिस्थितीमुळे मराठीशाहीचे जहाज हेलकावे घेत होते. ते आज ना उद्या बुडणार आहे हे या सुबुद्ध स्त्रीला निश्चितच तीव्रतेने जाणवत होते. अशावेळी स्वसमाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी मूलभूत कार्य उभे राहिले, तरच निभाव लागू शकतो हे समजण्याची बुध्दी आणि

कार्य उभे करण्याची कर्तृत्वशक्ती त्यांच्या ठिकाणी होती. देवळांचे जीर्णोध्दार, धर्मशाळा, अन्नछत्रे यांना मदत करून त्या स्वसमाजाच्या सतप्रवृत्तीला आवाहन करीत होत्या, त्याला जगण्यासाठी आधार देत होत्या. कथाकीर्तनातून आपली परंपरा जागवत संस्कृतीचे केंद्र ठायीठायी उभी करत होत्या. त्यातून स्वसमाजाच्या अस्मितेला साथ घालत होत्या. एकाच वेळी एका हाताने राजकारण खेळत होत्या आणि दुसऱ्या हाताने देवधर्माच्या निमित्ताने लोकोपयोगी कार्य उभे करीत होत्या. त्यातून त्यांना प्रिय असलेल्या भरत खंडातल्या सनातन संस्कृतीचे अस्तित्व जागवत होत्या.त्यामागची भूमिका स्वसमाजाचे अस्तित्व आणि अस्मिता जागवणे एवढीच होती.

अहिल्याबाईंनी प्रत्यक्ष हातात तलवार धरून लढाई केल्याचे उल्लेख जरी प्राप्त नसले, तरी त्या प्रत्यक्ष लढाईवर गेल्या होत्या. याचे पुरावे आहेत. त्यांना गनिमी कावा समजत होता. युद्धविषयक गोष्टी, तहनामे, करारनामे या गोष्टी त्यांना चांगल्या अवगत होत्या.अहिल्याबाईस द्रव्य तृष्णा मुळीच नसल्यामुळे, त्यांनी प्रजेस बुडवून आपला खजिना कधीही वाढविला नाही. त्यावेळचे इतर राजे आपले राज्य वाढवीत व प्रजेचे संरक्षणही करीत होते, पण या सर्व गोष्टीत आपला बडेजाव वाढावा,हा त्यांचा हेतू होता. प्रजासंरक्षण करण्यात त्यांचा हेतू प्रजेचे कल्याण नसून लोभ होता.ते लोक स्वत:च्या सुखासाठी राज्य करीत.आपला जन्म प्रजेसाठी आहे. अशी त्यांची भावना नसून 'प्रजा आपल्यासाठी आहे' अशी त्यांची भावना होती.

आंग्ल कवयित्री जोना लेली म्हणते-

**“For thirty years her reign of peace”**[१३] तिच्या राज्याची तीस वर्षे होती शांतीची. जमाखर्चाचा लेखाजोखा अतिशय अचूक आणि चोख असल्यामुळे, अवास्तव खर्च आणि पैशांचा अपव्यय थांबला. अहिल्याबाईंनी महेश्वर-पुणे-महेश्वर अशी टपाल व्यवस्था इ.स. १७८३ पासून सुरु केली. ‘फडणीसांचे कायदे’ या नावाने त्यांनी अनेक नियम घालून दिले. अहिल्याबाईंची अर्थव्यवस्था आदर्श होती. अहिल्याबाईच्या वागण्यातून त्यांची नि:स्पृहता तर दिसून येतेच, पण तत्कालीन विचारसरणी कशी होती, हेही समजते. त्याकाळी दिल्ली ते कलकत्ता या रस्त्याचे मोठे काम त्यांनी पूर्ण केले. दळणवळणाचे महत्त्व अहिल्याबाईंनी जाणले होते. रस्ते हे विकासासाठी गरजेचे असतात, हे ओळखून त्यांनी कितीतरी रस्ते तयार केले. सर्व देशभरातील मंदिरे त्यांनी आपली मानली व त्यांचा जीर्णोध्दार केला. त्यांची कायमची व्यवस्था करण्यासाठी दीर्घकालीन उत्पन्नांचा आधार त्यांनी दिला. गुणी माणसांना अहिल्यादेवींनी राज्यात चांगली कामे दिली. त्यांचा आदर केला.स्वत:च्या राज्यातील नव्हे, तर महाराष्ट्रातील मोरोपंत,अनंतफंदी,सगनभाऊ यांच्यासारखे शाहीर, चित्रकार, शिल्पकार, स्थापत्यशास्त्रातील कलावंत यांना मोठा आश्रय देऊन,कलेला मोठे करण्यासाठी त्यांनी बळ दिले.[१४]

लष्करी व्यवस्थापनाकडे अहिल्याबाईनी कधीही दुर्लक्ष केले नाही. पेशवाईच्या कालखंडात होळकरांची लष्करी शक्ती सर्व मराठा सरदारांमध्ये श्रेष्ठ प्रतीची कशी राहील,यावर त्यांचा कटाक्ष असे. तुकोजी होळकरांकडे फौजेची सर्व सूत्रे देऊन, त्यांच्या हातून विविध लष्करी मोहिमा अहिल्याबाईनी यशस्वी केल्या. महादजी शिंदे व इतर मराठा सरदारांना वेळोवेळी सैन्याचा व लष्करी साहित्याचा पुरवठा केला. लष्करी व्यवस्थापनाची उत्तम जाण आणि शस्त्रास्राचे उत्तम ज्ञान त्यांना होते. आपले सैन्य कमी करणे म्हणजे पाठीचा कणा मोडून घेण्यासारखे आहे, असे त्यांचे विचार होते.

**निष्कर्ष :-**

१) अहिल्याबाईंच्या वागण्यातून त्यांची नि:स्पृहता दिसून येते.तत्कालीन विचारसरणी कशी होती, हेही समजते.

२) जनकल्याणासाठी शासन ही बाब त्यांनी महत्त्वाची मानली.

३) औदार्य, न्यायप्रियता, भूतदया, सदाचरण या गुणांमुळे अहिल्याबाईंचे नाव सर्वतोमुखी झाले.

४) अहिल्याबाई माणसाची कदर उत्तम प्रकारे करीत, म्हणूनच शेजारील राज्य व राज्यकर्ते यांच्याशी त्यांनी सलोख्याचे मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले.

५) अहिल्याबाईंनी लोककल्याणकारी कार्य करत लोकाभिमुख राजकारण केले.

६) शेतकरी, कलाकार, सैन्य, कर्मचारी, दलित-भटके-आदिवासी, स्त्रिया अशा समाजातील सर्वच घटकांसाठी त्यांनी लक्ष्य पुरवून, विशेष योजना राबविल्या.

७) अहिल्याबाईंनी देव, देश, धर्म यांचे रक्षण करण्यासाठी आपले उभे आयुष्य व्यतित केले. त्यामुळेच राजकारण, समाजकारण, धर्मपरायणता या गुणांचे परमोच्च शिखर त्यांनी कायमचे गाठले.

८) प्रजाहितदक्ष, कर्तबगार, पराक्रमी, कलाकारांच्या आश्रयदात्या अहिल्याबाई आपल्या प्रेमळ स्वभावाने व स्वच्छ राजकारणाने लोकप्रिय झाल्या.

९) राजकारण, प्रशासन, लष्करी व्यवस्थापन, प्रजाहित, परराष्ट्रधोरण, धर्मसहिष्णुता, धर्मसंस्कृतीचे संवर्धन या सर्वच दृष्टिकोनातून अहिल्याबाई या महान व्यक्ती व आदर्श राज्यकर्त्या होत्या.

१०) अहिल्याबाईच्या समतामूलक दृष्टिकोनामुळे अहिल्याबाईचे राज्य केवळ समृध्दच नव्हे तर सुसंस्कृतही होते.

**समारोप :-**

अहिल्यादेवी होळकर यांच्या नावापुढे 'पुण्यश्लोक' अशी उपाधी लावली जाते. 'पुण्यश्लोक' या विशेष नामाचे उच्चारण करताच फक्त आणि फक्त अहिल्यादेवींचे स्मरण होते. या नावात सात्विकता, आध्यात्मिकता, मंगल आणि पावित्र्याचा भाव आहे. तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली, तर अहिल्यादेवींनी भारताला दिलेल्या मूलभूत योगदानाचे महत्त्व लक्षात येते. त्या एक धर्मरक्षक शासक तर होत्याच, परंतु त्यांनी समाज सुधारणेला अनन्यसाधारण महत्व दिले. त्यांचे व्यक्तिगत जीवन समाज सुधारणेच्या मूल्यांनी प्रेरित झाले होते. म्हणूनच मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये अहिल्यादेवी होळकरांचे स्थान अव्दितीय असे आहे.

**संदर्भ :-**

१. भारतीय संस्कृतिकोश,खंड दहावा,संपा.पं.महादेवशास्त्री जोशी,अनमोल प्रकाशन,पुणे, प्रथमावृत्ती २००७,पृ.क्र. ४२७.

२. ज्ञान-अज्ञान अहिल्याबाई होळकर,विनया खडपेकर,राजहंस प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती एप्रिल २००७,पृ.क्र.३३

३. भारतीय संस्कृतिकोश,उनि.,पृ.क्र.४२७

४. तत्रैव,पृ.क्र.४२७

५. ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर,उनि.,पृ.क्र.३७

६. तत्रैव,पृ.क्र. ७२

७. तत्रैव, पृ.क्र. ७४

८. तत्रैव, पृ.क्र. ७६

९. तत्रैव, पृ.क्र. ८९

१०. तत्रैव, पृ.क्र. ९१

११. तत्रैव, पृ.क्र. १८८

१२. तत्रैव, पृ.क्र. २२९

१३. अहिल्यादेवी होळकर,संपा.प्रा.वसंत शेंडगे,सौ.विद्या शेंडगे,कीर्ती प्रकाशन,औरंगाबाद, प्रथमावृत्ती,जानेवारी २०१२,पृ.क्र.९२.

१४. लोकमाता अहल्याबाई होळकर : एक नवा विचार,संपा.अॅड.महेंद्र शिंदे,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती मे २०१२,पृ.क्र.१२ व १३.